१५८८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ७२२



प्र

REFBK-0006484

प्रकाशन

— प्रदीप प्रकाशन —

जळतीं घरें

जन्माचे सोबती

विशाल संसार

आगामी

पांच वायका आणि त्रिंबक

वृक्ष आणि वेली

गणेश टोप्या

समर यात्रा

संजीवन

धूमकेतू

# विशाल संसार

REFBK-0006484

लेखक

व्यंकटेश शंकर वकील, बी. ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

दीड रुपया ] प्रदीप प्रकाशन [ एप्रील १९४४

मुद्रक:—

वा. द. सातोस्कर
सागर साहित्य छापखाना
त्रिभुवनरोड मुंबई ४

प्रकाशक:—

वासुदेव विष्णु भट
भीमराव वाडी,
मुंबई नं. २

## वकीलांचीं पुस्तकें

| | |
|---|---|
| अश्रुफुलें | कथासंग्रह |
| धूमकेतू | ,, |
| नव्या ज्योती | एकांकिका संग्रह |
| जळतीं घरें | ,, |
| समर प्रसंग | ,, |
| जन्माचे सोबती | नाटक |
| भिमीची सवत | ,, |
| प्राणेश्वरी | ,, |
| व्होल्गा ते गंगा | अनुवाद |
| श्रावणातलें खेडें | ,, |
| अहिंसादर्शन | ,, |
| विशाल संसार | मुलाखती |

विशाल संसार या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे, भाषांतराचे वगैरे सर्व हक्क सौ. उषा वकील, वर्धा यांचे स्वाधीन आहेत.

सौ. आक्कास—

| | |
|---|---|
| प्रस्तावने दाखल ... ... ... | १ |
| कस्तुरबा गांधी ... ... ... | ३ |
| उषाबाई डांगे ... ... ... | ९ |
| इंदिराबाई रुईकर ... ... ... | ३३ |
| एलन् रॉय ... ... ... | ४४ |
| विमलाबाई देशपांडे ... ... ... | ५२ |
| प्रभावती जयप्रकाश ... ... ... | ६६ |
| खुलाशा दाखल ... ... ... | ७८ |

९०८८३

X X

कोणत्या प्रकारच्या अपेक्षा मनांत बाळगून श्री. व्यंकटेश वकील यांनीं आपल्या 'विशाल संसार' या मुलाखतींच्या संग्रहाला प्रस्तावनेदाखल चार शब्द लिहिण्याची विनंति मला केली याचा बोध प्रस्तावना लिहिण्यास सुरवात केल्यानंतरहि मला नीटसा झालेला नाहीं. परंतु त्यांचें मन मोडूं नये इतक्या साध्या कल्पनेनेंच ती लिहिण्यास मी तयार झालों आहे. राजकारणांत आणि लोकसेवेच्या कोणत्या ना कोणत्या तरी खटपटींत अहर्निश गुंतलेल्या व त्यासाठीं हरएक प्रकारच्या हालअपेष्टा ज्यांनीं सोसल्या आहेत अशा प्रसिद्ध पुरुषांच्या पत्नीपदाचा लाभ झालेल्या अशा या सर्व स्त्रिया आहेत. त्यांचे संसार हे इतर सामान्य स्त्रियांच्या संसारांप्रमाणें आपल्या मुलाबाळांपुरतेच मर्यादित नसून त्यांच्या पतींच्या कार्याचा विस्तार जितका वाढेल तितके वाढलेले आहेत आणि त्यासाठीं त्यांना कितीहि खस्ता काढाव्या लागल्या तरी त्याची त्यांनीं कांहींच खंत वाटून घेतलेली नाहीं हें या मुलाखतींच्या वाचनानें मला समजून आलें. हिन्दी स्त्रियांची परंपरागत पतिपरायणता अगदीं आधुनिक विचारांच्या समजल्या जाणाऱ्या स्त्रियांमध्येंहि अद्यापि कायम आहे हें यावरून उघड होतें. पतीचें कार्य आणि मतें पसंत असोत वा नसोत, त्यांच्याशीं एकरूप होण्याचा प्रयत्न करायचा, त्यांच्या व्यक्तिमत्तेंत आपणहि विलीन होण्यामध्यें समाधान मानायचें अशा प्रकारची वृत्ति श्री. वकील यांच्या मुलाखतींचे विषय झालेल्या सर्वच स्त्रियांच्या अंगीं आहे याचें मला तर नवल वाटलें.

या स्त्रियांपैकीं फक्त श्री. सौ. उषाबाई डांगे याच माझ्या उत्तम परिचयाच्या आहेत. श्री. सौ. विमलाबाई देशपांडे यांच्याबरोबर दोनतीन वेळां बोलणें चालणें झालेलें आहे. त्या प्रत्येक वेळीं, त्यांचे यजमान श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे हे हजर होते आणि त्या संभाषणप्रसंगीं त्यांच्या उभयतांच्या भावना एकमेकांसंबंधीं कशा प्रकारच्या आहेत याबद्दल माझ्या मनावर जो कांहीं ठसा उमटलेला आहे त्याला सर्वस्वी पोषक असेंच वातावरण आणि संभाषण श्री. वकील यांच्या विमलाबाईबरोबर, झालेल्या मुलाखतींत आढळून आलें. मुलाखतींत माणसाचीं मतेंच केवळ समजून न येतां त्याच्या स्वभावाचीहि ओळख पटावी, त्याच्या कांहीं संवयी, कांहीं विशिष्ट लकबी समजाव्या अशी, मुलाखत हा एक वाङ्मयप्रकार मानायचा असेल तर, त्याबद्दलची अपेक्षा असायला पाहिजे. ही अपेक्षा या सर्व स्त्रियांच्या मुलाखतींत श्री. वकील यांनीं पुरी केलेली आहे.

९०८८३

× ×

कोणत्या प्रकारच्या अपेक्षा मनांत बाळगून श्री. व्यंकटेश वकील यांनीं आपल्या 'विशाल संसार' या मुलाखतींच्या संग्रहाला प्रस्तावनेदाखल चार शब्द लिहिण्याची विनंति मला केली याचा बोध प्रस्तावना लिहिण्यास सुरवात केल्यानंतरहि मला नीटसा झालेला नाहीं. परंतु त्यांचें मन मोडूं नये इतक्या साध्या कल्पनेनेंच ती लिहिण्यास मी तयार झालों आहे. राजकारणांत आणि लोकसेवेच्या कोणत्या ना कोणत्या तरी खटपटींत अहर्निश गुंतलेल्या व त्यासाठीं हरएक प्रकारच्या हालअपेष्टा ज्यांनीं सोसल्या आहेत अशा प्रसिद्ध पुरुषांच्या पत्नीपदाचा लाभ झालेल्या अशा या सर्व स्त्रिया आहेत. त्यांचे संसार हे इतर सामान्य स्त्रियांच्या संसारांप्रमाणें आपल्या मुलाबाळांपुरतेच मर्यादित नसून त्यांच्या पतींच्या कार्यांचा विस्तार जितका वाढेल तितके वाढलेले आहेत आणि त्यासाठीं त्यांना कितीहि खस्ता काढाव्या लागल्या तरी त्याची त्यांनीं कांहींच खंत वाटून घेतलेली नाहीं हें या मुलाखतींच्या वाचनानें मला समजून आलें. हिन्दी स्त्रियांची परंपरागत पतिपरायणता अगदीं आधुनिक विचारांच्या समजल्या जाणाऱ्या स्त्रियांमध्येंहि अद्यापि कायम आहे हें यावरून उघड होतें. पतीचें कार्य आणि मतें पसंत असोत वा नसोत, त्याच्याशीं एकरूप होण्याचा प्रयत्न करायचा, त्याच्या व्यक्तिमत्तेंत आपणहि विलीन होण्यामध्यें समाधान मानायचें अशा प्रकारची वृत्ति श्री. वकील यांच्या मुलाखतींचे विषय झालेल्या सर्वच स्त्रियांच्या अंगीं आहे याचें मला तर नवल वाटलें.

या स्त्रियांपैकीं फक्त श्री. सौ. उषाबाई डांगे याच माझ्या उत्तम परिचयाच्या आहेत. श्री. सौ. विमलाबाई देशपांडे यांच्याबरोबर दोनतीन वेळां बोलणें चालणें झालेलें आहे. त्या प्रत्येक वेळीं, त्यांचे यजमान श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे हे हजर होते आणि त्या संभाषणप्रसंगीं त्यांच्या उभयतांच्या भावना एकमेकांसंबंधीं कशा प्रकारच्या आहेत याबद्दल माझ्या मनावर जो कांहीं ठसा उमटलेला आहे त्याला सर्वस्वी पोषक असेंच वातावरण आणि संभाषण श्री. वकील यांच्या विमलाबाईबरोबर, झालेल्या मुलाखतींत आढळून आलें. मुलाखतींत माणसाचीं मतेंच केवळ समजून न येतां त्याच्या स्वभावाचीहि ओळख पटावी, त्याच्या कांहीं संवयी, कांहीं विशिष्ट लकबी समजाव्या अशी, मुलाखत हा एक वाङ्मयप्रकार मानायचा असेल तर, त्याबद्दलची अपेक्षा असायला पाहिजे. ही अपेक्षा या सर्व स्त्रियांच्या मुलाखतींत श्री. वकील यांनीं पुरी केलेली आहे.


श्री. उषाबाई डांगे यांचा व माझा परिचय उत्तम प्रकारचा असल्यामुळें त्यांच्या स्वभावांतील अनेक बारीकसारीक छटांची देखील ओळख श्री. वकील यांनीं किती चांगल्या प्रकारें पटविली आहे हें मला पूर्णपणें पटलें. या दोन उदाहरणां-वरून पटलेल्या खात्रीमुळें, इतरांच्या मुलाखतींतील स्वभावदर्शनहि यथातथ्य झालेलें आहे असें मी अनुमान करतों.

विमलाबाई देशपांडे, प्रभावती जयप्रकाश व एलेन रॉय यांच्या मुलाख-तींच्या वेळी त्यांच्या पतींच्या हजेरीचा व संभाषणाचा फायदाहि श्री. वकील यांना मिळाला. पतिपत्नींमध्यें प्रेम व सलोखा नांदत असला म्हणजे त्यांच्या सहवासांत आल्यावर तिऱ्हाइताला कोणत्या खेळकर, विनोदी व आनंदी वातावरणांत विहरतां येतें याचा प्रत्यय या तीनहि मुलाखतींमध्यें चांगला येतो. श्री. वकील यांनीं ठळक अशा सहाच स्त्रियांच्या मुलाखती या संग्रहांत एकत्र केल्या आहेत. आणखी थोडी जास्त संख्या असती तर बरें झालें असतें. परंतु सहाच्या ऐवजीं बारा मुलाखती जरी त्यांनीं दिल्या असत्या तरी त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या विविधतेंतहि हिन्दी स्त्रीस्वभावाची एकविधता हल्लींच्यासारखीच प्रकट झाली असती असें मला वाटतें. कारण या नमुन्याच्याच आणखी कित्येक स्त्रिया माझ्याहि पाहाण्यांत आहेत. स्वतःच्या हौशी, आवडी, आकांक्षा बाजूस सारून, नवऱ्याच्या हौशी, आवडी व आकांक्षा यांमध्येंच आनंद शोधण्याची त्यागी वृत्ति त्यांच्या ठिकाणीं दिसून आलेली आहे. 'आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी' या रमाबाई रानडे यांच्या पुस्तकाला नामदार गोखले यांनीं ३४ वर्षांपूर्वी लिहि-लेल्या प्रस्तावनेंत हिन्दी स्त्रियांचा हा विशेष रमाबाईंच्या उदाहरणावरून दाखवून दिलेला आहे. श्री. वकील यांना यापेक्षां निराळा असा कांहीं अनुभव जर कोठें आला असेल तर किंवा याच्या उलट पतींनीं आपल्या पत्नींच्या कार्याला मनोभावानें व एकरूपतेनें साह्य केलें अशीं कांहीं उदाहरणें हुडकून तशा मुलाखती लोकांसमोर ठेविल्या तर त्या आकर्षकपणें वाचनीय करण्याची शैली त्यांच्या लेखणींत आहे यांत संशय नाहीं. श्री. सौ. सरोजिनी नायडू, श्री. विजयालक्ष्मी पंडित, श्री. सौ. मेनका सोखे, श्री. राम राऊ या स्त्रियांचीं उदाहरणें उलट प्रकारचीं म्हणून होतील असें वाटतें. श्री. वकील यांनीं असा कांहीं प्रयत्न जमल्यास करावा असें सुचवून ही प्रस्तावना आटोपती घेतों.

मार्च १, १९४४ त्र्यंबक विष्णु पर्वते

"बापूंच्या जीवनाचा एक अंशच होऊन बसलें आहे मी. तेव्हां माझ्या जीवनाबद्दल वेगळं तें मी काय सांगू ? त्यांनीं आपली जीवनकथा लिहून ठेवलेली आहे, ती आपण वाचली असेलच ?"

मी मानेनेंच होकार दिला. त्यावर त्या सहास्य उद्गारल्या, "त्याहून अधिक वेगळं माझ्या आयुष्यांत कांहीं–घडलेलंच नाहीं. तुम्ही, वाटल्यास काकांना विचारा !"



कुठून तरी बाहेरून आलेले काकासाहेब कालेलकर आणि प्यारेलालजी, तेथून आंतल्या दुसऱ्या खोलीत जाण्याच्या गडबडींत होते. काकासाहेबांनी हांसून नुसती माझी ओळख दर्शविली व ते प्यारेलालजींच्या पाठोपाठ निघून गेले.

ऑगस्ट नऊची दुपार ! सकाळीं सबंध मुंबईत उत्पात घडायला सुरवात झालेली होती. महात्माजी व इतर पुढारी यांना झालेली अटक, सार्वत्रिक धरपकडीचें सुरू झालेलें सत्र, यामुळें वातावरणांत सर्वत्र उग्रता व उद्वेग पसरलेला

दिसत होता. शिवाजीपार्कमध्यें महात्मा गांधी यांचें व्याख्यान व्हावयाचें ठरलें होतें. बापूंना अटक झाली, त्यांची जागा 'बा'नीं घ्यायचं ठरविलं होतं.

मी भेटायला गेलों तेव्हां शेजारील राजवाड्यांशीं स्पर्धा करणाऱ्या, बिर्लांच्या त्या विशाल प्रासादांतल्या एका खोलींत "बा'चें कातणें चाललेलें होतें. जरीकाठाचें एक पांढरें खादीचें पातळ, तसेंच एक साधें चोळीवजा पोलकें, हातांत दोन दोन काळ्या बांगड्या, कान तसेच भुंडे, कुंकुमतिलकाखालीं नाकावर पांढऱ्या दांड्याचा चष्मा असलेली एक सत्तरीच्या वर गेलेली म्हातारी त्या संध्याकाळीं शिवाजीपार्कमध्यें बापूंची जागा घेणार होती.

बा बापूंची बरोबरी करूं शकत नाहींत. बापूंची आत्मिक शुद्धि, त्यांची समर्थ बुद्धि, त्यांचें अलौकिक महात्म्य, त्यांचें ज्ञान, यांची सर कुणालाच यायची नाहीं; तरी पण बाचें बालपण, तारुण्य व वार्धक्य त्यांचें सारें जीवन हें बापूंचें बालपण, तारुण्य व वार्धक्य यांच्यांत संपूर्णपणें विलीन झालेलें आहे, हेंहि तितकेंच खरें. बाला स्वतंत्र अस्तित्वच उरलेलें नाहीं.

बानें 'मगन' चरख्यावर सूत काढणें चाललेलेंच होतें. जवळच दोघीजणी बाच्या संध्याकाळच्या सभेची तयारी करीत होत्या. एका खादीच्या जाजमावर बा बसलेल्या होत्या. नवा पेळू घेतांना वर बघून त्या म्हणाल्या, "विचारा, आणखी काय विचारायचं तें ?"

बाच्या मुद्रेवरचें वत्सल स्मित आणि त्यांच्या लोचनांतून ओसंडून येणारें श्रद्धेचें तेज वाचाळाला देखील मूक करील.

मी म्हटलें, "मला खूपच विचारायचं होतं. पण तुमच्यापुढं आल्यावर सगळं कांहीं विसरून गेलों."

मी जेव्हां मुलाखतीला गेलों, तेव्हां माझ्या अपेक्षा त्यांना कळाव्यात, म्हणून मी प्रभावतीदेवी जयप्रकाश यांच्या मुलाखतीचा गुजराथी अनुवाद त्यांना वाचायला दिला होता. तो जवळच्या एका बेननें वाचून त्यांना मुलाखतीचा सारांश सांगितला. तेव्हां त्या म्हणाल्या, "आतांच इथं प्रभावती होती कुठंतरी ! तिचं माझं सगळंच निराळं पडतं. बापूंवेगळं मला आतां जीवनच उरलेलं नाहीं. आम्हीं सगळं कांहीं अनुभवलं, आमच्यांत मतभेद देखील झाले, तुम्ही वाचलं ना सारं ?"

मी मानेनें होय म्हणालों. स्वतःच्या लहरीप्रमाणें बायको वागत नाहीं, तिला आपलें म्हणणें पटत नाहीं, म्हणून घराबाहेर तिला काढून लावणारा नवरा. माझ्या डोळ्यांसमोर महात्माजींनीं वर्णन केलेला तो प्रसंग दिसूं लागला.

" डरबानमध्यें मी वकिली करीत होतों, त्या वेळीं माझे कारकून पुष्कळदां माझ्याबरोबरच राहात असत. त्यांत हिंदुहि असत आणि ख्रिस्तीहि असत; आणि प्रांतवार बोलायचें तर गुजराथी आणि मद्रासी असत. त्यांच्याबद्दल माझ्या मनांत कधीं भेदभाव उत्पन्न झाल्याचें मला स्मरत नाहीं. त्यांना मी कुटुंबांतले मानीत असें; आणि पत्नीकडून त्या बाबतींत कांहीं विघ्न आल्यास तिच्याबरोबर झगडतहि असें. एक कारकून ख्रिस्ती होता. त्याचे आईबाप पंचम जातीचे. आमच्या घराची बांधणी पाश्चात्य पद्धतीची होती. त्यात खोल्यांमध्यें मोरी असत नाही—असणें योग्यहि नाहीं असें मला वाटतें—त्यामुळें दरेक खोलींत मोरी-ऐवजीं लघ्वीसाठीं एक भांडे असतें. तें उचलण्याचें काम नोकराचें नव्हतें, आमचेंच यजमान-यजमानणीचें होतें. जे कारकून स्वतःला घरच्याप्रमाणें समजूं लागत ते स्वतः आपापलें भांडें उचलीतहि. हे पंचम कुळांत जन्मलेले कारकून नवे होते. त्यांचें भांडें आम्हांलाच उचललें पाहिजे. इतर भांडीं कस्तुरबाई उचलीत असे, परंतु हा तिच्या मतें कडेलोट झाला. आमच्यामध्यें धुसफूस झाली. मी उचलावें तर तेंहि तिला कबूल नाहीं, आणि स्वतः उचलणेंहि जड वाटलें. डोळ्यांतून अश्रुबिंदूंचीं मोत्यें ढाळणाऱ्या, हातांत भांडें धरलेल्या, स्वतःच्या तांबड्या लाल डोळ्यांनीं मला ठपका देत असलेल्या, जिन्यावरून उतरणाऱ्या कस्तुरबाईचें चित्र मी या घटकेलाहि रेखाटूं शकतों.

" पण मी जसा प्रेमळ तसाच घातकी पति होतों. मी स्वतःला तिचा शिक्षकहि समजत असें; आणि त्यावरून आपल्या आंधळ्या प्रेमाला वश होऊन तिला नकोसेंहि करीत असें.

" अशा तऱ्हेनें तिनें फक्त भांडें उचलल्यानें माझें समाधान नाहीं. ती हंसत-मुखानें नेईल तेव्हां माझें समाधान होणार, म्हणून मीं दोन शब्द खड्या सुरांतच सुनावले, " असली धुसफूस माझ्या घरांत नाहीं चालणार." मी बडबडलों.

" शब्द तीराप्रमाणें झोंबले.

" पत्नीचा क्रोधाग्नि पेटला "तर मग तुमचं घर आपल्यापाशींच ठेवा! ही मी चाललें."

" ईश्वराचें स्मरण मला राहिलें नव्हतें. दयेचा बिंदुहि राहिला नव्हता. मी तिचा हात धरला. जिन्याच्या समोरच बाहेर जाण्याचा दरवाजा होता. मी त्या असहाय अवलेला धरून दरवाजापर्यंत ओढीत नेली. दरवाजा अर्धा उघडला.

" डोळयांतून गंगायमुना वहात आहेत अशी कस्तूरबाई बोलली, "तुम्हांला एक लाज नाहीं, मला आहे. कांहीं तरी लाज धरा. मी बाहेर पडून जाणार कुठें? इथें आईबापें थोडींच आहेत, कीं त्यांच्याकडे तरी जाऊं. मी बायको पडलें. तेव्हां तुम्हीं घाल त्या लाथा खाल्ल्याच पाहिजेत. आतां लाज धरा आणि दार बंद करा. कोणीं पाहिले तर दोघांपैकीं एकाचीहि शोभा राहाणार नाहीं."

" मीं तोंड तर लालच्या लाल ठेवलें, पण शरमलों मात्र खरा. दरवाजा बंद केला. पत्नी जर मला सोडून जाऊं शकत नव्हती, तर मी तरी तिला टाकून कुठें जाणार होतों? आमच्यामध्यें भांडणें पुष्कळ झालीं आहेत पण नेहमीं परिणाम कल्याणप्रदच झालेला आहे; पत्नीनें स्वतःच्या अद्भुत सहनशक्तीच्या जोरावर जय मिळविला आहे."

" बापूंच्या आंगीं महत्ता असेल पण खरी आर्यता बाच्या आंगीं आहे. आफ्रिकेसारख्या देशांत " अपरात्रीं घराबाहेर पडून मी कुणाचा आश्रय घेऊं" असें आर्तकरुण शब्दांत विचारणारी बा आमच्या सुसंस्काराच्या सनातन आदर्शाची सजीव प्रतिमा आहे.

बा सांगूं लागल्या, " मला माझा स्वतःचा असा संकुचित संसार उरलेलाच नाहीं. मुलगे, सुना, नातू यांच्याबद्दल जेवढी आपुलकी मला वाटते, तेवढीच प्रत्येक आश्रमवासीयाबद्दल वाटत असते."

" भाई, बा तो केवल मा जैसी है, इसलिये तो बापूजी इनको बा कहते है" जवळच बसलेल्या त्याच बेननें मला ऐकवलें.

बा हसूं लागल्या! मुखांत एकहि दांत नाहीं. परीटघडी वस्त्रावर जशा चुरगळ्या पडाव्या तशा त्वचेवर सुरकुत्या पडलेल्या. बाच्या मुखावाटे बाहेर पडलेली वाणी, आश्रमवासीयांना आईच्या आशीर्वचनासारखी वाटत असते.

बाला पुत्रसुख आहे आणि नाहीं; पण त्यांच्या मनांत आतां हा आपपर-भाव मुळींच उरलेला नाहीं. आश्रमांतल्या पाहुण्यांचा सांभाळ करतांना त्यानीं जेवढे कष्ट झेलले असतील तेवढे स्वतःच्या मुलांची आबाळ होऊं नये म्हणून देखील झेलले किंवा नाहीं याची शंकाच वाटते.

मी त्यांच्या तेजस्वी मुद्रेकडे एकटक बघत होतों. त्यांनी तें पाहिलं आणि विचारलं, "याच्या आधीं मला पाहिलं नव्हतं तुम्हीं ?"

त्यांना मी अनेकदां पाहिलेलें होतें. पहिलें दर्शन मात्र फैजपूर काँग्रेसला महात्माजी जायला निघाले तेव्हां सेवाग्रामलाच झालें. बापू जेवून सेवाग्रामहून पायीं निघणार होते. त्यांचे त्यावेळचे फोटो काढण्यासाठीं आम्हीं दोघेतिघे गेलों होतों.

बा बापूंचा बिछाना स्वतःच बांधत होत्या. स्वत: त्यांची शरीरयष्टि कांहीं कष्ट करण्याइतकी धडधाकट नाहीं. पण बापूंच्या लहानमोठ्या सुखसोईकडे लक्ष देतांना त्यांनीं स्वतःचें सुख पाहिलें नाहीं, दु:ख पाहिलें नाहीं. दिवस पाहिला नाहीं, कीं रात्र पाहिली नाहीं. सूर्यासारख्या तेजोनिधीच्या प्रखरतेनें स्वत:ला होरपळून घेणाऱ्या वसुंधरेप्रमाणें बानें बापूंच्या प्रखर जीवनांत स्वतःचें अस्तित्व होमून टाकलें. सूर्य वसुधेला प्रकाश देतो, व होरपळूनहि टाकतो. पण असंख्यांची जीवनदात्री वसुधा त्यांतच धन्यता मानते. बापूंनीं बांना मनस्ताप आणि प्रकाश दोन्हीहि दिलीं. बापूंच्या अनेक अग्निदिव्यांत बानीं पण त्यांना साथ दिलेली आहे. राजकोटच्यावेळीं बा आपणहून तिथल्या संग्रामांत उडी घ्यायला धांवल्या.

माझ्यापुढें बसलेल्या बा नुकत्याच एका प्राणांतिक आजारांतून उठलेल्या होत्या. सेवाग्रामसारख्या रुक्ष रखरखीत ठिकाणीं गांवाबाहेरल्या एका मातीच्या दोपांखी घरांत ऐन उन्हाळ्यांत त्या काळाशीं झगडत होत्या. मृत्यूनें हार खाल्ली. बा बापूंना आणखी एका अग्निदिव्यांत साथ द्यायला सिद्ध झालेल्या आहेत.

तीन महिन्यापूर्वी त्याना मी सेवाग्रामला प्रार्थनेच्या वेळीं पाहिलें होतें. वर आकाशांत चांदण्याचा चुरा विखुरलेला. प्रार्थनेच्या अंगणांत वाळूचा जाड थर पसरलेला. दिव्याच्या वाती सारलेल्या. प्रत्येकजण आपापली चटई घेऊन आला. एका टोंकाला महात्माजी बसलेले, उजव्या बाजूला महादेवभाई, आणि दुतर्फा

आश्रमवासी ओळीनें बसलेले. त्यांतच कुठेंतरी इतरजणींत जानकीदेवी बजाज यांच्याजवळ बा ! अंधारांत सर्वांच्या बरोबर त्यांनी प्रार्थना म्हटली, आपल्या कांतण्याचा हिशोब सांगितला. बापू आपल्या कुटीकडे गेले. त्या जवळच्याच आपल्या झोंपडीच्या ओसरींत पडलेल्या बाजल्याकडे निघाल्या. बापू बाशीं एक शब्द देखील बोलले नाहींत. बा एका पांचसहा वर्षांच्या बालकाबरोबर बोलत हंसत होत्या.

जणुं काय आतां त्याच बालकाबरोबर बोलत आहोंत अशा अविर्भावानें हांसून त्या म्हणाल्या, "हे बघा, तुम्हांला कांहीं माझी मुलाखत घेणं जमायचं नाहीं."

"आणि मला पण आपली मुलाखत कशी घ्यावी हें कळत नाहीं."

"तेव्हां नमस्ते."

त्यांचें सूत कांतणें संपलें. चरखा आपल्याच हातांनी त्या गुंडाळून ठेवीत होत्या. इतक्यांत एक बेन धांवत आली व म्हणाली, "बा, पुलीस आई है."

बाला पुन्हां एकदा मी डोळे भरून पाहिलें आणि त्यांना नमस्कार केला. मूक हास्यानेंच त्या माउलीनें मला आशीर्वाद दिला.

बिर्लांच्या महालांतून ती तपस्विनी आतां कुठेंतरी तुरुंगाच्या तपोभूमींत जाणार होती. महात्माजींच्या धार्मिक, राजकीय, आणि सामाजिक कार्यांत जरी या तपस्विनीनें विनोबा, सरदार आणि ठक्करबाप्पा यांच्या इतकें सहकार्य दिलेलें नसलें, तरीपण ज्या ज्या वेळीं बापूंनीं महायज्ञ आरंभिला त्या त्या वेळीं तिनें देखील एकेक अनुष्ठान केलेलें आहेच.

पुराणांतरीं तपस्विनींच्या अनेक कथा सांगितलेल्या आहेत. आमची राष्ट्रमाता बा त्या कथांच्या नायिकांपेक्षां अणुभर देखील उणी भासायची नाहीं.

१६ ऑगस्ट १९४२

“मी कांहीं विदुषी नाहीं. तेव्हां आपलं जें कांहीं काम निघेल, तें करीत रहावं असं मी ठरवलं आहे. ज्ञानाच्या भारापेक्षां कार्यांचा भार उचलणं मला परवडतं. आमचे गुरुजी तुरुंगांतून सुटले म्हणजे जरा शिकेन म्हणत्यें; पण तें शेवटीं नाहींच जमणार, असं वाटतं. मी तुला यंव करीन नी त्यंव करीन अशा गप्पा मारायचा ‘डी,’ पण बघावं तेव्हां आपला तुरुंगांत बसलेला. सांगा, मग कशी होणार मी विदुषी?”—



उषाबाई डांगे यांनी माझ्या प्रश्नाला दिलेलें उत्तर गंमत म्हणून बरें होतें.• पण त्यांच्या चेहऱ्यावरला गंभीर भाव बघून मला पहिल्याप्रथम कांहींच अंदाज करतां आला नाहीं. आपल्या चष्म्याच्या कांचा पदरानें पुसून काढीत माझ्याशीं बोलत असल्यामुळें मला त्यांच्या मनांतला खरा अर्थ ओळखणें कठीण गेलें. उषाबाई कॉम्रेड डांगे यांना कधीं कधीं ‘डी’ म्हणतात, तर कधीं कधीं जास्तच मनमोकळेपणानें डांगे यांच्याविषयीं बोलूं लागल्या, म्हणजे ‘बग्या’ असें म्हणतात. हें त्यांच्याशीं बराच वेळ बोलणें झाल्यावर माझ्या ध्यानांत आलें. उषाताईंना भारत संरक्षण कायद्याखालीं अटक व्हायच्या आधींची एक घटना मला आठवली. कॉम्रेड कुरणे यांच्यावरील खटल्यांत त्यांना प्रेसिडेन्सी

मॅजिस्ट्रेटपुढें साक्षीला जावें लागलें होतें, तेव्हां त्या म्हणाल्या होत्या, " मी कम्युनिस्ट नसलें तरी मला कम्युनिझम् आवडतो. मी बारा वर्षे त्यांच्याबरोबर काम करीत आल्यें, आणि त्यांच्याबरोबरच पुढं देखील करीन !"

उषाबाई माझ्याशीं गप्पा मारीत होत्या, आणि त्यांची धाकटी मुलगी 'शैला' उंबरठ्यावर आपला चिमुकला संसार थाटण्यांत दंग होती. उंबरठ्यावर तिनें एका ओळीनें आपल्या खेळांतलीं जनावरें मांडलीं, आणि आपल्याशींच 'रूसकी लढाई–हमारी लढाई' ही घोषणा देत ती आपल्या खेळण्यांत गढून गेली. तिला घरचीं सगळीं माणसें 'तोत्या' म्हणतात. 'तोत्या' खरेंच पोपटाप्रमाणें स्वतःशीच बोलत होती. तिच्याकडे माझें लक्ष गेलें तेव्हां मी हंसून म्हणालें. "बघा, ही देखील तुम्हां कम्युनिस्टांच्या घोषणा देते."

'तोत्या' लाजली आणि आईजवळ येऊन माझ्याकडे कुऱ्यानें पाहूं लागली. उषाताई म्हणाल्या, " कित्ती कित्ती स्लोगन्स् देते ही. आणि शेवटीं सगळीं संपून गेलीं म्हणजे 'डाऊन वुइथ राम थत्ते' असं म्हणते."

राम थत्ते हे एक कम्युनिस्ट कार्यकर्ते असून ते डांगे यांच्या घरीं रहातात. उषाताई पुढें सांगूं लागल्या, " डांगे मीरत खटल्यांत पकडले गेले, तेव्हां मला सातवा महिना गेला होता. मला 'रोझा' झाली तेव्हां आम्ही कामगार वस्तीच्या ऐन गाभ्यांत–नागू सयाजीच्या वाडींत–रहात होतों. त्या वाडींत 'रोझा' पांच वर्षे राहिली. तिचा नित्याचा खेळ असा होता कीं थाळी पिटून चाळभर दवंडी द्यावी, 'आज रोझा एस्. ए. डांगेचं व्याख्यान होणार आहे.' तिच्यावर कामगार चळवळीचे सारे संस्कार बिंबलेले आहेत. पण शैलाचं तसं नाहीं. मध्यम वर्गाच्या वातावरणांत वाढल्यामुळं तिच्यावर ते संस्कार पूर्णपणें आलेले नाहींत."

आपली निंदा चालली आहे, कीं स्तुति याचा कांहींच अंदाज न करतां आल्यामुळें शैला मला आपली जीभ दाखवून पुन्हा आपल्या चिमुकल्या संसाराकडे वळली.

उषाबाई हांसत म्हणाल्या, " अशी खोडकर आहे म्हणतां ! पण अगदीं तोता आहे बघा. परवां केळीं आणलीं होतीं, तेव्हां बग्याची आठवण झाली, आणि डोळ्याला पाणी आलं. आली जवळ नी मोठ्या वुद्रूकपणानं सांगायला लागली, 'ताई, रडूं नकोस हं, मी तुरुंगांत जातें. 'डी'ला टांग्यांत घेऊन येतें. पोलीसांना मारीन मी !' "

" डांगे तुरुंगांत गेले म्हणजे तुम्हाला वाईट वाटत असेल ?" मी विचारलें.

" वाटतं तर, पण त्याला उपाय काय ? आपल्या वाटण्यावर काय अवलंबून आहे ? गेल्या वीस वर्षांपासून बघतें मी त्यांचा हा खाक्या. तेव्हां वाईट तरी असं किती वाटणार ? पण पहिल्यावेळीं मात्र मला अत्यंत वाईट वाटलं." त्या सांगूं लागल्या– " तेव्हां मी सेवासदनमध्यें शिकत होत्यें. 'डी' नंच मला तिथं शिकायला ठेवलं होतं. तेव्हां आमचं लग्न पण व्हायचं होतं. चार मार्चला यांना पकडलं. त्याच पहांटेस मला तिकडे स्वप्न पडलं. मी सकाळीं चहा घेतला, नि इंदिरा देशपांडेकडे गेलें. इतर मुलींना सांगितलं, कीं त्या चेष्टा करीत. इंदिरेला स्वप्न सांगतांच ती म्हणाली, 'अग स्वप्नावर कां विश्वास ठेवायचा ?' नि ती माझं समाधान करूं लागली. पण तीन वाजतां खरोखरीच जोगळेकरांची तार आली. तेव्हां मात्र ती देखील माझ्याबरोबर रडली. स्वप्नाचा हा असा पडताळा आला."

इंदिरा देशपांडे म्हणजे आजचे कॉ.–नव्हे श्री. निंबकर यांची प्रथम पत्नी होय. पुढें कानपूर कटाच्या खटल्यांत डांगे यांना चार वर्षांची शिक्षा झाली. उषाबाई सांगतात– " या इंदिरानंच मला नंतर के. ई. एम्. मध्यें नर्सिंग शिकायला आणलं. गेली बिचारी ! सुटली !"

उषाबाईंच्या शिक्षणाची देखील मोठी गंमतच झाली. त्यांच्या शिक्षणाला घरच्या माणसांचा विरोध होता. उषाबाई सांगूं लागल्या, " माझे आजोबा आयुर्वेद-वैद्य. माझे काका वासुदेव विष्णु भावे नि बग्याचे वडील यांचा स्नेह. चांगला घरोबा होता आमचा त्यांचा. बग्याची बहीण क्षयानं आजारी होती, तिचं सारं काम मी करायची. त्यांतच हाही भयंकर आजारी झाला, तेव्हां त्याचंही नर्सिंग केलं होतं. बहीण गारली पण भाऊ जगला. त्यावर 'डी' चें म्हणणें असें आहे कीं 'रोगानं सोडलं पण सोनियानं पछाडलं.' हें एक दिवस म्हणतांच मला त्याचा फार राग आला ! पुढे त्यानं माझ्या मागं शिकायला जा म्हणून टुमणं लावलं. पण घरच्या माणसांच्या विरोधामुळं तिथं राहून शिकायला जाणं शक्य नव्हतं. तुम्हाला माहीत नाहीं, पण मी जेव्हां सेवासदनमध्यें दाखल झालें, तेव्हां वीस वर्षांची असून देखील मी मराठी चवथ्या वर्गांत बसलें होतें."

" मग आपण ही संधि साधलीत तरी कशी ?"—मी विचारलें.

"तें कांहीं विचारूं नका. काकांच्या कर्मठ घरून सेवासदनमध्यें जाणं शक्यच नव्हतं. तेव्हां एक युक्ति केली. सासूच्या घरीं जायला कांहीं काकांची मनाई नव्हती. तेव्हां सासूच्या घरीं गेलें रहायला, आणि तिथून मग मोठ्या युक्तीनं परवानगी मिळाली." त्या हंसत सांगूं लागल्या—"वग्यानं काय केलंन्, अगदीं वायकी अक्षरांत वायकी भाषेत पत्र लिहिलं. खोटं पत्र वरं का ! आणि दाखवलं सासूबाईला. म्हणे—जिथं शिकवायला पाठवायचं तिथं देवाधर्माचं देखील शिकवितात. विचाऱ्या सासूबाई ! फसल्या नि दिली परवानगी !"

"सासूबाईचा विश्वास असेल विचारीचा, म्हणून तिनं दिली परवानगी, पण सूनबाई शिकल्या त्या देवाधर्मासाठींच का ?" मी विचारलें.

"छे हो, 'डी'चं सारखं टुमणं लागलं होतं. नि माझं मला वाटत होतंच कीं ! माझा नाहीं रे बोवा देवावर विश्वास."—त्या उठून म्हणाल्या. स्वयंपाक-घराकडे एक नजर फेंकून त्या पुढें म्हणाल्या, "माझा देवावर विश्वास नसला तरी एखादे वेळीं वाटतं देवाविषयीं. हे तुरुंगांत गेले ज्यावेळीं, तेव्हां वाटलं मला !"

"अहो मग तो देव—'मॅक्स्वेल' !" मी म्हणालों.

—खेळायचा कंटाळा आलेली शैला त्यांच्या पायांत घोटाळत ढुणढुण करीत होती. तिला घेऊन त्या स्वयंपाकघराकडे वळल्या, आणि विचारूं लागल्या, "तोत्याला भूक लागली का ?"

उषाताई यांचें पहिलें लग्न वयाच्या चौदाव्या वर्षी झालें. त्यांच्या पहिल्या सासरचें आडनांव–आगलावे. पांच वर्षांनीं त्या विधवा झाल्या. त्याची हकीकत सांगतांना त्या म्हणाल्या, "त्या वेळची विधवांची करुण स्थिती आज नाहीं तुमच्या लक्षांत यायची. खरं सांगायचं म्हणजे 'डी' मुळंच माझ्या आयुष्याला नवं वळण लागलं. नाहीं तर कुठंतरी पोळपाट लाटणं घेऊन चूल फुंकीत वसल्यें असत्यें मी !"

"पण आज तरी कुठं तें चुकलं आहे ?" मी विचारलें. "वा ! छान ! पण दोहोंमधला फरक अगदीं दोन ध्रुवांसारखा आहे कीं ! त्यांनीं मला सनातनी वृत्तींतून बाहेर काढलं."

शैलाचें च्याऊ म्याऊ झालें होतें. धुतलेले हात आईच्या पदराला पुसत ती म्हणाली, "मी फुलं आणायला जाऊं ?"

" रस्त्यावर जाऊं नकोस, तोत्या. रोझा आली म्हणजे जा हं !" त्यांनी असें म्हटलें तरी 'जाईन जा' असें उत्तर देऊन शैला निसटलीच. जिन्यावर दडदड पावलें वाजलीं. तेव्हां उषाबाई ओरडून म्हणाल्या,—"तोत्या, रस्त्यावर जाऊं नकोस, माळी रागवेल वरं !"

"तोत्याच्या कानांवर हे शब्द पडले देखील नसतील." मी म्हणालों.

"अशी अवखळ आहे ही ! पण कसं वरं वाटतं या मुलींच्यामुळं. कुठं काम करायला निघालें तर सारखी यांची काळजी असते. तुम्ही म्हणालांत ना मघाशीं वाचनाचं, तें हें असं चाललं आहे. आमचे गुरुजी तुरुंगांत. मुलांचा सांभाळ व घरची जवाबदारी; या अशा आयुष्यामुळं मला कांहीं करतां आलं नाहीं. मात्र मला चळवळीचं सबंध ज्ञान नसलं तरी कुठं काम निघालं कीं मी करीत असतें."

"म्हणजे पतीच्या पावलावर पाऊल टाकूनच कीं नाहीं ?"

"तसंच कांहीं म्हणतां येणार नाहीं, पण हें सारं 'डी' मुळंच झालं असं म्हणायला कांहीं हरकत नाहीं."

मी त्यांचे हे उद्गार टिपून घेऊं लागलों तेव्हां त्या पुन्हा गंमतीनें म्हणाल्या, "पण सगळंच श्रेय त्यांना द्यायचं नाहीं हो ! सनातनी वृत्तींतून मला बाहेर काढल्याचं श्रेय त्यांना द्या, पण तें देखील विधवा म्हणून ! मी कुमारिका असत्यें तर?"

"मग तुमचं डांग्यांच्याबरोबर लग्नच झालं नसतं."

"तें मात्र मी कबूल करत्यें. पण गंमत काय झाली, जेव्हां त्यांनीं पहिल्यांदा मला लग्नाबद्दल विचारलं, तेव्हां मला त्यांचा भारीच राग आला होता.—आठ दिवस बोलल्यें नाहीं मी त्यांच्याशीं ! वाटलं बग्यानं असं 'भयंकर' विचारलं तरी कसं ?—आणि नंतर ऑक्टोबरमध्यें जेव्हां आमचं लग्न झालं, तेव्हां डॉक्टर केतकर यांनीं आपल्या 'पुणें समाचारांत' बातमी देतांना छापलं होतं— 'भयंकर माणसाबरोबर लग्न करणारी स्त्री !' तें वाचून मात्र माझंच मला हसूं आलं. कमाल ग बाई डॉक्टर केतकरांची ! गृहस्थ दुसऱ्या दिवशीं मुद्दाम अभिनंदन करण्यासाठीं आला."

या त्यांच्या पुनर्विवाहानें त्यांच्या माहेरच्या नातेवाईकांत खळबळ उडाली.

पैशाची लालूच दाखविण्यांत आली, विवाह घडून येऊं नये म्हणून आकाश पाताळ एक करण्यांत आलें. पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. त्यांच्या सासूबाई 'रोझा' झाल्यावर एकदां त्यांना भेटायला आल्या होत्या. त्यांना या लग्नाच्या बाबतींत विचारण्यांत देखील आलें नव्हतें.

गंमत अशी कीं उषाताईंना आपल्या लग्नाची नक्की तारीख आठवली नाहीं. त्या आठवण करूं लागल्या.—कॉम्रेड थत्ते नुकतेच बाहेरून आले होते. त्यांना विचारूं लागल्या.—" आठवते का रे राम तुला माझ्या लग्नाची तारीख ?"—थत्ते नुसते हंसले. मीहि पण हंसू लागलों तेव्हां त्या म्हणाल्या, " मला लग्न झाल्याचं आठवतं, पण तारीख कांहीं नक्की आठवत नाहीं. मागं एकदां मी त्यांना विचारलं पत्रांतून, तेव्हां त्यांनीं पत्र देखील पाठवलं तुरुंगांतून—' तुला तारीख कशी आठवत नाहीं ?'—थांबा सांगत्यें मी लग्न केव्हां झालं तें ! १९२७ च्या ऑगष्ट मध्यें असावं. 'डी' मे मध्यें सुटून आले. गंमत काय झाली, परवां येरवड्यास होतों ना आम्ही तेव्हां नर्गीसनें सोलीकडून 'डी' ना माझ्या लग्नाची तारीख विचारली. व ती माझी लग्नतिथी साजरी करण्यासाटीं पार्टी देऊन आश्चर्यचकित करणार होती मला. पण मीच तिला सांगितलं कीं माझ्या लग्नाला आतां तेरा वर्षं झालीं !"

शाळेंतून आलेली रोझा आपल्या आईचे हे आठवणीचे प्रयोग पाहून हसूं लागली. थत्ते देखील सिगारेटवरची राख झटकीत मोकळेपणानं हंसले. हातांत लाल फुलें घेऊन येणाऱ्या शैलाला वाटलें, आपल्याकडे बघूनच ही वडी मंडळी कुटाळक्या करीत आहेत. ती गाल फुगवून जरा गंभीरपणानेंच खोलींत शिरली, आणि एका इवल्याशा, खेळांतल्या फुलदाणींत तीं लाल फुलें कोंबण्याचा प्रयत्न करूं लागली.

या तेरा वर्षांच्या काळांत त्यांच्या संसारी जीवनांत विविध घडामोडी घडून आल्या. लग्न झालें, संसार थाटला. सुरवातीला उषाताई नौकरी करीत. पतीच्या चळवळीशीं त्यांचा संबंध नव्हता. पण तसा प्रत्यक्ष संबंध आला मीरत खटल्यांत डांगे यांना गोंवण्यांत आल्यावर.

उषाबाई सांगूं लागल्या—" मला आठवतो तो दिवस ! त्या दिवसानंच माझ्या आयुष्यांत हें असलं परिवर्तन झालं. तुमचे डांगे मात्र खूप आंतल्या गांठीचे. पकडायच्या आदल्या दिवशीं एका टेक्स्टाईल मॅनेजरच्या भेटीला गेले हे. बरोबर मी होतें. परत येतांना त्यांनीं विचारलं, 'समज, उद्यां मला पकडलं तर तूं

काय करशील ? रडशील ?' मी उत्तर दिलं, 'तें कांहीं सांगतां यायचं नाहीं मला !'

"— दुसरे दिवशीं सकाळींच दारावर 'टकटक' वाजलं. मी आवाज ओळखला. त्यांना सांगितलं. ते म्हणाले, सांग झोप लागली म्हणून ! मी तसं सांगितलं. पण आमचे पटवर्धनसाहेब, सी. आय्. डी. इन्स्पेक्टर का ऐकणार ? म्हणाला—'आधीं दार उघडा. मी भेटतों आणि मग खुशाल निजा !'— डांगे उठले, आणि दार उघडतांना म्हणाले, 'आतां बारा वर्षांची तयारी समज !' "

" बरं मग पुढं काय झालं ?" मी विचारलें.

" त्यांना झाली ना शिक्षा बारा वर्षांची—पण ते आपले म्हणायचे आपण बुवा एकोणवीसशें पस्तीसमध्येंच सुटून येणार !"

" मग आलेच कीं !" रोझा म्हणाली.

उषाबाई पुढें सांगूं लागल्या—

" हिचा तेव्हां जन्म देखील झाला नव्हता. आमच्या पटवर्धन साहेबाचा थाट काय विचारतां ? सारी चाळ वेढलेली होती. आमच्या खोलीपुढं तोंड करून मशीनगन रोखलेली. एका युरोपियन सार्जंटनं दुसऱ्याला विचारलं, 'या ठेंगू माणसाला पकडायला कशाला मशीनगन हवी ?'

"—आमचा ठेंगोबा म्हणतो काय, —'माझ्यासाठीं नव्हे. लोकांनीं प्रतिकार केला तर असावी आपली सोय,—म्हणून आणली !'

उषाताईंना व्यक्तींच्या नांवांचें लघुकरण बनविण्याची गंमतीची खोड दिसते. त्या डांगे यांना जितक्या सहजपणें 'बग्या' म्हणत होत्या, तितक्याच सहजपणें त्या पटवर्धन यांना 'पव्या' म्हणत होत्या. त्या म्हणाल्या, " 'पव्या'साहेबांची ऐट काय विचारतां. तीन चार तास झडती झाली, तेव्हां मी चहा करण्याची परवानगी मागितली, पण ती देखील द्यायला तयार होईना गृहस्थ. मग दुसरे सी. आय्. डी. इन्स्पेक्टर होते, त्यांनीं मध्यस्थी केली. मी स्वयंपाक केला. आम्ही जेवायला बसलों. तेव्हां पुन्हा स्वारी माझ्या जवळ येऊन म्हणाली, 'काय उषाताई, कांहीं जेवणांत भलतं सलतं तर कालवलं नाहीं ना ?'

" मी म्हणालें, 'आतां बारा वर्षें जातील येवढंच ना ? मग त्यासाठीं मी कशाला कांहीं कालवूं अन्नांत ? आमच्या सुखांत माती कालवणाऱ्यांना दिसेलच

पुढं, कीं बारा वर्षांनीं हे परत येतील आणि आम्ही परत सुखानं नांदूं !— क्रॉनिकलमध्यें आली होती ही हकीगत. ...

" त्या वर्षी गिरणगावांत होळीला नारळ फुटला नाहीं येवढं दुःख झालं होतं कामगारांना आपले पुढारी पकडल्याचं !"

" तुमच्या आयुष्यांत हाच अत्यंत दुःखाचा प्रसंग असेल ?"—मी विचारलें.

" दुःख नाहीं वाटलं फारसं मला. पुढं वाटलं शिक्षा झाली तेव्हां. शिक्षेचं वर्तमान ऐकलं तेव्हां तर भोंवळ येते कीं काय असं वाटलं होतं !" त्या सांगूं लागल्या, " हा प्रसंग सांगत्यें याचं कारण, याचमुळं माझ्या आयुष्याला हें आतांचं वळण लागलं !—नागू सयाजीच्या वाडींत रहात होतों आम्ही. तिथं सुमारें ऐंशी हजारांची सभा भरली. रणदिवे, देशपांडे हे मागें उरले होते. कामगारांमधून हांक आली, ' डांग्यांच्या बायकोला बोलवा.' मी खालीं आल्यें. तो विशाल जनसमुद्र पाहून माझं अंतःकरण अभिमानानं भरून आलं."

त्या सभेंत उषाबाई बोलल्या नाहींत. पण लागलीच तीन चार दिवसांनीं लालबागला सभा झाली तेव्हां " मी पहिलं भाषण केलं,"– असें त्या सांगतात. कामगार ओरडूं लागले, ' बाईला बोलायला सांगा.' रणदिवे म्हणाले, ' बोला सुचेल तें.' आणि उषाताई बोलल्या त्यांना सुचलें तें !

कामगारांची सार्वत्रिक संपाची धमकी पोकळ ठरविण्यासाठींच मीरत कटाच्या खटल्याची उभारणी असावी असाही संशय त्या अटकेच्या वेळीं घेण्यांत येत होता. परंतु डांगे प्रभृतींच्या अटकेनंतर चार पांच दिवसांनींच दीड लक्ष कामगार शांतपणें व शिस्तीनें गिरण्यांबाहेर पडले. १४४ कलम पुकारण्यांत आलें. पुढारी गेले म्हणून कामगार मागें हटले नाहींत. त्यांनीं आपले नवे पुढारी निवडले. उषाबाई सांगूं लागल्या,—" पुढाऱ्यांच्या धरपकडीमुळं कामगारांत येवढी देखील चलबिचल झाली नाहीं. वीस तारखेला ' डी ' ला पकडलं, व दुसऱ्या दिवसापासून मला हजारों कामगार स्त्रीपुरुष भेटायला येऊं लागले. तें मला फारं अघटित वाटलं. भेटायला येणाऱ्या कामगार स्त्रियांनीं मला गूढांत टाकलं. त्यांच्यासाठीं मी या चळवळींत भाग घेऊं लागलें असं म्हटलं तरी चालेल."

स्त्री कामगारांनीं, १९२८ च्या संपानंतर झालेले ७२ लहान संप व युनियनची वाढ यांत, कशी धडाडी दाखवली, याचें वर्णन करायला उषाताईंनी

प्रारंभ केला. कामगार स्त्रिया सभांमध्यें भाग घेत, पिकेटिंग करीत; कित्येकींनीं तर सभेमध्यें भाषणें देखील केलीं. पिकेटिंग करणाऱ्या कामगार स्त्रियांच्या हातांतील केरसुणी पाहिल्यानंतर कोणत्याहि संपफोड्याला गिरणीच्या दरवाजांत पाऊल टाकण्याची छाती होत नसे. उषाताईनीं त्या संपाआधीं स्थापन झालेल्या मिल कमिट्यांमुळें गिरणीमालकांच्या काळजांत धस्स कां होत होतें, याची गमतीची सत्यकथा सांगितली.—" एका नायकिणीनं आमच्या कामगार बायांना कांहीं घाणेरडी शिवी दिली. लागलीच बायकांनीं घेरलं तिला अन् आणली युनियनमध्यें !– ' डी 'नं तडजोड केली. नायकिणीनं माफी मागितली. व दंड म्हणून मोरबागच्या मारुतीच्या देवळांत एक घंटा बांधली."

मिल कमिट्यांच्या या सामर्थ्याचा चक्काचूर करण्याच्या विचारानेंच गिरणी-मालक १९२९ सालीं विस्तवाशीं खेळूं लागले. उषाबाई त्या संपामधल्या स्त्रियांच्या पराक्रमाच्या कथा रसाळपणानें सांगत होत्या.––"तारीख नाहीं आठवत, पण कुंभार चाळींत एक प्रचंड सभा भरली होती. ते पावसाळ्याचे दिवस होते पहा !"

थत्ते मध्येंच म्हणाले, " ताई, बारा जुलै !"

" होय, बारा जुलै. बरोबर कांहीं आठवत नाहीं मला. ती सभा मोडून टाकण्याचा पोलीसांचा उद्देश होता. सशस्त्र पोलीस आणले. रणदिवे, देशपांडे यांना सभा मोडण्याचा हुकूम केला. त्यांनीं ऐकलं नाहीं म्हणून त्यांना कैद केलं. पण कामगारांनी सभा चालूच ठेवली. पोलीस जबरदस्तीनं सभा मोडण्याचा प्रयत्न करूं लागले, तेव्हां मात्र एक विलक्षण सिनेमा झाला. पोलीस पुढं पळताहेत, आणि स्त्रिया छत्र्या घेऊन पाठलाग करताहेत. पोलीसांनीं झाडलेल्या पिस्तुलामुळं दोन कामगार जखमी झाले."

रोझा विचारूं लागली,—" पिस्तुल धरल्याची गोष्ट याच संपांतली कां ग ?"

" हां, खरंच," आठवण करून उषाताई म्हणाल्या,––" याच वेळीं एक मोठी गंमत झाली. एका सार्जंटनं कामगारांवर पिस्तुल रोखलं, पण––एका तरुण कामगार स्त्रीनं एका सार्जंटचं मनगट धरलं, आणि म्हणाली, " मेल्या ! आमच्या पोरांना मारतोस ?" लागलीच पांच पन्नास बायका धांवल्या व घेरलं त्याला. त्याचं पिस्तुल हिसकावून घेतलं आणि दिलं फेंकून."

या संपांत उषाताईंनी देखील आपल्या नव्या प्रेरणेप्रमाणें कार्याला प्रारंभ केला होता. लालबागमधल्या व्याख्यानानंतर त्या लौकरच वाडियामध्यें बाळंत झाल्या, व त्यांना रोझा झाली. तिचें नांव रोझा ठेवण्याचें कारण असें, कीं मिरतच्या तुरुंगांत जेव्हां डांगे यांना मुलगी झाल्याचें कम्युनिस्टांना समजलें तव्हां रोझा लुक्झेंबर्गचा स्मरणपूर्वक सन्मान करण्यासाठीं तिचें नांव 'रोझा' ठेवलें.

उषाताई दवाखान्यांतून परत आल्या व कामाला लागल्या. पतीचें कार्य पुढें चालविणें हें आपलें कर्तव्य आहे असें त्यांना वाटत होतें.—"आणि शिवाय त्या बाया होत्याच ना! बाप रे, काय त्यांचा तो आवेश! काय त्यांचा तो अवतार!" उषाताई सांगूं लागल्या, "टाटा मिलमधली एक रमी नांवाची कामगार होती. ती गळ्यांत पट्टा घालून पिकेटिंग करायची फाटकावर. एक दिवस ती माझ्याकडे आली व म्हणाली, 'काय वाटेल तें होऊं दे आई, पण मी त्या मेल्याला उद्यां आंत जाऊं देणार नाहीं.'—एक पार्शी अधिकारी तेथून जातांना हिच्या पिकेटींगला हांसत असे. ही बया दुसरे दिवशीं चांगला पांच पानांचा विडा खाऊन गेली व तो आला तेव्हां त्याच्या पांढर्‍या शुभ्र पोशाखा-वर पचूकन् थुंकली. सांगा आतां कसा जाणार तो आंत?"

आम्ही सारेच हसलों. रोझा टाळ्या वाजवून म्हणाली, "छान, छान! गंमत झाली असेल!"

"त्या संपांत साठ बायका पकडल्या गेल्या. त्यांचा प्रत्येकीं तीस रुपये जामीन मागितला. पण बायका नाकबूल झाल्या. महिन्या दोन महिन्यांच्या मुलांच्या आया होत्या त्या! युनियननं सोडवलं त्यांना. पण अटकेंत असतांना त्यांनी दिवसभर पोलीसांना जीव नकोसा करून टाकला होता."—उषाताई पुढें सांगूं लागल्या.

"नवर्‍यांचे बिचार्‍यांचे हालच म्हणायचे!" मी आपलें मत दिलें.

"वा, वा, असं कांहीं नसतं हो!"—उषाताई निषेध करून म्हणाल्या.

"तुम्ही पुरुष आपला मोठेपणा बघतां. खरी अडचण आम्हां बायकांचीच असते. मुलं सांभाळून चळवळ करणं केवढं कठीण, याची कल्पना आहे कां तुम्हाला? नवर्‍याचे हाल म्हणे! नवर्‍यांना त्या मदत करीत होत्या."

उषाताई स्वतः काय केलें तें सांगतच नव्हत्या. त्याची मी त्यांना आठवण

दिली, तेव्हां त्या म्हणाल्या, " माझं काय, मी हिला काखोटींत मारून चाळी-चाळींतून सकाळ संध्याकाळ सभा घ्यायची. माझं कसलं हो घेऊन बसलांत ? पण त्या कामगार बायांचा उत्साह अगदीं भयंकर वंडरफुल ! संपांत कामगारांच्या बाया आल्या कीं कोणालाच दाद देत नाहींत. त्यांचं स्वतःचं डोकं चालतं. टेहेळणी ठेवणं त्या स्वतःच्या अक्कलहुशारीनं करीत. देशपांडे, रणदिवे यांना दादर कोर्टांत शिक्षा झाल्या तेव्हां या बायकांनीं लागलीच पोलीस लॉरीला गराडा दिला व रणदिवे, देशपांडे यांनीं भाषण करावं म्हणून आग्रह धरला. पोलीस नमले, व त्यांनीं त्या दोघांना भाषणं करूं दिलीं."

उषाताईंचा या संपांत वाटा होता. संघटना करण्याचें व व्याख्यानें देण्याचें काम त्यांनी लहानगी ' रोझा ' संभाळून देखील केलें. पुढें त्या पियर्सन कमिटी-पुढें साक्ष द्यायला देखील गेल्या होत्या.

उषाताईंना त्यांच्या स्वतःच्याबद्दल मी विचारीत होतों आणि त्या सांगत होत्या कामगार बायांची हकीगत ! मी म्हणालों, " मिरत खटल्यांतल्या तुमच्या कांहीं आठवणी सांगा कीं ! "

रोझा कंटाळून म्हणाली, " आई, आतां आधीं जेवण आणि मग सांगत बसा ! "

उषाताईंनी ' तोत्या 'चा फुलांचा गुच्छ हातीं घेत म्हटलें, " आपण आतां इथंच थांबवूं ! उद्यां याच वेळीं आलांत तरी चालेल."

संध्याकाळीं त्यांना वेळ नव्हता. कुठल्याशा सभेंत त्यांचें व्याख्यान व्हायचें होतें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी जाऊन पोंहचलों तेव्हां त्या घरगुती कामांत व्यग्र होत्या. " उद्यां डांग्यांच्या भेटीला जायचं तेव्हां थोडीफार तयारी करत बसलें. आपलं दुहेरी काम चालू ठेवूं."

त्यांच्या चेहेऱ्यावर आनंदाचें पाणी खेळत होतें. पाठीवर लोळणाऱ्या त्यांच्या केसामध्यें ' तोत्या 'चीं इवलीं बोटें आपलीं घरटीं बांधीत होतीं.

मी विचारलें, " तुमची ही कांहीं पहिलीच वेळ नव्हे भेटायला जायची. तरीपण कालच्यापेक्षां आज विशेष आनंदित दिसतां तुम्ही. अगदीं पहिल्या भेटीच्या वेळीं तुम्हाला असाच आनंद झाला होता ? "

" तें कसं सांगूं मी ? 'डी'च्या पहिल्या तुरुंगाच्या वेळीं त्याचं माझं लग्न झालं नव्हतं. अन् शिवाय त्याचं माझं लग्न होईल असं मला तेव्हां वाटलं देखील नव्हतं. " कानपूर कटाच्या चार वर्षांच्या शिक्षेंत एकदा सुद्धा त्याला भेटायला जातां आलं नाहीं मला ! मिरतला मात्र मी दर वेळीं भेटीला जायची ! तिथं एक म्हातारी न्हाविण होती. तिच्या घरीं उतरायची मी. ती मला 'कमला की मा'— म्हणायची. मोठी वस्ताद बाई ! रहायचं आठ रुपये भाडं घेईन म्हणायची आणि परत येतांना या 'कमला'च्या हातांवर सहा रुपये ठेवून द्यायची." उषाबाई मिरतच्या म्हातारीचाच इतिहास सांगूं लागल्या. मी त्यांना आठवण दिली,— " आपल्याला मिरत खटल्याच्या वेळच्या आठवणी सांगायच्या आहेत."

" त्यांत काय आहे सांगण्यासारखं ? ही मुंबईची 'टगे आणि कंपनी' तुरुंगांतून कोर्टांत येतांना इंटरनॅशनल गात येत असे. कोर्टांत त्यांना बसायला बाकं दिलेलीं होतीं, तिथं बसायचे हे सारे. अगदीं कॉलेजमधला 'सीन' बघा. प्रोफेसर पुढं बसलेला. व हे सारे हुषार विद्यार्थी ऐटींत बसलेले. हळूहळू एकेक पसार व्हायचा. बाहेर एक हॉटेल होतं, तिथं जमायचे एकेक ! तिथं चहा प्यायचे, गप्पा मारायचे आमच्याशीं. जज्जाच्या लक्षांत आलं म्हणजे त्यानं दम भरायचा पोलीसांना. त्यांनीं मग हीं पोरं गोळा करून कोर्टांत हांकलत न्यायचीं !" उषाताई हांसत सांगत होत्या; " नाहींच जमलं बाहेर जायचं तर तिथंच बुदबळं खेळत बसायचं. भेटीची वेळ आली, कीं ज्याची बायको आली असेल, त्याला उलट तपासणीच्या वगैरे भानगडींतून मुक्त करायचं. भेटीसाठीं एक वेगळी खोली दिलेली होती. तिथं आम्ही भेट घेत असूं. माझ्या बरोबर मिरजकराची बायको देखील असायची. पण तो फारच लाजाळू. अहो, आम्हांला लाजायचा आम्ही बोलत बसलों तर. शेवटीं आम्ही सगळे बाहेर जाऊन त्याला आंत पिटाळीत असूं."

" म्हणजे त्यावेळीं तुम्हाला डांगे यांच्या तुरुंगवासाचं तेवढं कांहीं वाटलं नसेल ?" मी विचारलें.

" फारसं वाटलं नाहीं. पण शिक्षा झाली तेव्हां मात्र फार फार वाईट वाटलं. मात्र क्षणभरच हो ! कारण ज्यावेळीं यांच्याशीं लग्न केलं तेव्हांच मी ठरवून टाकलं होतं, कीं हे आपले तुरुंगाचे ! या चळवळ्याच्या पायांत आपली

वेडी थोडीच टिकून रहाणार आहे ?" त्या जरा गंभीर होऊन सांगूं लागल्या, "तुम्हाला ठाऊक नाहीं, पण ज्या दिवशीं आमचं लग्न झालं, त्यांच्या दुसऱ्या दिवशींच खडकपूरची तार आली यांना.—हे गेले !"

डांगे पकडले गेले, यानें देखील आपल्या मनाला एका परी 'रिलीफ' आणि नवा उत्साह मिळाल्याचें त्या सांगतात. हातांत कंदील, सोबतीला एक स्वयंसेवक घेऊन भिरत डिफेन्स कमिटीचें काम त्या रात्रीच्या वेळीं चाळी चाळींत हिंडून करीत. त्या वेळीं एका दिवसांत कामगारांनीं पगाराच्या दिवशीं या डिफेन्स फंडाला सात हजार रुपये जमवून दिले होते. "कामगारांच्या झोंपड्या झोंपड्यांतून चार चार आणे मिळाले, पण शंभर रुपये ब्लॉकवाल्या बायकांच्याकडे जावं तर म्हणत, 'पुरुष घरीं नाहींत, मग या.' आपण म्हणावं, 'भाजींतले द्या कीं चार आणे.'—तर उत्तर मिळायचं, 'नाहीं.' याच्या उलट कामगारांच्या बायका !" त्यांनीं मला एकेक अनुभव सांगायला सुरुवात केली.—या फंड जमविण्याच्या बाबतींत त्यांना आलेल्या अनुभवांचें वर्णन त्या मोठ्या गंमतीनें सांगूं लागल्या. पांढरपेशा वर्गांतल्या बायकांनीं त्यावेळीं आपली केलेली उपेक्षा त्या हंसत हंसत सांगूं लागल्या.

अगदीं सुरवातीला त्यांना भेटलें तेव्हां त्यांनीं, "महिला मंडळ, भगिनी समाज, इत्यादि बरोबर आपलं नाहीं जमायचं" म्हणून कां सांगितलें होतें हें आतां माझ्या लक्षांत आलें. त्या म्हणाल्या होत्या, "ते इस्त्री कशी करावी, झबलं कसं शिवावं याचे वर्ग नकोत आम्हांला. अधिकाऱ्यांच्या बायकांचे सन्मान करण्यांत आणि आपसांत पुढच्या खुर्चीसाठीं भांडण्यांत कोण वेळ घालवील ? त्यांना तुम्ही म्हणा, गिरणगांवातल्या चाळींतून काम करायला या. तर म्हणतील, 'सहा वाजतां कसं जायचं ? कामगार दारुडे असतात. तीन चार वाजतां गेलं तर नाहीं का जमणार ? संध्याकाळीं फिरायची वेळ असते.'—अहो मनांतच नसतं मुळीं !"

"कामगार दारुडे असतील, पण नीच नाहींत." त्या सांगत होत्या. "मी सांगतें, चार वर्षं मी नागूसयाजीच्या चाळींत राहिलें. अगदीं दारू पिवून आले, तरी 'आई' म्हणून नमस्कार करावा. अगदीं परवांची गोष्ट सांगतें मी. मी आमच्या जी. के. यु. वर्गणी साठीं गेल्यें तेव्हां दोघे जण भांडत होते. आणि

चिक्कार प्यायले होते. मी म्हणालें, ' अरे, आतां तुम्ही प्यायलेले आहांत. उद्यां शुद्धीवर आलांत म्हणजे न्याय करूं !' तेव्हां एकजण म्हणाला, ' आई तूं न्याय करशील ?' " रोझा मधेंच हंसून म्हणते, "मला देखील आठवतो तो त्यांचा अवतार. अगदीं कसं हसूंच येतं." "त्यापैकीं एकजण म्हणाला, 'मी कांहीं दारू प्यायलों नाहीं. शुद्धीवर आहें मी.'—पण लागलीच वसकण मारली त्यानं !"

त्यांचा तेव्हांचा तो संवाद आठवला मला. मी त्यांना विचारलें, " पण पांढरपेशा वर्गांतल्या तुमच्या ओळखीच्या बायकांनीं तुम्हाला सहानुभूति दाखविली असेलच कीं !"

" माझं एकटीचं काय घेऊन बसलांत ? आम्हाला आमच्या 'कॉज'ला सहानुभूति हवी. मग तशी सहानुभूति त्या मीरतच्या म्हातारीनं थोडी का दाखविली ? ती मला आपली मुलगी मानायची. डी सुटावा म्हणून साधु वैराग्यांना शकुन विचारायची ! ज्या दिवशीं डी ला शिक्षा झाली ना, त्याच्या आदल्या रात्रीं तर तिनं एक मजाच केली." उषाताईनीं आपल्या पुढचा खलबत्ता बाजूला सारला, आणि त्या म्हातारीची गंमत सांगायला उंबरठ्यावर येऊन उभ्या राहिल्या. " तोत्या, जरा मावशीला म्हणावं येवढी चटणी कुटून दे. अहो, खास तुरुंगमान्य आहे ही चटणी. डीला फार आवडते." उषाताईना लोकांना कामाला जुंपण्याची कला बरीच अवगत दिसते. त्यांच्याकडे आलेली त्यांची बहीण कामाला लागली, आणि उषाताई माझ्याशीं गप्पा मारायला आतां खुर्चीवर येऊन बसल्या. " काय बरं सांगत होतें मी ?"—

रोझानें आईच्या आठवणीला उजाळा दिला. उषाताई सांगूं लागल्याः — " त्या मिरतच्या म्हातारीनं आदल्या रात्रीं सुनेला फर्मान सोडलं दहिवडे तयार करण्याचं—उद्यां कमलाच्या बाबूजींना शिक्षा होणार आहे.—तशी आमच्या बऱ्याची खाण्यापिण्याची फारशी मिजास नाहीं." " पण सूनबाईनं दहिवडे केले त्याचं काय झालं ?" मी गाडी रुळावर आणण्यासाठीं विचारलें.

" त्याचं बरं विचारलंत. दहिवडे राहिले जागच्या जागीं. सकाळीं म्हातारी माझ्या आधीं तयार झाली होती. पण त्या दिवशीं आम्हांला कोर्टांत येऊं दिलं नाहीं. अगदीं कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. एका सी. आय्. डी. नं आम्हाला यांना बारा वर्षांची शिक्षा झाल्याचं कळविलं." हें सांगतांना आतां जरी त्यांचे मुद्रेवर

क्लेशाचें किंचित् देखील चिन्ह दिसत नसलें, तरी त्यावेळीं मात्र त्यांना जमीन फिरत आहे असें वाटलें होतें. बारा वर्षें तुरुंगवास म्हणजे काय, याची कल्पना प्रत्यक्ष अनुभवानें काय ती येऊं शकते.

त्या वेळीं लागलीच त्यांनीं तुरुंगाकडे धांव घेतली. जेलरजवळ कायदा होता. भेटी व्हायला सुपरिंटेंडेंटची परवानगी हवी होती. ती मिळवतांना त्याच्या बायकोनें या डांगे–जोगळेकरांच्या बायकांबरोबर दाखविलेली सहानुभूतीच कामीं पडली. सुपरिंटेंडेंटनें नियमाला वळसा घालून परवानगी दिली. इकडे तुरुंगांत ही 'डांगे आणि कंपनी' जेलरशीं हुज्जत घालत होती. त्यांना सी क्लास दिलेला होता. ते पोशाख बदलायला तयार नव्हते. त्या म्हाताऱ्या न्हाविणीची दुसरीच धडपड चाललेली होती. जेलच्या दारावरची माती व दोन आण्याचे पैसे याची पुरचुंडी बांधून तिला डांगे यांचा स्पर्श व्हावा, अशी तिची खटपट होती. तिचें म्हणणें असें कीं या टोण्याच्या योगानें डांगे तुरुंगांतून बारा वर्षांच्या आधीं सुटलेच पाहिजेत. उषाताईंना हें तिनें आधींच बजावून ठेविलें होतें. पण त्या विसरल्या म्हणून ती कांहीं विसरली नाहीं.– म्हणाली, "मेरा मा का दिल है !"

उषाताई सांगूं लागल्या, "त्यांना सी क्लास दिला होता. आधींच फार धष्टपुष्ट, त्यांत तो पोशाख. डोक्यावर तांबडी टोपी. मला गंमतहि वाटली नि उद्वेग पण वाटला. डी म्हणाला, 'काय ठीक आहे ना ? आपण तर बुवा पस्तीस सालीं सुटणार !'

"बाहेर आले तेव्हां जेलर म्हणाला, 'हे सी क्लासचे कपडे असे असतात.'

"मला राग आला त्याचा—मी ताडकन् उत्तर दिलं, 'मी कांहीं कपड्यांशीं लग्न केलं नाहीं.'"

"हिअर्, हिअर," म्हणून रोझानें टाळ्या वाजवल्या. तुरुंगाचीं सुखदुःखें उषाताईंना स्वतःला समजायला फार वेळ वाट पहावी लागली नाहीं. १९३४ च्या संपांत त्यांना स्वतःला अटक झाली होती.

या संपाची सुरुवात गोल्डमोहोर व टाटा मिल्स मधून झाली. यावेळीं उषाताई चाळींचाळींतून हिंडल्या. त्यांनीं संपाचा प्रचार केला. या संपाचें स्वरूप उग्र होऊं लागतांच घारीसारखी झडप घालून पटापट आठ पंधरा दिवसांत साऱ्या पुढाऱ्यांना सरकारनें उचलून नेलें. सैतान चौकीजवळ पोलीसांनी गोळीबार देखील

केला एका मिरवणुकीवर. जखमीं झालेल्या कामगाराच्या रक्तानें सदरा भिजवून एका कॉम्रेडनें सांगितलें, " हा पहा आमचा लाल बावटा ! "

यावेळीं उषाताईंना विना चौकशी दोन महिनें तुरुंगांत अडकवून टेविलें होतें. त्या म्हणाल्या, " त्यावेळीं मी रोझाला नेली नव्हती तुरुंगांत. मनोरमा शिंदेनं आमच्या घरीं राहून तिला संभाळलं. रोझा आजारी पडली म्हणून मला तुरुंगातून मुक्त करून कांहीं दिवस नगर शहरांत स्थानबद्ध करून ठेवलं. संप मिटल्यावर सोडलं. "

उषाताईंना दुसरी अटक १९३९ ऑगस्टमध्यें विटिया संपाच्या वेळीं झाली. पण त्यांना लागलीच जामीनावर सोडण्यांत आलें. तो खटला वर्षभर चालून त्यांना शेवटीं दंडाची शिक्षा झाली. विटिया मिलचा संप हा कामगार स्त्रियांची कर्तबगारी आणि पराक्रम यांचा जिवंत इतिहास होय. गिरणी बंद करून ती पुनः नव्या नांवानें पगारकाट करून चालू करण्याचा मालकांचा इरादा होता. कामगारांनी सकाळीं नोटीस वाचली कीं गिरण बंद होणार. मॅनेजरला ती परत घेण्याबद्दल विनंति केली. पण त्यानें नकार दिला. कामगार नेहमींप्रमाणें दुपारीं सुट्टींत बाहेर गेले व कांहीं तरी मनसुबा ठरवून आले. एक वाजतां साचे लोटले व पांचच मिनिटांत बंद पडून सर्वत्र सामसूम झाली. या बाबतींत भाव कपातीबद्दलचें जुनें गाऱ्हाणें होतेंच. त्यासाठीं दोन दिवस आधीं सभाहि घेतली होती. पण नोटीस अकल्पित स्वरूपाची होती. कामगार खवळले. त्यांनीं मुळीं गिरणीबाहेर पडण्याचेंच नाकारलें. स्पिनींग मास्तरकडे तक्रार केली तर त्यानें मॅनेजरकडे बोट दाखवलें. उषाताई म्हणाल्या, " पण आमच्या बायका कांहीं कमी नव्हत्या. त्यांनी त्या मास्तरचा पाठलाग केला. सगळे एका खोलींत दडून बसले. रात्रभर कामगारांनीं फाटक अडवून धरलं. पुरुष आपापल्या खात्यांत जाऊन बसले आणि आठशें कामगार बायांनीं पुढाकार घेतला.—पोलीस आले होते; पण त्यांना वाटलं, कीं संध्याकाळ झाली कीं जातील निघून. पण त्या कसल्या वस्ताद ! "

" पोलीसांनीं संध्याकाळ नंतर जास्त कोशीस केली. युनियनमध्यें त्याच सुमारास बातमी पोहोंचली. बायकांनीं पोलीसांना बजावलं, 'वाटल्यास गोळीबार करा, पण आम्ही हालणार नाहीं.' रात्रभर ही बैठी आघाडी सांभाळण्यांत आली. गिरणीच्या एका मालकाला एका खोलींत टेबलाखालीं बसून रात्र काढावी लागली.

दोन गोण चणे कुरमुरे आले. दुसऱ्या दिवशीं तडजोड झाली. मालकानें लवादा-पुढें केस मांडण्याचें कबूल केलें. व तोंपर्यंत गिरण बंद राहिली. त्यांतच लढ्याला सुरुवात झाली.

"मालक चोरून नवी भरती करणार असं समजलं मात्र, बायकांनीं पिकेटिंगला सुरुवात केली. त्या मुळीं भांडल्याच पुढाकार घ्यायला. सगळ्या बायका फाटकापुढें येऊन बसल्या. पोलीसांनी तिथून हुसकावण्याचा प्रयत्न केला तर जरा पुढं जाऊन बसल्या. संपफोड्यांच्या लॉऱ्या आल्याची कुणकूण कानीं येतांच पुन्हा फाटकावर धडकल्या. डे. कमिशनर सिथनें टियर गॅस वापरण्याची धमकी दिली. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. संपफोड्यांना मी समजावलं तेव्हां ते वळले, व आमच्या कामगारांच्या संरक्षणानं त्यांना लोअर परेळ स्टेशनवर नेण्यांत आलं तेव्हां त्या दिवसाचा प्रसंग टळला." उषाताईनीं विटियाची कहाणी साता उत्तरीं सुफळ करून सांगितली.

तिकडे 'शैला' आणि 'रोझा' यांची कांहीं तरी कुरबूर झाली असावी. कारण दुसऱ्या खोलींतून अगदीं गळा काढून रडत शैला तिथें आली आणि म्हणाली, "मी तेवढं देत्यें, ती मात्र देत नाहीं."

तिचे डोळे आपल्या पदरानें पुसत उषाताई कळवळून म्हणाल्या, "रोझ्या, देग तिला!" "काय देऊं?" रोझा ओरडली. "तिला माग म्हणावं." शैला हुंदके देत पुन्हा रोझाकडे गेली. विटिया मिल मधल्या संग्रामाची फलश्रुति देखील कांहींशी अशाच स्वरुपाची झाली होती.

प्रत्येक कारखाना हा आपला किल्ला बनविला पाहिजे या मंत्राची दीक्षा घेतलेल्या ब्रिटियामधल्या बायकांच्या पराक्रमाच्या आठवणी उषाताई आणखी सांगूं लागणार तोंच मी त्यांना मधेंच अडवलें—

"तुम्ही तुरुंगांत असतांना डांगे कधीं तुम्हाला भेटले का?"

"तें कसं होणार? तें भाग्य माझ्या वाट्याला यायचं!—आज चवदा वर्षें पहात्यें, चटणी कुटारे, चिवडा करारे—हा असा त्रास आहे!"—उषाताई वहिणीनें कुटलेल्या चटणीची परीक्षा करीत सांगूं लागल्या. "त्रास म्हणजे खरा त्रास नाहीं हो! नाहींतर तेवढंच लिहून घ्याल, आणि छापून टाकाल—डांग्यांची बायको नवऱ्याच्या तुरुंगवासाला कंटाळली. तेवढं मात्र नाहीं हं. त्यांना सोसाव्या

लागणाऱ्या त्रासाच्या मानानं हें आमचं काय ? संसाराचं गाडं हें असंच असायचं !"

"तुम्हाला स्वतःला तुरुंगांत कांहीं त्रास झाला कीं नाहीं ?"—मी विचारलें.

"डिटेन्यु असल्यामुळें सक्त कामाबद्दल छळ नाहीं, एवढेंच. पण इतर त्रास, विशेषतः मानहानीचा फार जाचतो. यावेळीं ही तोत्या होती ना जवळ ! तिचे फार हाल झाले. तिला मी तुरुंगांत नेलं तेव्हां मेट्रन पहिल्यांदा कशी पण गुरांवली—'लहान मुलीला कशाला आणलीत बरोबर ?' मुलीचें दूध गरम करायला शेगडी सुद्धा प्रथम देईनात. असा नाझी–निष्ठुरपणा तिला सोसावा लागला. शेवटीं ती आजारी पडली. भिंताडाच्या आंत आहे तोंवर पोर सुधारणार नाहीं असें दिसतांच, राम बरोबर तिला बाहेर पाठविली. तेव्हां ती सुधारली. आम्हा संसारी लोकांच्या या यातना तुम्हाला समजायच्या नाहींत."

मेट्रनला मात्र घरगुती अडचणी समजल्यावर ती ममताळूपणानें वागूं लागली. तुरुंगांत उषाताईबरोबर मीनाक्षी कऱ्हाडकर, गोदू गोखले, नरगीज बाटलीवाला या तीन कॉम्रेड बंदिनी तर होत्याच, पण शिवाय वैयक्तिक सत्याग्रहाच्या बंदिनी देखील होत्या. प्रेमा कंटक आणि लक्ष्मीबाई ठुसे यांच्याशीं उषाबाईची ओळख होती. तिथला अनुभव सांगतांना उषाताईंनी नमस्काराची टाळी वाजवली आणि म्हणाल्या, "काय ग बाई तिथले अनुभव नी गंमती ! कॉंग्रेसच्या बायकांचा अगदीं तिरंगी कार्यक्रम होता. चरखा, प्रार्थना नि खाणं. नाहीं म्हणायला लक्ष्मीबाई–वैद्य होती, तीच काय ती वाचायची. इतर आपल्या चरखा घेत नि बसत. आमच्या प्रेमाताई खादी इन्स्पेक्टर होत्याच. चॉडी खादीची आहे कीं नाहीं, चादर खादीची आहे कीं नाहीं, सारी तपासणी करायची ती. एका म्हाताऱ्या बाईजवळ तिनं स्वतः काढलेल्या सुताचं एकच पातळ होतं. इतर कपडे मिलचे होते. झालं ! या साऱ्या बायकांनी फाडून खाल्लं तिला. तीन नातवंडांची आजी होती ती. बराक बंद झाली, कीं शैलाला घ्यायची आणि कहाणी सांगत बसायची." उषाताईंनी नगरच्या सत्याग्रही स्त्रियांची स्तुति केली. तेव्हां मी विचारलें, "तुमचा सामान्य गुन्हेगार स्त्रियांशीं संबंध आला होता का ?"

"पुष्कळ !"—आणि त्यांनी एक दोन उदाहरणें सांगितलीं. जन्मठेपेच्या

शिक्षेबद्दल नापसंती दर्शवून त्या म्हणाल्या, " एक अठरा एकोणीस वर्षांची मुलगी नवऱ्याचा खून करून आली. तिला वीस वर्षें शिक्षा म्हणजे अमानुषच नव्हे का ? या बाबतींत मला येवढंच म्हणायचं आहे कीं एकवेळ त्यांना वाटल्यास फांशी द्या. पण हा जिवंत नरकवास भोगायला लावूं नका. माझं स्वतःचं मत फाशीची शिक्षा रद्द करावी असं आहे. अहो, त्या तरुण मुलीला जन्मभर तुरुंगांत डांबून ठेवायचं म्हणजे काय ? तिलाहि मन आहेच. "—

" पण अशांवर दया दाखविल्यानं खुनाला उत्तेजन नाहीं का मिळत ? "

" गुन्हे करणारे करतातच. तीन चार मुलं असलेल्या बायका देखील नवऱ्यांना मारतात. "

" कारण ? "

" दुसऱ्याशीं प्रेम जमतं म्हणून ! "

" मग काडीमोड करावी. "

" तें शक्य नसतं. पहिला नवरा पैसे मागतो आणि तुमचा समाज आडवा येतो. "

" समजा तुमच्या हातीं अधिकार दिला तर तुम्ही काय कराल ? "—–

" माझ्या हातीं अधिकार आला तर मी तुरुंगांतले कठोर नियमच बदलून टाकीन. नियम म्हणजे तरी किती कडक आणि मूर्खपणाचे ! येरवड्याला एकाच तुरुंगांत आई आणि मुलगा असून देखील त्यांना कधींहि भेटायला मिळालं नाहीं. दोघेंही विचारीं अर्ज करकरून थकलीं. "—–उषाताई जरा निश्चयानें पुढें म्हणाल्या—– " आणि वकील, एक गोष्ट तुम्ही विसरतां, माझ्या हातीं अधिकार आला तर मी मुळीं अशा गुन्हेगारीचं मूळच नष्ट करून टाकीन. पण त्यासाठीं आजची समाजरचना सोवियट सारखी करावी लागेल. "

या तुरुंगवासांत त्यांच्याबरोबर कॉंग्रेसमधल्या सोबतिणी असल्या तरी त्यांच्यामध्यें एकमेकींना जवळ आणणारी विचारांची एकवाक्यता नव्हती. तसें म्हटलें तर उषाताईंनीं कांग्रेसला कायदेमंडळाच्या निवडणुकी लढविल्या तेव्हां मदत केली. पुण्याच्या नाना आणि भवानी पेठांतून लक्ष्मीबाई ठुसे आणि गुप्ते यांनाच एकजात मतें पडलीं याचें श्रेय कुणीहि घेवोत. परंतु त्या कामगारांच्या पेठांतून निवडणुकीचा प्रचार करण्यासाठीं दररोज संध्याकाळीं थाळी पिटून कॉर्नर

मीटिंग घ्यायची कामगिरी उषाताईंनीं उत्साहानें सांभाळली.

त्या सांगूं लागल्या, "आम्ही त्यावेळीं पुण्याला रहायला गेलों होतों. सात वर्षांच्या तुरुंगवासानंतर थोड्या विश्रांतिसाठीं म्हणून ते पुण्याला गेले, तेव्हां कांहीं तरी कार्य आपल्या हातून घडावं म्हणून मी देखील तिथल्या 'देशसेविका संघांत' जायचं ठरविलं. पण पहिल्यांदां त्या मला लालबावटेवाली म्हणून दचकल्या. मुळीं घ्यायलाच तयार होईनात त्या मला. तरी वरं माझी पूर्वीपासून कांग्रेसला सहानुभूति होती. १९३० च्या चळवळींत मी कॉंग्रेसबद्दल वरीच सक्रिय सहानुभूति दाखवली. त्यामुळें आमच्या लोकांनीं 'डी'ला कळविलं देखील होतं, तुझी बायको मिठाचा सत्याग्रह करणार आहे म्हणून ! पण तें त्याला कांहीं खरं वाटलं नाहीं."

मी मध्येंच विचारलें, "त्या चळवळींत कम्युनिस्टांनी भाग घ्यायला हवा होता, नाहीं?"

त्या म्हणाल्या, "होता तर, आणि कामगारांनी घेतलाच कीं. जनतेवरील गोळीबार व धरपकडीविरुद्ध किति तरी संप त्यांनी केले. मिठाच्या पुडीने आणि पिठ्यांच्या पिकेटिंगने लोकांची क्रांतीपासून दिशाभूल होते व त्या मार्गानं स्वातंत्र्य कधींच मिळणार नाहीं ही कम्युनिस्टांची टीका कॉंग्रेस पुढाऱ्यांना झोंवे. पण ती रास्त नव्हती का? बहुतेक कम्युनिस्ट पुढारी मीरतला डांबून ठेवले होते. नवे पुढारी संघटनेच्या खटपटींत होते. तसे सरदेसाई-सारखे गेलेच कीं तुरुंगांत."

त्यांना आठवण देण्यासाठीं मी मधेंच प्रश्न विचारला,—"मग शेवटीं घेतलं कीं नाहीं संघांत तुम्हाला?"

"घेतलं एकदाचं. पण त्यानंतर देखील कोण कटकटी. अहिल्यादिनाच्या वेळीं मी 'वीणादास' या बंगाली क्रांतिकारक मुलीच्या शौर्याची माझ्या भाषणांत प्रशंसा केली. झालं ! लक्ष्मीबाईची फिर्याद, प्रेमाबाईची चौकशी, विचारूं नका अगदीं ! पण निवडणुकीच्या वेळीं आम्हींच त्यांना लालबावट्याची करामत शिकवली. नाना, भवानी पेठेंतलीं कामगारांचीं व इतर मतें एकजात कॉंग्रेसला पडलीं त्यांत या लालबावटेवालीच्या कार्याचें बेलफूल होतंच. आम्हीं लालबावटेवाले कॉंग्रेसला, कॉंग्रेस राजवटींत देखील दारूबंदी, साक्षरताप्रसार अशासारख्या विधायक-कार्यांत पूर्ण सहकार्य देत होतों. पण जिथं जिथं कॉंग्रेस सरकारांनीं प्रतिक्रांतिकारक कृत्यें केलीं, तिथं तिथं लालबावटेवाल्यांना त्यांचा

विरोध करणं भाग पडत असे. विहार मधल्या किसानांची चळवळ मारून टाकण्याच्या ईर्ष्येनं तिथल्या कॉंग्रेस मंत्रीमंडळानं कोणत्याही प्रतिगामी सरकारला साजेशीं कृत्यें केलीं. मग मुंबई सरकारची या बाबतींत कसं मागं राहील ? त्याचा प्रतिगामी स्वरूपाचा ट्रेड डिस्प्यूट ॲक्ट म्हणजे कामगारांच्या मूलभूत हक्कावरच गदा आणणारा होता. याचा निषेध करण्यासाठीं कामगारांनी ७ नोव्हेंबरला संप केला, आणि "—उषाताई पुढं सांगूं लागल्या, "सैतान चौकीवर झालेल्या गोळीबाराची हकीकत आम्हाला जी. के. यू. ऑफीसमधें समजली. आम्ही गोळीबाराच्या जागीं गेलों. चिडलेले कामगार पोलिसांवर विनाकारण केलेल्या गोळीबाराचा प्रतिकार करण्यासाठीं चालून जात होते. तिथंच सभा घेण्यांत आली. मी माझ्या भाषणांत त्यांना तसं करण्यापासून परावृत्त केलं. त्या दिवशीं बहिरू चव्हाण आणि वाघमारे कामीं आले. बहिरूचं प्रेत गुपचूप जाळण्याचा अधिकाऱ्यांचा बेत होता. हें साधण्यासाठीं त्याच्या बायकोला पैसे देऊन समजाविलं असंही कानीं आलं. मी तिच्या खोलीवर गेलें. बिचारी वीस बावीस वर्षांची पोर भांबावून गेलेली. मी तिच्या नवऱ्याची वाखाणणी केली, आणि खरी परिस्थिति समजावून सांगितली. याचा परिणाम असा झाला, कीं— तिनं लागलीच प्रेत लाल बावट्याखालीं जाईल असा हट्ट धरला. शेवटीं रात्रीं दोन वाजतां आमच्या ताब्यांत प्रेत मिळालं."

१९२८ मधें पर्शुराम जाधव असाच मेला होता, आणि बाबू व पापामिया हे फांशी गेले होते. त्यांच्याहि आठवणी त्या सांगूं लागल्या. बहिरूच्या बायकोच्या वयाचीच पापामियाची बायको होती. तो फांशी गेल्यावर ७–८ दिवसांनीं ती दवाखान्यांत बाळंत होऊन तिला मुलगी झाली होती. पण तेव्हां उषाताईंना जेवढें वाईट वाटलें, त्याच्यापेक्षां कितीतरी अधिक आतां बहिरू चव्हाणाच्या त्या पोरसवदा बायकोकडे बघून वाटलें होतें.

उषाताईजवळ बसलेल्या रोझाकडे पहात मी विचारलें,—"या तुमच्या मुलांचा सांभाळ करायचें सोडून तुम्ही कशाला राजकारणांत पडतां ?"

"तशी माझी महत्वाकांक्षा देखील नाहीं. पण हे लोक मला स्वस्थ बसूं देतील तर ना ? हें माझं असं झालं आहे आज काल ! डेटेन्यू फंड गोळा करा, अमकी सभा घ्या, तमक्याची तुरुंगांत भेट घ्या,—काम करणारी कुणी

सांपडली तर हे लालबावटेवाले तिला कांहीं स्वस्थ वसूं द्यायचे नाहींत."

"डांगे यांची बायको म्हणून सारे तुमचा मान करतात, दुसरं काय?" —मी म्हटलें.

"पण तें मात्र मी कबूल करायला तयार नाहीं हं! साऱ्याच लालबावटे-वाल्यांच्या बायका कुठं काम करतात?"

"पण सारेच लालबावटेवाले कुठं डांगे आहेत?" — दारावर आलेलीं कागदांचीं फुलें घेण्याचा शैलाचा हट्ट पुरा करण्यासाठीं त्या उठल्या. त्यांच्या सदा प्रसन्न घरकुलांत कधीं दुःखच होत नसेल का? यांच्या संसारी आयुष्यांत नेहमींच आनंदाचे क्षण सांठवलेले असतील का? मी मनाशींच एक प्रश्न योजून ठेवला. 'उषाताईंच्या आयुष्यांतला अत्यंत सुखाचा क्षण कोणता? लग्न झालं तो?'

आणि त्याचें उत्तर पहा कसें मिळालें,—"बग्या सुटला ना पहिल्यावेळीं तेव्हां खूप आनंद वाटला होता. आमचं रिमॅरेज झालं, त्या दिवशीं ठाकुरद्वारला कमलाकर पटवर्धन आहेत ना त्यांच्याकडे राहिलों. दुसरे दिवशीं आमच्या वाडेकर बिल्डिंगमधल्या खोलींत आलों तर आपली खडकपूरची रेल्वे संपाची तार हजर! झालं, निघाला बग्या जायला! हा आमच्या सुखाचा क्षण! त्या वेळीं गंमत काय झाली ठाऊक आहे का तुम्हांला? दर स्टेशनवरून बग्याचीं बगीला पत्रं यायचीं. मला कधीं लाज वाटायची पण आनंद देखील होत असे."

"तसा आनंद आतां पत्रं आलीं म्हणजे वाटतो का?"

"आतां परवां देवळीला असतांना त्यांनी माझा जुना १९२४ मधला फोटो मागवला. त्यावेळीं साऱ्या जुन्या आठवणी एकदां मनांत येऊन गेल्या." भिंतीवर टांगलेला त्यांचा जुना फोटो आणि प्रत्यक्ष त्या यांत बरीचशी विसदृशता दिसत होती. मी तसें म्हटलें देखील. तेव्हां त्या हंसत म्हणाल्या, "मी आतां काकूसारखी खालीं बसत्यें, म्हणजे तरी मग जुन्या फोटोसारखी दिसेन कीं नाहीं?"

त्या खालीं बसल्या तरी काकूसारख्या मात्र दिसल्या नाहींत. डांगे यांच्या जुन्या फोटोकडे बघून त्या म्हणाल्या,

"फोटोंत दिसतो कसा गुंड, पण फारच शांत स्वभाव. कधीं रागवत नाहीं. सदा हंसतमुख. लहान मुलांचं कौतुक फार. रोझाला नेहमी म्हणायचा, 'या साऱ्या कामांतून मोकळीक मिळाली म्हणजे आपण नकलांचा धंदा करूं या

रोझा. '—पण मला मात्र याचा हा स्वभाव पाहिला म्हणजे राग येतो कधीं कधीं. आपलं सुख वघायचं नाहीं, दुःख बघायचं नाहीं. सहज एकदां बोललें, तर वग्या म्हणूं लागला, ' हार तुरे घालून मिरवतांना आणि डांगे साहेब की जय ऐकतांना बरं वाटतं, मग तुरुंगाचं कां ओझं वाटावं ?'—मी आपलं माझं ठरवून टाकलंय, हा डी कांहीं आपला नाहीं. तुरुंगाला आंदण दिलंय त्याला. म्हणूनच कधीं दुःख वाटत नाहीं मला. पण क्वचित वाटतं, आम्ही स्वतःच्या मुलांकडे पाहिलं नाहीं, मर मर मेलों, पण—"

उषाताईनीं चटकन गोष्ट बदलली.—"डी किती साधा आहे, व्यसन कोणतंच नाहीं. सिगरेट देखील ओढीत नाहीं. पोषाखाचा देखील शोकी नाहीं तो."

रोझा खुदकन हंसली, आणि आपल्या वडिलांच्या पोशाखाचें वर्णन करूं लागली. "काय तें त्यांचं धोतर, तें काळं शर्ट, आताशीं कुठं पँट घालायला लागले ते."

मी रोझाला हंसत म्हटलें—"पण एकंदरींत तुझ्या वडिलांचं एक व्यसन भयंकरच !"

उषाताई म्हणाल्या, "कोणतं ? मागं त्यांच्यावर नाहीं नाहीं ते आरोप करण्यांत आले होते. आतां तुम्ही करा."

त्यांच्या घराच्या फाटकावर S. A. Dange अशी पाटी आहे. त्या पाटीवर कुणीतरी R हें अक्षर लिहून ठेवलें होतें. तें मी त्यांच्या लक्षांत आणून म्हटलें, "S. A. Danger वाटतात याचं कारण हें लालबावट्याचं व्यसन!"

बापाच्या कैवाराला मुलगी धावून आली; "कुणी तरी चावटपणा केलाय तो. डी कांहीं तसा नाहीं. तुम्ही भेटलांत त्यांना म्हणजे कळेल तो कसा आहे तें!"

उषाताईना मला आतां शेवटचाच प्रश्न विचारायचा होता. पण त्या प्रश्नाचं उत्तर त्यांनीं डांगे यांची भेट घेतल्यावर दिलें.

"डांगे यांच्याबद्दल तुम्हाला काय वाटतं हें एका वाक्यांत तुम्ही कसं सांगाल ?"

डांगे यांना भेटून उषाताई परत आल्या त्या जरा चिंतातुर मनानेंच ! वर्तमानपत्रांतून डांग्याच्या प्रकृतिमानाची बातमी प्रसिद्ध झालेली होती. रक्त-

क्षयाचा विकार झालेल्या त्या अशक्त वामन मूर्तीला तुरुगांतच ठेवण्याच्या बाबतींत सरकार अजूनही जिद्दीस पेटलेलें आहे.

माझ्या प्रश्नाला उत्तर देतांना उषाताई जरा गंभीर झाल्या. त्यांचें अंतःकरण आंतून भरून आल्यासारखें झालें. त्या तुटक वाक्यें बोलत असतांना त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. त्यांनीं चष्मा काढला व डोळे पदरानें पुसले आणि चष्मा पुसत त्या बोलूं लागल्या-- "तुमचा हा शेवटचा प्रश्न मोठाच विचित्र आहे. खरं म्हटलं तर तसं मला कांहीं सांगतां यायचं नाहीं. आमची दाट मैत्री आहे वीस वर्षांपासनं. पण डांगेबद्दल तुम्ही विचारतां तसं—माझ्या भावना अत्यंत--पण मला नाहींच सांगतां यायचं. माझ्या भावना डांगेबद्दल काय आहेत यापेक्षां त्यांच्या माझ्याबद्दल कशा आहेत हें मी सांगूं शकेन. ते घरीं असले, म्हणजे मी कधीं त्यांच्यावर रागावतें, चिडतें, पण त्यांच्यामुळेंच मी ही अशी जी काय असेन ती झालें आहे. त्यांच्याबरोबर गेलीं वीस वर्षें घालविलीं, त्यांच्या सुखांत भागीदारीण झालें. दुःख त्यांनी एकट्यानींच सोसलं. मद्रासमधें दौरा केला तेव्हां लग्न समारंभांतल्या सोहळ्याप्रमाणं आमच्या मिरवणुकी निघाल्या. पण आज तुरुंगांत ते एकटेच आहेत. मी आतांपर्यंत बऱ्याचशा आठवणी तुमच्याजवळ सांगितल्या, त्या जुन्या वीस वर्षांच्या आठवणींनीं माझ्या जीवनाला उजळा आला असं वाटलं. माझ्या डोळ्यांत आतां पाणी आलं म्हणून माझी हिम्मत खचली असं समजूं नका. रडण्यांत मला कमीपणा वाटत नाहीं. मी रडलें म्हणून माझी मिरतच्या वेळीं कित्येकांनीं बदनामी केली होती. पण मी उघडपणें रडल्यें नव्हत्यें. बारा वर्षांची शिक्षा झाली असं ऐकलं तेव्हां डोळ्यापुढं अंधेरी आली होती.—पण रात्रीं मात्र खूप रडलें. बिछान्यावर पडून रोझ्याकडे पाहून अभिमान वाटत होता, वाईटहि पण वाटत होतं.—आतां देखील मी रडलें. पण ते तुरुंगांत आहेत म्हणून नव्हे. गेल्या वीस वर्षांच्या आठवणी काढून मी डोळे पुसल्यें त्यांत मला कमीपणा वाटत नाहीं. माणसंच रडतात, रडायला हृदय असावं लागतं." आणि त्या हंसायला लागल्या.

हंसतमुख उषाताईंना अश्रूंची खरी किंमत समजली. सुखदुःखाच्या गिरीदरी चालून शिणलेली ही प्रवासिनी आपला जीवनपथ शोधून विशाल क्षितिजाकडे जायला निघालेली आहे असें मनाला वाटूं लागतें.

१८ मे १९४२



"मी खोटा अहंकार बाळगत नाहीं. पण जी कांहीं थोडीफार माझ्या हातून कामगार वर्गाची सेवा घडली याला कारण छगनचे वडील! संसार कृत्याचं एक अंग या दृष्टीनं मी त्या लढ्यांच्या प्रसंगांकडे पाहिलं. कोणतीहि महत्त्वाकांक्षा बाळगून मी राजकारणांत लक्ष घालूं लागलें नाहीं. पतीच्या कार्यांत आडकाठी आणण्याची कल्पनाच मला सहन झाली नाहीं आणि म्हणूनच त्यांच्या-वरचा भार शक्य तों हलका करण्यासाठीं मी त्यांच्या पावलावर पाऊल टाकूं लागलें. त्यांनाहि नवा हुरूप चढला. परिणाम असा झाला कीं मी स्वतः जातीनं मजुरांच्या चळवळींत लक्ष घालायला लागलें." इंदिराबाईंनीं माझ्या प्रश्नाला उत्तर दिलें.

माझा प्रश्न असा होता कीं, 'वर्गकलहाचें तत्त्वज्ञान अंगिकारण्यासाठीं त्यांची मनोभूमिका कशी तयार झाली? त्यांनीं कोणकोणते ग्रंथ वाचले?' कारण इंदिराबाईंचें बालपण गणपतराव लोथे ई. ए. सी. या पुनर्विवाहित सरकारी हुद्देदाराची मुलगी या नात्यानें वैभव आणि अधिकार यांची चव घेण्यांत गेलेलें! —पण विवाहबद्ध झाल्यानंतर इंदिराबाईंनीं आपल्या जीवनांतला एक महान् ग्रंथ अभ्यासिला. पतीचे विचार, त्यांचे आचार यांचा परिणाम त्यांच्यावर होऊं लागला. त्यामुळें पतीच्या कार्यांत 'मम' म्हणून हातभार लावण्याचें पत्नीचें कर्तव्य त्यांनीं आरंभिलें.

" परंतु या तुमच्या कार्यांत तुम्हांला तुरुंगवास घडेल असं नाहीं वाटलं कधीं ?" मी विचारलें.

" वाटलं तर ! पण त्यासाठीं अडून बसण्याची कल्पना मात्र मला शिवली नाहीं. तशी तुरुंगवासाबद्दल माझी थोडी विचित्र कल्पना होती. म्हणूनच जेव्हां हे पहिल्यांदा तुरुंगांत गेले तेव्हां अश्रू ढाळल्याविना माझा एकहि दिवस सुना गेला नाहीं. अगदीं आकाश कोसळल्यागत वाटलं. पण आतां या दहाबारा वर्षांत सर्वच कडुगोड अनुभव आले. माणूस टक्केटोणपे खाऊन शहाणं होतं. तसंच झालंय माझं !"

माघांतली कडाक्याची थंडी बोलूं देत नव्हती. अशा वेळीं संध्याकाळीं आठाच्या सुमारास मी राममाऊ रुईकर यांचें दार ठोटावलें. शेजारींच माझे मित्र गणपतराव दिघे रहातात, त्यांच्या दाराशीं इंदिराबाई बोलत उभ्या होत्या. मला बघून त्या म्हणाल्या, "मुली इथंच आहेत. अग बेबी, तुझे मास्तर आले आहेत !"

" आतां कांहीं मी बेबीचा मास्तर नाहीं, तेव्हां कोण भेटतो तिला ?— मी आलोंय तुम्हांला भेटायला !"

" मला ?" त्या आश्चर्यचकित झाल्या.

आम्ही त्यांच्या मधल्या घरांत गेलों. बेबीहि आपल्या जुन्या शिक्षकाशीं दोन गप्पागोष्टी करण्याच्या इरादानें आली. माझ्या जुन्या परिचयाचा बालदोस्त छगन आतां पाढे घोकण्याइतका हुशार झालेला होता. त्यानें आम्हां सर्वांकडे पाहिलें. आपल्या घोकंपट्टींत आमच्या आगमनानें व्यत्यय आल्याचें त्याला वाटत होतें.

बेबी माझ्या हातांतला चित्राचा अंक हिसकावून घेऊं लागली. तेव्हां मी तिला लटक्याच रागानं म्हणालों,

" मॅट्रिकचा अभ्यास करायचा सोडून हीं वर्तमानपत्रं वाचतेस ?"—पण तिनें केव्हांच अंक लुबाडला होता.

मी इंदिराबाईंना म्हणालों, "माझं काम जरा निराळ्या स्वरूपाचं आहे. याच चित्राच्या अंकांत भाई रॉय यांच्या पत्नीची मुलाखत आहे ती आपण वाचा. मला आपली तशीच मुलाखत हवी."

" मुलाखतीचं बरं विचारलंत ! मी का मुलाखत द्यायची ?—मुलाखत देणारे तुरुंगांत जाऊन बसलेले आहेत."—इंदिराबाई गंभीरपणानें म्हणाल्या. त्यांच्या स्वरांत खेदाचा लवलेश देखील नव्हता.

" पण जे तुरुंगांत जाऊन बसले आहेत ना त्यांच्याचविषयीं मला तुमची मुलाखत हवी आहे."—मी त्यांना माझ्या मुलाखतीचें स्वरूप समजावून सांगितलें आणि त्यांना वेळ मागितला.

"या मग उद्यां दुपारीं !" असें म्हणून त्यांनीं आपल्या पतीसंबंधीं सांगायला सुरुवात केली. छगन आणखी पुढचे पाढे लिहून घेण्यासाठीं म्हणून वहिणीकडे गेला तेव्हां तिनें ' मला माझा अभ्यास नाहीं वाटतं ?' म्हणून उलट त्यालाच प्रश्न विचारला. त्यानें आपल्या आईच्या भोवतीं पिंगा घालून पाहिला, पण ती त्याच्या वडलांविषयीं तिला वाटणारा आदरभाव व्यक्त करण्यांत रंगून गेलेली होती. मी नुसता ऐकत होतों.

माझेंहि लक्ष घड्याळाकडे होतेंच. मी मुलाखतीसाठीं वेळ मागायला म्हणून आलों आणि अर्धीअधिक मुलाखत मिळवून देखील टाकली.

चुलीपाशीं ताटकळत बसलेल्या इंदिराबाईंच्या सासुबाई त्यांना बोलवायला आल्या तेव्हां कुठें त्या भानावर आल्या. त्या म्हणाल्या, " बरं मग या उद्यां दुपारीं !"

दुसऱ्या दिवशीं मी दुपारच्या वेळीं गेलों तेव्हां त्यांनीं एलन रॉयची चित्रांतली मुलाखत वाचून काढली होती. मला बघतांच त्या म्हणाल्यां, " आतांच मी ही मुलाखत वाचून संपवली.

" मला इतर कार्यकर्त्यांच्या आणि पुढाऱ्यांच्या बायकांची फारशी माहिती नाहीं. पण मी मात्र माझ्या पतीच्या पायांतली बेडी नाहीं हें अभिमानानं सांगूं शकतें. त्यांच्या कर्तबगारीचे पंख छाटून टाकण्याची कल्पना मला स्वप्नांतहि शिवली नाहीं. उलट त्यांच्या कार्याला मी हरतऱ्हेनं सहाय्य केलेलं आहे."

मी खुर्चीवर बसलों होतों पण त्या खालीं चटईवरच बसल्या. खोलींत विठ्ठलभाई पटेलांची एक भव्य प्रतिकृति टांगलेली होती व त्याच आकाराची एक रुईकर यांची देखील ! खोलींत थाटामाटाचें वातावरण नसून एक प्रकारचा साधेपणा होता.

इंदिराबाई या स्वभावानं साध्या आणि निगर्वी आहेत असें सांगण्याची देखील गरज भासायची नाहीं इतका त्यांचा पोशाख साधा आणि बोलणं नम्र ! बरें, त्या नम्रतेंत कृत्रिमपणाचा लवलेश देखील सांपडायचा नाहीं. पोशाखांत देखील तसाच कृत्रिमपणाचा अभाव ! 'पति हाच स्त्रीचा एकमेव अलंकार असतो. तिची शोभा वाढविण्यासाठीं इतर अलंकारांची गरज नसते.' या वाक्याची आठवण चाळिशी उलटून गेलेल्या इंदिराबाईंना बघून होते.

इंदिराबाईंच्या शेजारीं बसलेल्या त्यांच्या सासूबाईंना मात्र मी नव्यानेंच पाहत होतों. पण त्या माऊलीच्या गौरवर्ण मुद्रेवर एक प्रकारचा तेजस्वीपणा झळाळत होता. आनंदीबाईंना आपल्या मुलाच्या कर्तबगारीच्या कथा सांगतांना अभिमान वाटत होता. आपल्या सुनेचें कौतुक करण्यांत आनंद वाटत होता.

पण नवलाची गोष्ट ही कीं ही सासूसुनेची जोडी कामगार चळवळीविषयीं येवढी माहितगार असली तरी तद्विषयक चळवळींसंबंधीं कोणतेहि ग्रंथ त्यांनीं चाळलेले नाहींत. केवळ रामभाऊ रुईकर यांच्यावरील प्रेमामुळेंच त्या या चळवळीविषयीं आत्मीयता दाखवूं लागल्या. इतकेंच नव्हे तर इंदिराबाई या केवळ आपल्या घरकुलांत रममाण न होतां कामगारांच्या लढ्यांत पतीच्या आदेशानें भाग घ्यायला सरसावल्या.

गेल्या दहाबारा वर्षांत खुद्द इंदिराबाईंनीं देखील कांहीं लढ्यांत स्वतः भाग घेतला आहे. १९३३ च्या मॉडेल मिल्सच्या संपाच्या वेळीं इंदिराबाई जेव्हां होम मेंबरच्या बंगल्यावर नेण्यांत येणाऱ्या मोर्चाचें नेतृत्व स्वीकारायला बाहेर पडल्या तेव्हां त्यांच्या सासूबाई आपल्या मुलाला म्हणाल्या, "अरे ही तुरुंगांत गेली तर हा पोरवडा कुणी सांभाळावा ?"

आईनें आपल्या मुलाला हटकलें तें एका अर्थी बरें होतें. एकामागून एक तीन तुरुंगवास भोगून घरीं परत येतो काय नि स्वतःच्या डोक्यावर अटकेची कुऱ्हाड लोंबत असतांना आणखी आपल्या पत्नीलाहि तुरुंगाची वाटचाल करायला शिकवतो काय ?--तिला हें सारें नवीन होतें. माझ्याजवळ आतां मोठ्या अभिमानानें आनंदीबाई आपल्या मुलाचें कौतुक सांगूं लागल्या, "तेव्हां तो म्हणाला,--' आई, तूं जा रुईला, मी बघेन या मुलांचं !'"

इंदिराबाई म्हणाल्या, "म्हणणं सोपं असतं. पण समजा, त्यावेळीं मला शिक्षा

झाली असती तर सासूबाईंनांच सगळं संभाळावं लागलं असतं; कारण त्यांना लवकरच तुरुंगांत जावं लागलं. इतकंच नव्हे तर पुढं त्यांनीं शिवनी जेलमध्यें उपास देखील केला."

--पण त्यावेळीं इंदिराबाईंना जरी अटक झाली तरी तासाभरानें त्यांना त्यांच्या घरीं आणून पोंहचतें केलें आणि मग तिकडे मिरवणुकीवर घोडे नाचविले.

परंतु त्यांना लढ्यांची खरी कल्पना राजनांदगांव येथें १९३८ मध्यें आली. त्या लढ्यासंबंधीं सांगतांना त्या म्हणाल्या, "राजनांदगांवच्या लढ्यांतले अनुभव हे माझ्या आयुष्यांतले भाग्याचे क्षण वाटतात मला. माझ्या आयुष्यांतली अत्यंत आनंदाची घटना जर कोणती म्हणून विचाराल तर मी चटकन् सांगेन--त्यांचा राजनांदगांवचा उपवास. एकंदर एकोणीस दिवस त्यांनीं उपवास केला."

"पण त्यांच्या उपवासानं तुम्हांला आनंद वाटला याचं मला आश्चर्य वाटतं !"

"म्हणजे असं बघा. वास्तविक तो प्रसंग सुखदायक होता अशांतला भाग नाहीं. वास्तविक त्या उपवासामुळं मला दुःख व्हायला हवं होतं. पण उलट मला आनंद झाला, त्या उपवासामुळं त्यांचं जीवन विशाल झालं असं मला वाटतं. कारण कामगारांच्या कल्याणासाठीं त्यांनीं तेव्हां आपले प्राण पणास लावले होते."

"राजनांदगांवच्या लढ्यांत तुम्हांला बरेच असाधारण अनुभव आले असतील ?" असें मी विचारलें तेव्हां त्या म्हणाल्या, "अनुभव आले पण ते असाधारण नव्हते. त्यांना राजाच्या आईनं उपवासाच्या दिवसांत ब्राम्हणाकरवीं चोरून आशिर्वाद पाठविला हें तुम्हांला सांगितलं म्हणजे मग आमच्या लढ्याला तेथल्या सर्वसाधारण जनतेची कशी सहानुभूति होती हें कळून येण्याजोगें आहे. राजाची आई काय नि इतर बायका काय या सर्वांनीं मला धीर दिला, माझ्या कार्याला मदत केली. तेथल्या बायका अत्यंत बाणेदार वाटल्या मला."

"त्या कशा काय ?"

"म्हणजे असं बघा !--थोर घराण्यांतल्या बायका कधीं फारशा घराबाहेर पडायच्या नाहींत. पण त्या देखील त्यांच्या दर्शनासाठीं आल्या होत्या."

"या श्रीमंतांच्या बायकांना एखादी कुतूहलाची वस्तु बघण्याची फारच हौस !-"

"असेल, नाहीं म्हणत नाहीं, पण घरच्या माणसांच्या इच्छेविरुद्ध तसं करायचं म्हणजे त्याला कांहीं तरी धीर लागतोच ना?" आनंदीबाई म्हणाल्या.

त्यांचें म्हणणें खरें होतें. पण इंदिराबाईंनीं तेथल्या कामगार स्त्रियांच्या शौर्याची एक हकीकत सांगितली ती मात्र त्यांच्या बाणेदारपणाची साक्ष पटविणारी होती. त्या सांगू लागल्या—

"राजनांदगांवच्या बायका अत्यंत बाणेदार आहेत असं तुम्हांलाहि वाटलं असतं तुम्हीं तिथं असतां तर! तिथं एक मोहनलाल नांवाचा कार्यकर्ता आहे. त्यानं रुईकर उपास करायला लागल्या दिवसापासून कामगार कार्य करायला सुरुवात केली. त्याच्यावर जेव्हां संस्थानच्या पोलिसांनीं चिडून हल्ला केला तेव्हां तेथल्या कामगार बायकांनीं मोहनला वेढून टाकलें आणि स्वतःवर मार झेलला."

"मग अशा कार्यकर्त्या स्त्रियांचा सहकार मिळाल्यामुळं तुम्ही तिथं खूपच कार्य केलं असेल?"

"नाहीं, खरं कार्य त्यांच्या उपवासानंच झालं! मी काय दोनतीनदां मनाई हुकूम मोडले तेवढेच. पहिल्या वेळीं मी मनाई हुकूम मोडून राजनांदगांवला गेलें तेव्हां मला सार्जंटनं अटक केली. मी एकटी बाई माणूस, बरोबर फक्त एकटा छगन होता."

"मग भीति वाटली असेल तुम्हांला?" मी विचारलें.

"भिती वाटण्याजोगं कांहींच नव्हतं. पण पुढं काय होणार याची मात्र धाकधूक वाटत होती तशी उत्सुकताहि पण वाटत होती. सार्जंटनं मला एकटीलाच किर्र जंगलांत सतरा अठरा मैलांवर आणून सोडून दिलं."

"आणि मग?"

"मला त्या सार्जंटचा संताप आला. पण त्या बिचाऱ्याचा तरी काय अपराध? तो हुकमाचा ताबेदार होता." इंदिराबाई शांतपणानें पुढची हकीगत सांगू लागल्या: "त्याची वागणूक कनवाळूपणाची होती. मला त्यानं उतरवून दिलं, इतक्यांत पाठोपाठ दुसरी मोटार आली. त्यांत संस्थानचे कांहीं कार्यकर्ते होते. त्यांनीं सार्जंटला विचारलं, "एकटी बाई माणूस अशी जंगलांत सोडण्यांत काय पुरुषार्थ साधलांत?"

सार्जंट म्हणाला, "मी हुकमाचा ताबेदार, या बाबतींत मी मला मिळालेल्या हुकमाप्रमाणंच वागलों."

"बरं मग पुढं?" मी विचारलें.

"पुढं काय?—मी पुन्हां हुकूम मोडला. त्यावेळीं छगनचे वडीलहि पण सोबतीला होते. या वेळीं मोटरमधून चाळीस मैलावर वाघ नदीवर नेऊन सोडलं आम्हांला! – तिसऱ्यांदा देखील वाघ नदीवरच आणून सोडलं!—अगदीं··किर्र जंगल. वाघाच्या गर्जना ऐकूं यायच्या. वस्ती म्हणाल तर चारसहा झोंपड्या असतील नसतील!"

घनदाट काळोखांत निबिड अरण्यांत एका झाडाखालीं इंदिराबाई आणि रामभाऊ रुईकर जागत बसले. कोतवालानें एक बाजलें आणून दिलें. त्याच्यावर चादर घालून छगनला झोंपवून या दोघांनीं सारी रात्र जागून काढली. पाणोठ्यावर येणाऱ्या वन्य पशूंच्या चाहाळांनीं आणि वाघांच्या गर्जनांनीं छगन मधून मधून दचकून उठायचा. त्यावेळीं इंदिराबाईंच्या अन्तःकरणांत भीतीचें काहूर माजावें व रामभाऊंनीं त्यांना धीर द्यावा. अशा रीतीनें रात्र सम्पली आणि प्रकाशाचा सन्देश घेऊन सूर्य क्षितिजीं आला.

इंदिराबाईंनीं सांगितलेली हकीकत ऐकून मी त्यांना विचारलें, "तेव्हां असं तुम्हाला वाटलं नाहीं कधीं, कीं नको हा जंजाळ! जंगलांतच सुखानं संसार करावा, नको त्या जगाच्या कटकटी!"

"अशी कधीं कल्पना देखील आली नाहीं मनांत! हें सारं जीवन मला आवडतं, नि यांतच खरी गंमत वाटूं लागली आहे आतांशा. आमच्या लढ्यांतल्या कामगिऱ्या आम्ही वांटून घेतलेल्या आहेत. त्यांनीं बाहेरचा लढा सांभाळावा. घरचा मी सांभाळतें. वास्तविक पाहतां यांनीं लग्नच करायला नको होतं असं कधीं कधीं आम्हाला वाटूं लागतं. कारण त्यामुळं त्यांच्याकडून अधिक कार्य तरी झालं असतं." इंदिराबाई म्हणाल्या.

मी आनंदीबाईंना विचारलें, "तुमची आपल्या एकुलत्या एक मुलाकडून हीच अपेक्षा होती का?"

आनंदीबाईंनीं उत्तर दिलें, "माझ्या अपेक्षा पूर्वी निराळ्या होत्या. कोणत्या आईला आपल्या मुलानं बंगले बांधावेत आणि मोटारी उडवाव्यात असं

वाटत नाहीं? परंतु हा चांगलीं कृत्यं करीत असतां त्याला अडथळा तरी कोणत्या कारणास्तव करायचा ? आणि तसं त्यानं तरी माझ्या मनाविरुद्ध काय केलं ?"

मी विचारलें, "तुमच्या धार्मिकपणाला दुखवणारं वर्तन त्यांच्या हातून अनेकदां घडलं असेल !"

"पण त्याचा धार्मिकपणा मला आवडतो. मुलाच्या मुंजीच्या वेळीं त्यानं सांगितलं, 'अगोदर माझ्या मजुरांना जेवण नि मग तुझे ब्राह्मण !' मी चटदिशीं कबूल झालें. कारण अन्नदानाचं पुण्य त्यामुळं थोडंच गमावणार होतं!" आनंदीबाईनीं उत्तर दिलें. पुष्कळांनीं त्यांचा बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न केला. पण त्या बुद्धिभेद्यांना आनंदीबाई सांगत असतात, "बाबांनो, माझा मुलगा अत्यंत वाईट आहे हें मला कबूल आहे. पण असं करा ना ! तुम्हीं चांगलीं माणसं त्याची कामगारांच्या चळवळींतली जागा घ्या."

आमचें बोलणें चाललें असतांनाच कामगार संघाचा एक कार्यकर्ता तेथें आला. त्याचें हांसतमुखानें स्वागत करून इंदिराबाई म्हणाल्या, "कसं काय ? काय खबर आहे ?"

रुईकरांची तुरुंगांत भेट घेण्यासाटीं तीन कामगार कार्यकर्ते जाऊं इच्छित होते. तेव्हां इंदिराबाई म्हणाल्या, "तुमचं काम आमच्या भेटीपेक्षां महत्त्वाचं आहे. आम्हीं काय, कोर्टांत भेटूं त्यांना !" मॉडेल मिलसच्या मजुरांना देऊं केलेल्या महागाई भत्त्याबद्दल त्या कार्यकर्त्याशीं इंदिराबाई आणि त्यांची सासू या चर्चा करूं लागल्या. त्यांची मजुरांच्या चळवळीशीं होणारी एकरूपता पाहून मी जरा विस्मितच झालों.

एखाद्या देवळांत जाऊन भाविकपणानें पुराण ऐकण्याऐवजीं ही म्हातारी बाई महागाई भत्ता, दादाभाईचे मजुरांत फूट पाडण्याचे प्रयत्न, युनियनशीं संबंध विच्छेद करण्याची मजुरांना दाखविण्यांत आलेली लालूच, यासंबंधीं चर्चा करते म्हणजे काय ?

म्हातारी कळवळून म्हणाली, "बाबारे, सगळं कांहीं करा पण पुन्हां त्याला त्रास होईल असं कांहीं करूं नका !"

कार्यकर्ता निघून गेल्यानंतर मी कांहीं वेळ जरा गप्प बसलों. मला एक प्रश्न विचारायचा होता; पण तो जरा अवघडच होता. तरीहि मी विचारायचा धीर

केलाच. कारण आनंदीबाई चहा करायला निघून गेल्या होत्या.

"बरं विचारलंत तुम्ही !—जोंपर्यंत वडील होते तोंपर्यंत त्यांनीं कसलंहि उणं पडूं दिलं नाहीं, भाऊहि तशी आपल्या बहिणीची नड जाणतो. अगदीं सुरवाती सुरवातीला वकील मंडळींनींदेखील मदत केली होती. आतां बाहेर असले म्हणजे हेहि कमाई करून ठेवतात. पण एकंदरीनं त्याची कधीं त्यांनीं चिंता केली नाहीं आणि मीहि त्यांना या बाबतींत अडवलं नाहीं." इंदिराबाई म्हणाल्या. तीन पुत्र आणि तीन कन्या यांची माता असलेल्या इंदिराबाई आपल्या संसाराची घडी बेतास बात कायम राखण्यांत मोठ्या कुशल दिसतात. त्यांच्या अंतःकरणांतल्या मातृवात्सल्याचा कामगारांना देखील अनुभव आलेला आहे. त्या सांगूं लागल्या, "मघाशीं आपण बोलत नव्हतों का, कीं त्यांनीं लग्नच करायला नको होतं म्हणून. तें अगदीं खरं आहे. चुकून लग्न झालं. यांना मुलबाळांच्या दुपारच्या भ्रांतीची कधीं चुकूनदेखील चिंता नसायची. पण मी मुलांची आई आहें. मुलामुलींच्या शिक्षणाचा प्रश्न आहे. पण या साऱ्या चिंतेपासून मी त्यांना दूर ठेवणार आहें. त्यांनीं आपलं ध्येय सोडतां कामा नये. त्यांच्या चिंतांची मी मालकीण आहें."

"तें सगळं खरं हो; पण वैभवांत राहण्याची इच्छा कधींकाळीं मनांत येणं साहजिक असतं !" मी एक सूचक प्रश्न करण्याच्या बेतांत होतों. पण त्यांनीं तें ओळखलें.

त्या म्हणाल्या—"खरं सांगायचं म्हणजे मला अशी इच्छा कधींच झाली नाहीं. वडलांच्या घरीं वैभवाचे सारे चोंचले भोगले म्हणून असेल कदाचित्. आणि मघाशीं तुम्हीं मोटारीं उडविण्याबद्दल विचारलंत ना ?—संस्थानच्या आणि सरकारच्या मोटारी दिमतीला असतात माझ्या पतीच्या भाग्यामुळं ! माझ्या भाग्याला कुणाची दृष्ट लागूं नये हीच माझी इच्छा आहे."

चहाचे घोट घेतांना मी त्यांना आणखी एक प्रश्न विचारला, "आपण सदासर्वकाळ सुखांत असल्याचा आभास उत्पन्न करतां असं मी म्हणत नाहीं, पण आपल्या आयुष्यांत असा एखादाहि प्रसंग आठवत नाहीं का कीं ज्यामुळं तुम्हाला क्षणभर तरी दुःख झालं होतं ?"

आठवण्याचा मुळींदेखील प्रयत्न न करतां त्या म्हणाल्या, "असले प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यांत येत असतात, मग माझ्याहि आले असल्यास नवल

कोणतं ? पण ते मी फारसे लक्षांत ठेवले नाहींत."

"पण एखादा तरी ताजा प्रसंग आठवत असेल ना ?—मुलांची माया एकीकडे ओढते आहे, कर्तव्य दुसरीकडे ओढतं आहे, असा एखादा प्रसंग तुम्हांला अनुभवायला नाहीं का मिळाला ?" मी माझा मुद्दा त्यांना जास्ती स्पष्ट करून सांगितला.

त्या म्हणाल्या, "तसा प्रसंग मात्र एकदांच आलेला आठवतो मला. पण त्याचं देखील आज मला कांहीं वाटत नाहीं. मी जेव्हां राजनांदगांवला जायला निघालें, तेव्हां मुलं रडायला लागलीं. मलाहि जरा वाईटच वाटलं. पण कुणी तरी हें सारं करायला हवं होतंच. त्यामुळं मन कठोर केलं, आलेला गहिंवर दाबला आणि आसूं गिळून तशीच टांग्यांत जाऊन बसलें. मुलं आक्रांत करीत होतीं पण त्यांना एका शब्दानं देखील विचारलं नाहीं. सासूबाई स्टेशनवर एकट्या पोंचवायला आल्या होत्या."

आतां मला एक ठराविक प्रश्न त्यांना विचारायचा होता. "एका वाक्यांत आपण आपल्या पतीविषयीं सांगूं शकाल का ?" असें मी विचारतांक्षणींच त्यांनीं उत्तर दिलें, "त्या प्रश्नाचं उत्तर कसं सांगायचं याचा मी कालपासून विचार करत्यें. 'माझ्या जीवनाला शोभा आणणारा अलंकार' असं सांगायचं मी ठरविलं. पण आतां वाटतं कीं तेंहि चूकच ठरेल. त्यांच्यामुळं माझ्याच जीवनाला शोभा आली असं नाहीं वाटत मला !— आज देखील ते तुरुंगांत जाऊन बसले आहेत पण ते कांहीं माझ्या जीवनाला शोभा आणण्यासाठीं नव्हे, तर आपल्या मताच्या आग्रहासाठीं !"

त्यांचा निरोप घेतांना मी मुलाखतीसाठीं त्यांचा फोटो मागितला, तेव्हां त्यांनीं आणखी एक आश्चर्याचा धक्का मला दिला. लग्नानंतर त्यांनीं जो एकत्र फोटो काढला तेव्हांपासून त्या कधींहि कॅमेऱ्यापुढें उभ्या राहिलेल्या नाहींत हें पाहून मला आश्चर्य वाटलं. पण त्या म्हणाल्या, "कधीं कारणच पडलं नाहीं फोटो काढण्याचं !"

मला माझ्या एका परिचयाच्या 'देश-भक्तिणी' ची आठवण झाली. आपण तुरुंगांत जाणार आहोंत याची टिमकी वाजविण्यासाठीं आपला फुलपांखरुं पद्धतीचा फोटो छापून सगळ्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध व्हावा यासाठीं केवढी दक्षता घेण्यांत

आली होती तिच्याकडून आणि तिच्या हितचिंतकाकडून ! ती तुरुंगांत जाण्यापूर्वी आपल्या मुलांचा निरोप घेत असल्याचें जें छायाचित्र मी पाहिलें होतें त्यांत तिचे डोळे मुलांच्याऐवजीं कॅमेऱ्यावर रोखलेले दिसतात.

आणि इंदिराबाई रुईकर म्हणतात—" गेल्या वीस वर्षांत मला फोटो काढण्याचं कारणच पडलं नाहीं." त्यांच्यासारख्या अतुल निष्ठावंत वीरांगनाच राष्ट्राला प्रगतीच्या मार्गावर नेतील, भारताच्या भाग्यश्री होतील.

२ जानेवारी १९४१

“ कॉमरेड रॉय यांच्याबद्दल आपल्याला जें पहिलें आकर्षण वाटलें त्यांत विभूतिपूजेचा अंश होता तर!” असें मी म्हणालों मात्र, एलन रॉय जरा गंभीर बनल्या; आपली खुर्चीवरची बैठक जरा ताठस केली आणि माझ्या विधानाचा निषेध करण्यासाठीं आवेशानें म्हणाल्या, “ Oh no, Oh no, it was not Hero worship at all. विभूतिपूजा नव्हती हं माझी. मुळींच नाहीं. विभूतिपूजा ही हिंदुस्थानची स्पेशालिटी आहे. युरोपांत पुढाऱ्यांच्या



व्यक्तीगत सन्मानाची नी गौरवाची कोणालाच आवड नसते. युरोपांत व्यक्तीपेक्षां मताला मान आहे. नाहीं म्हणायला सध्याच्या नात्सी जर्मनीनें हें विभूतिपूजेचें नवें तंत्र पूर्णपणें हाताळलेलें आहे. परंतु एकंदरींत युरोपांत विभूतिपूजेचें स्तोम आणि व्यक्तीगत अभिनिवेशाचें अवडंबर कमीच! हिंदुस्थानांत मात्र आजच्या घडीला त्याचाच फार सुळसुळाट दिसतो.”

मी त्यांचा निषेध मान्य केला. हिंदुस्थानपुरतें त्यांचें हें म्हणणें मला हरघडी प्रत्ययाला येत होतें; गांधीजींचें व्यक्तिमहात्म्य आज राष्ट्राच्या नवविकसित

बहरानें असेंच पूजलें जात आहे. गेल्या दोन दशकांपासून त्यांच्या व्यक्तिगत आवडी निवडीनें दोन पिढ्यांचा बहर निर्माल्य झाला. राष्ट्राच्या कल्याणाकडे डोळे-झांक करून देशांतल्या कर्तबगारांनीं गांधीजींच्या वैयक्तिक मतापुढें आपली मस्तकें नमविलीं. ही विभूतिपूजेची, अंधश्रद्धेची मात सुबुद्ध आणि देशभक्त अंतः-करणावर आणखी किती वर्षें चालत रहाणार हाहि प्रश्न मनांत चटदिशी आला.

माझ्या पुढ्यांतच एका टेबलाच्या अंतरावर भाई मानवेंद्र रॉय बसले होते. गांधीवाद हरप्रयत्नानें उलथून पाडण्याचा त्यांचा विडा असूनदेखील गांधीवादांतूनच पुन्हा सजीव झालेली, अठराव्या शतकांतल्या मानवानें वापरली असती अशी जाडी भरडी खादी त्यांनीं परिधान केलेली होती.

एलन रॉय यांनीं आपल्या उजव्या हातांतल्या सहाहि कांचेच्या बांगड्यांची चाळवाचाळव केली आणि स्मितपूर्वक आपल्या पतीकडे पाहिलें. स्मिताचें उत्तर स्मितानेंच मिळालें आणि भाई रॉय पुनरपि आपल्या पत्रलेखनांत मग्न झाले.

एलन रॉय या जन्मानें जर्मन पण नागरिकत्वानें अमेरिकन ! रशियांतून भाई रॉय जर्मनींत आले तेव्हां त्यांची एलन यांच्याशीं ओळख झाली. तशा त्या रॉयना कम्युनिस्ट पक्षाचे एक पुढारी म्हणून अगोदरच ओळखत होत्या. पण भाई रॉय मात्र एलन यांना जर्मनींत आल्यानंतरच ओळखायला लागले. आपली उभयतांची ओळख कशी झाली याची माहिती मला सांगतांना त्या म्हणाल्या—

" त्यांची माझी पहिली भेट बर्लिन मधील एका 'कार्फे' त झाली. हे मला ओळखत नव्हते; तरीपण मी अगोदर पासूनच ह्यांना ओळखत होतें. आधींच कम्युनिस्ट कार्यकर्ते हाताच्या बोटावर मोजण्याइतके, आणि त्यांतून हे हिंदी ! आम्हाला तर हिंदी कम्युनिस्ट पार्टी आणि आम्ही यांना सांधणारा हे एक दुवा वाटूं लागले होते. बस्स, एवढंच. पण तुम्ही म्हणतां तसलं भलतंच विभूतिपूजेचं वगैरे अवडंबर नव्हतं हं !

" बर्लिनमध्यें आम्ही कम्युनिस्ट पार्टीच्या कार्याच्या निमित्तानें एकत्र येऊं लागलों. जर्मनीमध्यें पार्टीला बरेंचसें इंग्रजी काम करवून घ्यायचें होतें. रॉय हे इंग्रजीचे चांगले जाणते होते नी मी त्यांना मदत करायची त्यांच्या या कामांत ! पार्टीच्या सभांतून आमच्या गांठी भेटी होऊं लागल्या."

" आणि अशा रितीनं तुमचं लग्न ठरलं, असंच ना ?" मी हांसत

विचारलें.

"हूं" त्यांनीं मानेला लाडका वेळावा देऊन निःशब्दानें उत्तर दिलें. त्यांच्या लोचनांत गतगोष्टींच्या स्मरणाचा आनंद एकवटला असेल असें मला वाटलें. पण मत्सरी चष्म्यानें त्याचें दर्शन आम्हांला होऊं दिलें नाहीं. चष्मा घालणाऱ्या माणसांना एक ठराविक खोड असलेली दिसून येते. एलन यांची गणना या खोडीबाबत अपवादांत होऊं शकत नाहीं. आपल्या भिवयांना वर भालप्रदेशीं नाचवीत त्यांनीं जें एकाक्षरी उत्तर दिलें त्यामुळें मी त्यांच्याकडे एक क्षणभर निरखून पाहिलें. त्यांनीं त्यांची अर्धीअधिक कपाळपट्टी बंडखोर केसांना कह्यांत ठेवण्यासाठीं मस्तकीं बांधलेल्या काळ्या जाळीनें झांकून घेतल्यामुळें त्यांच्या भालीं कुंकुमतिलक होता कीं नाहीं हें बघायला मिळालें नाहीं; पण त्यांच्या सौभाग्याचा निधी त्यांच्याच पुढें बसून त्यांच्या त्या गोड लाडक्या 'हूं'नें हांसूं लागला तेव्हां मात्र मला मोठी मौज वाटली. रॉय यांचें पत्रलेखन आतां जवळ जवळ संपलेलें होतें. त्यांनीं देखील आमच्या मुलाखतीच्या प्रश्नोत्तरांत मधून मधून भाग घ्यायला सुरुवात केली.

त्या डाव्या हातालाच माझ्या शेजारच्या एका खुर्चीवर वसल्या होत्या.

एलन रॉय यांचा हिंदी पेहेराव त्यांना विशेषच खुलून दिसत होता. युरोपीय पेहेरावांत मला हिंदी स्त्रिया ओंगळ वाटतात, त्याच्या उलट हिंदी वेशभूषेंत युरोपियन स्त्रिया वाजवीपेक्षां अधिक सुंदर भासतात. एलेन यांचा आवाज किंचित कणखर असला तरी त्यांत मार्दव आहे. त्यावेळीं त्यांनीं नारिंगी रंगाची रेशमी साडी परिधान केलेली होती.

विभूतिपूजेसंबंधीच्या माझ्या प्रश्नाला उत्तर देतांना त्यांनीं दाखविलेला आवेश पुढच्याहि संभाषणांत कायम होताच; पण त्याच्या जोडीला नंतर थोडा मनमोकळेपणा आला. मी त्यांना म्हटलें, "तुम्ही हिंदुस्थानांत आलांत त्या कॉमरेड रॉय यांच्यामुळेंच! नाहीं तर मला नाहीं वाटत तुम्हीं इथं आलां असतां म्हणून!"

"खरं आहे तुमचं म्हणणं! नाहींतर मला काय, हिंदुस्थान, मेक्सिको, होनोलुलू किंवा टिंबक्तू–कोणतेही देश सारखेच. कोणताहि देश मला माझं कार्यक्षेत्र म्हणून निवडतां आला असता. राजकीय बाबतींत माझ्या आवडत्या

तत्त्वाच्या प्रचारासाठीं मी कोणत्याही देशांत सारख्याच निरलसपणानें कार्य करीत राहिलें असतें." त्या बोलतांना क्षणभर थांबल्या. आपली सिगारेट काढली आणि ती शिलगावण्यासाठीं फर्रकन त्यांनीं काडी ओढली. खालीं मान घालून नुकतेंच लिहिलेलें पत्र वाचण्यांत गुंगून गेलेल्या आपल्या पतीकडे किंचित धन्यतेच्या साभिमानानें एक कटाक्ष टाकून त्या म्हणाल्या, "मी हिंदुस्थानांत यांच्यासाठी आलें. यांनीं मला हिंदुस्थानांत ओढून आणलें !"

आपल्या पत्रवाचनांतून फुरसत काढून भाई रॉय यांनीं वर मान केली आणि ते आपल्या पत्नीला म्हणाले, "यांना सांग ना कीं तुला तेव्हां हिंदुस्थानचा भूगोल देखील माहीत नव्हता."

"नी आतां तरी कुठं माहित आहे ?" पतीच्या गंमतीला पत्नीनें तसलाच एक टोला लगावला आणि माझ्याकडे वळून म्हणाल्या, "मला उगाच स्वतःच्या हिंदुस्थानविषयक कळकळीचें स्तोम माजवून घ्यायचें नाहीं. माझ्या पक्षाच्या धोरणानें मी जें इतर देशासाठीं केलें असतें तेंच हिंदुस्थानसाठीं करीत आहें." असें म्हणून त्यांनीं आपल्या हातांतली विझलेली काडी फेकून दिली, दुसरी भर्रकावून आपली सिगारेट शिलगावली व त्या धूम्रपान करूं लागल्या.

मला अशा कांहीं इंग्रज महिला आठवल्या कीं ज्या हिंदुस्थानबद्दलची कळकळ असल्याचें जाहीर रित्या सांगतात. हिंदी राजकारणांत थोडा फार भाग घेतात. श्रीमति नेली सेनगुप्ता यांना तर कॉंग्रेसच्या राजकारणासाठीं तुरुंगवास घडलेला होता. पंजाबांत नुकत्याच एका हिंदी प्रोफेसराच्या इंग्रज बायकोनें सत्याग्रहासाठीं आपलें आवेदनपत्र गांधीजींकडे पाठविलें. मग एलन रॉय म्हणतात यांत काय तथ्य आहे ? मी मनाशींच प्रश्न केला व लागलीच त्याचें उत्तर सांपडलें. आपल्या पतीच्या संवेदनांत सहभागी झालेल्या या महिला आपल्या प्रिय पतीच्या पाठोपाठ त्यांच्या ध्येयमार्गाकडे जाऊं लागतात. मात्र मार्गासंबंधीं त्यांचा कधीं मदभेद होऊं शकत असेल का ?

मी माझी शंका एलन रॉय यांच्याजवळ व्यक्त केली तेव्हां त्या म्हणाल्या—

"मतभेद हे सगळीकडेच होतात; पण आमच्यांत तसे फारसे कधीं उद्भवलेच नाहींत. कधीं कधीं वर्तमानपत्रें वाचतांना एखाद्या घडामोडीबद्दल किंवा भाषणाबद्दल आमच्यांत मतभेद निर्माण होतात पण आम्ही चर्चा करून

एकमेकांचा दृष्टिकोन समजावून घेण्याचा प्रयत्न करतों. कधीं कधीं असं होतं कीं मी फार जहाल बनतें आणि मग ते नीटपणें माझी समज घालण्याचा प्रयत्न करतात."

"आणि तुम्हांला ताळ्यावर आणतात!" मी हंसत हंसत म्हटलें.

"तसंच समजा ना! पण हे मतभेद इतके क्षुल्लक असतात कीं यांचेविना जीवनांत गोडी येणेंच शक्य होणार नाहीं. त्या पुढें म्हणाल्या, "घरोघरीं असे मतभेद सांसारिक जीवनांत होत असतील."

"पुष्कळ!" मी त्यांना दुजोरा देऊन म्हटलें; "पण खरंच, हिंदी स्त्रियांमध्यें कार्य करण्याचा प्रयत्न तुम्हीं केला होता थोडा फार, त्याचं काय झालं?"

"हा प्रश्न आपण विचारला नसता तर बरं झालं असतं! कारण हिंदी स्त्रियांबद्दल मत व्यक्त करण्याची माझी इच्छा नव्हती. तरी पण त्यांच्या उन्नतीसाठीं झटणं मला आवडतं. परंतु दुर्दैव असं कीं पहिली अडचण भाषेची येऊन पडते. सर्वसामान्य महिलांना इंग्रजी येत नाहीं. आणि ज्यांना येतें त्यांपैकीं बऱ्याचशा स्त्रियांना सार्वजनिक सेवेची आवड नसते. त्यांना आपले चटकमटक घरगुती खेळ आणि गप्पासप्पा यांतच आनंद वाटतो. हौस म्हणून थोडें फार विणकाम करतील! या बायकांत मिसळून माझा काय फायदा? त्यांची कां मीं सुधारणा करणार?—बरें, दुसऱ्या ज्या बायका आहेत, त्यांना माझी भाषा समजायची नाहीं नी मला त्यांची समजायची नाहीं. मात्र माझी मलाच खंत वाटते कीं देशांतली ही महत्वाची शक्ति सुप्तावस्थेंत निष्प्रभ होऊन रूढींची बटीक होऊन पडलेली आहे आणि मी स्वतः त्यांच्यासाठीं कांहींच करूं शकल्यें नाहीं."

या आदिशक्तींच्या पुनरुद्धारासाठीं झटणाऱ्या स्त्रियांचा संघ पाहिजे. त्यांनीं साक्षरतेचा प्रसार करूनच भागणार नाहीं तर त्यांना नवीन दृष्टी देखील प्राप्त करून दिली पाहिजे, असे विचार माझ्या मनांत आले. मी म्हणालें, "कॉमरेड रॉय यांचें भाग्य सगळ्यांच्याच वांट्याला येत नसतें. पण स्त्रियांच्या उन्नतीविना आमची उन्नती होणार नाहीं हें खास, कारण मोठमोठ्या राजकीय कार्यकर्त्यांचें मला माहित आहे कीं त्यांच्या स्त्रिया, त्यांच्या आकांक्षा आणि प्रगति ह्यांना दृढवद्ध करणाऱ्या जडशृंखलाच ठरतात."

"खरं आहे, तुमचं म्हणणं. क्रांति घडवून आणण्याचं खरं सामर्थ्य

स्त्रियांमध्ये आहे.' आणि मग त्यांनीं १९१७–१८ मध्यें क्रांतीचा उगम कसा झाला याची माहिती थोडक्यांत सांगितली.

"१९१८ च्या सुमारास युरोपांत ज्या अनेक क्रांत्या घडून आल्या त्यांचें पुढारीपण त्या त्या देशांतील बायकांनींच घेतलें होतें. त्यावेळीं परिस्थिति अशी होती कीं संसाराचा सगळा भार बायकांच्या शिरावर पडलेला होता. दररोज तासन् तास त्यांना ब्रेडच्या दुकानासमोर आपली पाळी कधीं येईल याची वाट पाहत परवड लावून उभें रहावें लागत असे. या परिस्थितीनें सर्व बायका चिडल्या–चवताळल्या आणि त्यांनीं उठावाला सुरवात केली.

"या बंडाचा पुढाकार प्रथम स्त्रियांनीच घेतला व नंतर त्यांत पुरुष सामील झाले. स्त्रियांनींच पुरुषांना लढ्याला उद्युक्त करायचें असतें."

यावर मीहि म्हणालों, "अगदी खरं आहे तुमचं म्हणणं! पण आम्हां हिंदी कार्यकर्त्यांना पदोपदी ही बायकांची बेडी अडवते, बांधून टाकते. मला माझ्या अनेक मित्रांचीं उदाहरणें माहीत आहेत. सरकारी दडपशाहीपेक्षां ही घरगुती बायकोशाही अधिक तंग करून सोडते आम्हां कार्यकर्त्यांना!"

"नाहींतर काय?" त्या म्हणाल्या, "याच्या उलट स्त्रिया जर राजकीय दृष्ट्या पुढारलेल्या असतील तर त्या पुरुषांना राजकीय कार्यांत मदत तर करतीलच पण त्यांना मागासूंहि देणार नाहींत. त्या त्यांना घराबाहेर पिटाळतील व त्यांना धडाडीनें कार्यास जुंपतील. इकडच्या परिस्थितीची मला कल्पना आहे. नवऱ्यानें चळवळींत पडायचें नि बायकोनें अज्ञानवशतेनें त्याची तंगडओढ करायची आणि त्याच्या उत्साहाला उपद्व्याप म्हणून बोटें मोडीत थयथयाट करायचा. अशानेंच हिंदी राजकीय चळवळ मागासलेल्या अवस्थेंत दिसत आहे."

स्त्रियांनीं जर पुढाकार घेतला तर क्रांतीचें कार्य सुकर होईल असा त्यांना विश्वास वाटतो. पण तो पुढाकार घेण्याइतकी बायकांची प्रगति शिक्षणाशिवाय कशी होणार?—

त्या स्वतःबद्दल म्हणाल्या, "हें कार्य घडवून आणण्यासाठीं झटणाऱ्या स्त्रिया निर्माण झाल्या पाहिजेत. पण मला मात्र मोठं वाईट वाटतं कीं थोडा देखील वेळ मी देऊं शकत नाहीं. कारण कितीहि केलं तरी वेळांत वेळ काढून मीही थोडंफार घरगुती कामांत लक्ष घालतेंच. तुम्हाला माहित आहे आम्हीं गरीब माणसं,

तेव्हां थोडंफार शिवण टिपण घरीं करावं लागतंच. कुठं सदऱ्याला गुंड्या लाव, कुठं मोजांना रफू कर, यांतहि तास दोन तास जातातच ना!"

"आणि शिवाय स्वयंपाक पाणी देखील." मी जरा त्यांच्या विश्वासांत शिरण्याचा प्रयत्न केला. "तुमच्या हातचं जेवण त्यांना आवडतं ना?"

"माझ्याहिपेक्षां त्यांना एखाद्या बंगालणीच्या हातचं जेवण अधिक गोड वाटण्याचा संभव आहे." पतीकडे वघून त्या हंसत उद्गारल्या. त्यांच्या हास्यांत जरा खोडकरपणा दिसला मला! नंतर आपल्या खुर्चीच्या उजव्या हातावर रेलून त्या माझ्याकडे वळून म्हणाल्या, "खरं सांगायचं म्हणजे खुद्द कॉमरेड रॉय हेच मोठे सुग्रण स्वयंपाकी आहेत. त्यांच्या हातचा स्वयंपाक मोठा गोड लागतो."

"अस्सं! अरे वा!" मी आश्चर्यानें भाई रॉय यांच्याकडे पाहिलें.

एका वाक्यांत या थोर व्यक्तीविषयीं त्यांची पत्नी कोणतें मत व्यक्त करूं शकेल? मला महज सुचलें. मी विचारलें, "एका वाक्यांत जर मी तुम्हांला कॉमरेड रॉय यांच्याविषयीं सांगा म्हटलं तर तें वाक्यांत कोण असेल?—How will you sum him up in one sentence?"

"भलंतच विचारतां तुम्हीं!" त्या विनोदानें म्हणाल्या "येवढा सहा फूट कांहीं इंच लांब देह एका वाक्यांत मावूं शकेल असं वाटतं तुम्हांला?"

"प्रयत्न करा कीं!" मी त्यांना धीर दिला. त्या खरोखरीच प्रयत्न करूं लागल्या. पण अधीरमनस्क मी मध्यें आणखी एक प्रश्न विचारून बसलों, "आणखी एक प्रश्न विचारूं कां मी? भाई रॉय हे हिंदुस्थानचे स्टॅलिन होतील की ट्रॉट्स्की?"

एलन जरा गंभीर बनल्या. त्या म्हणाल्या, "असं पहा, असल्या तुलना मला आवडत नाहींत. मला आपले ते हिंदुस्थानचे एम्. एन्. रॉय झालेलेच जास्त आवडतील आणि ते तसे होतील अशी मला खात्रीहि वाटते."

यावर भाई रॉय यांनीं एक गंमतीची कोटी केली. तेव्हां मी त्यांना म्हणालों, "परवां मी 'चित्रां'तून अशी सूचना केली आहे कीं सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांचे ऐवजीं इंग्लंडनं आपणांस रशियाचं राजदूत नेमावं म्हणजे रुसो-ब्रिटिश संबंध स्नेहाचे होण्यास अधिक मदत होईल.

"होतील ना?" ते गंमतीनें उत्तरले, "पण हिला माझी सेक्रेटरी नेमलं

पाहिजे, हं !" आम्ही सगळेच हंसूं लागलों आणि उठून उभे राहिलों.

मी एलन यांना 'एका वाक्यांत एम्. एन्. रॉय' या प्रश्नाची आठवण दिली तेव्हां त्या मला म्हणाल्या, " हं मग लिहून घ्या—

" He is too big to be summed up (त्यांचा मोठेपणा थोडक्यांत सांगतां यावयाचा नाहीं.)"

मी त्यांचा निरोप घेऊन बाहेर निघालों तेव्हां हें शेवटचेंच वाक्य अनेकदां त्या मार्दवशाली पण कणखर आवाजांत माझ्या कानावर आघात करीत होतें आणि मला राहून राहून विचारत होतें, "एलन रॉय यांचें हें वाक्य म्हणजे विभूतिपूजेच्या आधुनिक आविर्भावांतून तर निर्माण झालेलें नाहीं ना ?"

२५ डिसेंबर १९४०

---

मराठी ... संग्रह शाखा
दा. क्र.

“ **मा**झ्या यांच्यांत आमचं लग्न झाऊं तेव्हां जगाला कोणतंच साम्य दिसलं नव्हतं आणि नव्हतंहि पण ! हे तेव्हां साहित्यिक नव्हते ना राजकारणी; सगळ्यांना आश्चर्य वाटायचं मी कवयित्री, स्कॉलर, खेळाडू आणि हे बुवाजी कांहींच नव्हत आणि गंमत काय झाली ठाऊक आहे का ? जेव्हां आमचं लग्न झालं तेव्हां मी फिलॉसफीमध्यें एम. ए. ची पदवी मिळवली, चांगला दुसरा वर्ग मिळवला आणि यांनीं एलएल. बी. मध्यें गोता



खाल्ला.” विमलाताई आपल्या पतीकडे बघत म्हणाल्या.

नेहमीच्याच बेफिकीर वृत्तीनें सिगारेटची राख झाडीत बाबा देशपांडे म्हणाले, “एकेकीचा पायगुण असतो.”

त्यांच्या विनोदाची आम्हीं दोघांनींहि दखल घेतली नाहीं. विमलाताई त्यांच्या जवळच झोपलेल्या लहानग्या नचिकेनसाठीं महावस्त्रें तयार करीत माझ्याशीं बोलत होत्या.

मी विचारलें, “मग तुमच्या विवाहाला तुमच्या वडलांनीं अडथळा केला असेल ?”

“नाहीं, वडलांनी हरकत घेतली नाहीं,” त्या सांगूं लागल्या, “पण त्यांना

माझी ही निवड शहाणपणाची वाटत नव्हती. त्यांनाच काय पण सगळ्यांनाच यांची किंमत कळली नव्हती. पण 'बंधनांच्या पलीकडे' नंतर यांचं मोल सर्वांनीं पारखलं. तुम्हांला माई घारपुरे माहित होत्या ना? त्यांनीं देखील नंतर असे उद्गार काढले होते कीं 'विमल, मला वाटत होतं, तूं चुकलीस म्हणून, पण तुझी निवड शंभर टक्के बरोबर ठरली.'"

माई घारपुरे या विमलताईंच्या चुलतआत्या, आद्यसुधारक कै. रा. ब. वामनराव कोल्हटकर यांची कन्या, कै. अच्युतराव कोल्हटकर यांच्या भगिनी! मनोरंजनांतून त्यांनीं "वामनसुता" या टोपणनांवाखालीं हृदयस्पर्शी सामाजिक लघुकथा लिहिलेल्या होत्या. तीनचार वर्षांपूर्वी या चिरदुःखिनी वृद्धेचा अंत झाला.

बाबा देशपांडे यांच्या स्वभावांत निसर्गतः मनमोकळेपणा आहे. त्यांच्या लिखाणांतून दिसून येणारीं सडेतोड विचारसरणी इतर कांहीं कादंबरीकारांच्या नाटकी शब्दावडंबरपूर्ण निरर्थकपणापेक्षां वेगळी वाटते आणि म्हणूनच ती वाचकांच्या मनाचा वेध करून जाते व त्यांना विचारप्रवण करते. आपली पहिली सिगारेट संपवून त्यांनी दुसरी शिलगावली आणि ते म्हणाले, "हिची निवड शंभर टक्के बरोबर ठरली तरी एकंदरीनं ही मला विजोडच होती. अशी लठ्ठ दिसायची कीं सांगतां सोय नाहीं; आणि वर कवयित्री! हिच्या प्रेमांत गुरफटायचं म्हणजे मोठं धाडसच होतं. (It was a great adventure to fall in love with her!)"

"Do you still think so? (अजूनहि असंच वाटतं तुम्हांला?)"—मी विचारलें.

"तर काय? Love is a perpetual adventure. प्रीति ही एक नित्याचंच धाडस असते. तुला तो ट्रॉटस्कीचा Permanent Revolution चा सिद्धांत माहित आहे ना? अगदीं तसंच प्रेमाचं असतं!—या प्रेमाच्या फंदांत पडून तर मी लेखक झालों. मला माझ्या कॉलेजच्या जीवनांत राजकारण आवडायचं. 'ए. आर.' (अनिल), आणि ही मारे साहित्यिकांची ऐट दाखवीत असत." बाबा देशपांडे म्हणाले.

"पण आतां तर तुम्ही मिरवितां ना? झालं तर!" विमलताईंनीं त्यांचें समाधान केलें.

"अग पण तें सगळं तुझ्यामुळं!-- तूंच माझ्यांत हा साहित्यिकपणा आणलास!" असमाधानी बावांनीं उत्तर दिलें.

, मी विमलाताईंना विचारलें, "पण बावा तुमच्या प्रेमाच्या फंदांत पडले कसे?"

त्या बावांच्याकडे पाहून हांसल्या. त्या दोघांना अपल्या गतायुष्यामधील गोड प्रसंग आठवले असतील का? विमलाताई क्षणभर गप्प बसल्या. बावांनीं सांगायला सुरुवात केली. "त्याचं असं झालं, एका सभेंत मी बोलायला गेलों.--"

"नाहीं हो, त्याच्याहि अगोदरचं थोडं सांगायचं राहिलं!" विमलाताई मध्येंच म्हणाल्या.

"बरं तर तूंच सांग! मला वाटलं माझी फजिती मीच चांगली सांगूं शकेन!" बावांनीं सिगारेटचा झुरका मारायला सुरवात केली. विमलाबाईंनीं सांगायला सुरवात केली--

"माझी एक मैत्रीण नेहमी यांच्याबद्दल सांगायची. 'पी. वाय.' असा करतो नी तसा करतो. यांच्या वक्तृत्वाची देखील तारीफ करायची! आमच्या सी. पी. बेरार क्लबच्या पहिल्या सम्मेलनाच्या प्रसंगीं आयत्या वेळीं करावयाच्या भाषणाची चढाओढ होती. त्यांत हे राजश्री भाग घ्यायला आले. ऐटीनें टेबलावर टोपी काढून कांहीं तरी एकदोन वाक्यें पाठ केल्यासारखीं घडाघडा म्हणून दाखविलीं आणि मग बनले मुखस्तंभ! एक अर्धा मिनीट निश्चल उभे राहिले आणि टेबलावरची टोपी उचलून ठोकला सुंबाल्या! माझ्या मैत्रिणीची स्थिति हिरमुसल्यासारखी झाली."

"आणि तुम्हीं?" मी विचारलें.

"हिनं गंमतीनं टाळ्या वाजवल्या!" बावांनीं उत्तर दिलें.

"अशा रितीनं मी ह्यांना पहिल्यांदा पाहिलं." विमलाताईंनीं नचिकेतला थोपटीत म्हटलें.

मुख्यतः फर्ग्युसन कॉलेज मधील मध्यप्रांत वऱ्हाडांतल्या विद्यार्थी विद्यार्थी-नींचा एक संघ त्याच वेळीं कै. प्रिन्सिपाल पटवर्धन यांच्या प्रोत्साहनानें स्थापन झालेला होता. त्या संघाचे चिटणीस 'पी. वाय.' होते. विद्यार्थिनींतर्फे प्रतिनिधी म्हणून विमलाताईंची निवड झालेली होती. त्यामुळें त्यांचा परिचय

अगोदरच झालेला असावा असा जो माझा तर्क होता तो चुकीचा ठरला. मी फर्ग्युसन मध्यें होतों तेव्हां मुलींनीं निमित्तें काढून मुलांना कालव्याच्या आसपास भेटीला बोलवावें आणि जमल्यास नवऱ्याची 'शिकार' करावी असा नवा पायंडा पडूं पहात होता. मी विमलाताईजवळ माझी शंका प्रगट केली, "खरंच तुमची बाबांची अगोदर ओळख नव्हती ?"

"नव्हती, हे सेक्रेटरी असल्यामुळें यांच्याकडे जेवणाच्या डब्याबद्दल मी मुलींच्या वतीनं चिठ्ठ्या पाठवायची. पण पी. बाय. नांवाचा प्राणी मला पहिल्यांदा त्या पळपुट्या अवस्थेंतच पाह्यला मिळाला. पण तें देखील मी लवकरच विसरून गेल्यें."

"मग ओळख झाली तरी केव्हां ?" माझ्या या प्रश्नाला उत्तर देण्यासाठीं बाबा अगदीं अधीर झाले होते. ते भराभर सांगूं लागले, "—पंजाबराव देश-मुख विलायतेस जाणार होते म्हणून त्यांचा सत्कार समारंभ करण्याचें ठरविलें आमच्या क्लबनें ! पंजाबराव आमच्या क्लबचे सभासद होते. पण झालं काय. एकाएकीं लोकमान्य वारले आणि मग विद्यार्थ्यांनीं आग्रह धरला कीं सत्कार समारंभ रद्द करावा. मला तें मान्य नव्हतें. त्या बोलघेवड्यांच्या पेक्षां मला टिळकांच्या बद्दल जास्त आदर होता. I was touchy about him. पण पंजाबरावचा सत्कार समारंभ झालांच पाहिजे असंहि मला वाटत होतं. बरं हा सत्कारसमारंभ टिळकांच्या मृत्यूनंतर कांहीं दिवस लोटल्यावर होणार होता. सगळा समारंभ ठरल्यावर आतां तो रद्द कसा करायचा ?— पण विरोधक म्हणत 'प्रत्यक्ष बाप मेला असतां कसले हे सत्कार समारंभ करतां !' विरोधकांनीं माझ्यावर अविश्वासाचा ठराव आणण्यासाठीं एक सभा बोलावण्याचें विनंतिपत्रक ६०–७० सह्यांनीं अध्यक्षांकडे पाठवलें. अध्यक्ष प्रि. पटवर्धन यांना माझी बाजू पटलेली होती. त्या सभेंत आपल्या बाजूला मतें गोळा करण्यासाठीं प्रथम मी हिच्या भेटीला गेलों. हिनं देखील माझ्या विरुद्ध सही दिलेली होती.,'

"निमित्त तर बरं शोधून काढलंत तुम्हीं ?"—मी म्हणालों.

"कसलं निमित्त ? नी काय ? माझी एकट्याची हिंमत झाली म्हणतोस हिला भेटायला ? सोबतीला जोग आणि ए. आर. यांना घेऊन गेलों होतों. मी माझा दृष्टिकोन हिला समजावून सांगितला आणि मग हिनं आपली सही मागं

घेतली !"

"आणि गंमत काय होती ठाऊक आहे का ?--मी देखील त्या सत्कार-समितीची एक सभासद होत्यें !" विमलाताईनी हांसत सांगितलें.

शेवटीं विरोधाची सभा झाली. या सभेंत बाबा देशपांडे यांनीं आपलें इंग्रजी भाषण लिहून आणलें होतें तें वाचून दाखवलें. सभा दुपारीं चार वाजतां सुरू झाली ती रात्रीं दहाला संपली. संदेह दूर झाले. शंका नाहींशा झाल्या. सत्कार समारंभ करावा याच बाजूला ६०-७० मतें पडलीं. पण येवढें सांगून झालें, तरी पण या दांपत्यांत पहिला प्रेमिकपणा केव्हां संचारला हें मात्र दोघांनींहि सांगितलें नाहीं.

मी विचारलाच त्यांना तो प्रश्न !--"तें सगळं खरं हो, पण तुमच्या देहकणांतून आणि अंतःकरणांतून प्रेम कीं काय म्हणतात त्याचं पहिलं वहिलं परस्पराकर्षण केव्हां आणि कसं उत्पन्न झालं हें तर सांगाल कीं नाहीं ?"

आपलें शिवण विमलाताईनी बाजूला ठेऊन दिलें. त्यांनीं नचिकेतला पदराखालीं घेतला. बाबा आपल्या वाढलेल्या दाढीच्या खुंटाना आंजारीत गोंजारीत म्हणाले, "सांगतों बरं विमल, नाहींतर मागाहून भांडत सुटशील !"

विमलाताईच्या नेत्रांतून वसंत नाचत होता. त्या सांगायला लागल्या, "आमच्या वरार असोसिएशनसारखी दुसरी संस्था सबंध कॉलेजांतून नव्हती. मुलां-मुलींना या संस्थेमुळें एकत्र यायला मिळे. आमच्या क्लबची पार्टिंग फीस्ट होती-"

"पार्टिंग फीस्ट म्हणजे विरह भोजन !"— मी मराठीकरणाचा शास्त्रशुद्ध प्रयत्न करीत म्हटलें.

"अरे हेंच आमचें मीलन-भोजन समज ! We did not part but we met that night in the moonlight............... आम्ही त्या चांदण्या रात्रीच्या भोजनप्रसंगीं दुरावलों नाहीं तर एकमेकांच्या जवळ आलों."—बाबांना त्यांच्या पहिल्या भेटीचा प्रसंग आठवला—पूर्णपणें आठवला !

विमलाताई म्हणाल्या, "त्या दिवशीं इतकी थंडी होती कीं हातपाय गारठून वांकडे होण्याची पाळी आली."

आंतून जेवणाची वर्दी आली तेव्हां व्यवस्थेसाठीं विमलाताई आंत जाऊं लागल्या. मी बाबांना विचारलें, "तुमच्या मीलनाच्या सदृश प्रसंग 'बंधनाच्या

पलिकडे' कादंबरीत असेल ना ?

त्या दाराशीच थबकल्या. निषेधसूचक स्वरांत म्हणाल्या. " 'बंधनांच्या पलीकडे'मध्यें कोणतेच आत्मचरित्रपर प्रसंग नाहींत." त्या आंत गेल्या तेव्हां बाबा हळूच म्हणाले, "मी एक गुपित फोडूं का ? (Shall I betray a secret ?) विशाल जीवनांत तो शेगडीचा प्रसंग आहे ना, बस्स अगदीं तश्शी आमची पहिली भेट झाली."

विशाल जीवनांत शेगडीचा प्रसंग असा आहे—

" दहापंधरा वर्षांपूर्वीचा प्रसंग. शिशिर संपायचा होता. वसंत यावयाचा होता. वातावरणांतील गारवा पुष्कळच कमी झाला होता. दिवसा तर शिशिरापेक्षां लवकरच येणाऱ्या वसंताची प्रतीति अधिक प्रत्ययास येत होती. आणि या प्रतीतीच्या भुलावणीमुळें बेसावध राहिलेल्या कांहीं व्यक्ती रात्रीच्या गारव्यांत सांपडल्या कीं चांगल्याच गारठून जात. अशीच ती एक रात्र होती आणि दिवसाच्या प्रतीतीमुळें बेसावध राहिलेली शमा त्या रात्रीच्या गारव्यांत चांगलीच गारठूं लागली होती. आगामी वसंताच्या भुलावणीमुळें आल्हाददायक वाटणारा दिवसाचा गारवा रात्रींहि तसाच भासेल अशा अपेक्षेनें शमा दिवसाचेच विरविरीत कपडे घालून बाहेर पडली होती. बाहेर सुंदर चांदणें पडलें होतें. त्या चांदण्या रात्रीं कालेजांतील एका क्लबाची 'पार्टिंग फीस्ट' चांदण्यांतच व्हायची होती. चाळीस पन्नास मुलें, पाचसहा मुली आणि दोन तीन अध्यापक एवढाच जमाव होता. मुलांपैकीं दिलीप एक होता. मुलींपैकीं शमा एक होती.—

थट्टामस्करी, हास्यविनोद यांना भरतें आलें होतें. जेवण झालें. काव्यगायन झालें. आणि शेवटीं समारोपाचीं, निरोपाचीं भाषणें सुरू होतीं.

एका टोकाला मुलींच्या घोळक्यांत शमा बसली होती. दुसऱ्या टोकाला मुलांच्या घोळक्यांत दिलीप बसला होता. शमा थंडीनें अगदी गारठून गेली होती. आणखीहि एकदोन मुली हातपाय पोटाशी धरून कुडकुडत बसल्या होत्या. दिलीपाचें तिकडे लक्ष गेलें. त्यानें दोन तीन धगधगीत निखाऱ्यांच्या शेगड्या मुलींच्याकडे पाठवून दिल्या. शेगडीची ऊब लागतांच शमेला किती आनंद झाला ! दिवसाच्या वातावरणांत दुरून अनुभवास येणारा वसंताचा उन्मादकारी स्पर्श रात्रीं दिवसापेक्षाहि अधिक जवळ आल्यासारखें तिला वाटलें !—तिने सहज बाजूला

वळून पाहिलें. दिलीप तिच्याकडे पाहत होता. दिलीपानेंच वसंताची आळवण करून देणारे ते मधुर निखारे आपल्याकडे पाठवले, हें शमेच्या चटकन् ध्यानांत आलें.

भोजनोत्तर मी विमलाताईंना विचारलें, "बाबांनी सांगितलं हें खरं का?"

"जवळ जवळ तसंच घडलं होतं. मला अजूनही ती एकवीस साऴची फेब्रुवारी तीन तारीख आठवते. विशाल जीवनांतल्या सारखाच जवळ जवळ होता तो प्रसंग. त्यानंतर जवळ जवळ महिनाभर आम्ही एकमेकांशीं बोललों नाहीं.

"पण तुमच्या या अंतरींच्या खुणा एकमेकांना पटल्यानंतर एकमेकांच्या जीवनक्रमांवर एकमेकांच्या स्वभावांची छाप पडूं लागली असेल?"—मी विचारलें.

"१९२१ मध्यें असहकारितेची वावटळ उठली तेव्हां यांची बी. ए. ची परीक्षा दोन महिन्यांवर आली होती. आमची नुकतीच ओळख झाली होती. पण यांनीं खादी वापरायला सुरवात केली. कॉलेज सोडून दिलं. तसं करतांना आपलं कृत्य कसं समर्थनीय आहे याची जाणीव करून देण्यासाठीं एक लांबच्या लांब मारुतीच्या शेपटासारख पत्र पाठवलं. तें किती लांब असेल अशी तुमची कल्पना आहे?"

मी कल्पना करीत बसण्यापेक्षां पुढची हकीगत ऐकायला उत्सुक होतों. त्याच पुढें सांगूं लागल्या, "चांगले २५-३० कागद होते. एका पाकीटांत मावेनात म्हणून दोन पाकीटांतून कोंबलं होतं यांनीं आपलं समर्थन!"

"पण दोन्हीं एकदमच मिळालींत ना? कीं पडलांत घोटाळ्यांत?" मी कांहीं तरी गंमतीचा घोटाळा ऐकायला मिळेल अशी अपेक्षा करीत होतों.

"मी प्रत्यक्ष नेऊनच दिलीं होतीं तीं!" बाबांनीं सांगितलें.

बाबांनीं कॉलेज सोडलें. खादी वापरायला सुरवात केली. यांच्या कृतीचा त्यांच्या प्रेमिकेवरहि परिणाम झाला. तीहि खादी वापरायला लागली.

"चांगली गोणपाटासारखी खादी दोन वर्षं वापरली मी! तेव्हांपासूनच माझ्या अंतःकरणाला देशभक्तीची प्रेरणा मिळाली. पुढं मुळशी पेट्याच्या सत्याग्रहाच्या वेळीं देखील मी अशीच उफाळल्या अन्तःकरणानं कुसुमला पत्रें लिहिलीं होतीं." त्या सांगूं लागल्या. ही 'कुसुम' आज नागपूरच्या मॉरीस कॉलेजमधील इंग्रजी विषयाची प्राध्यापिका, प्रसिद्ध कवि श्री. आ. रा. देशपांडे यांची पत्नी आणि सुप्रसिद्ध कथालेखिका कुसुमावती देशपांडे म्हणून महाराष्ट्राला

परिचित आहे.

एका सवजन्माची मुलगी–अखिल महाराष्ट्रांत सुधारक म्हणून गाजलेल्या कोल्हटकर घराण्यांतली मुलगी, 'श्रीपाद कृष्णा' सारख्या साहित्यसम्राटाची पुतणी,– सुविद्य, संपत्तिमान, तिनें मनांत आणलें असतें तर तिच्या वडलांना एखादा आय. सी. एस. किंवा तसाच मोठा हुद्देदार नवरा तिला मिळवून देतां आला असता. कोकणस्थांना देशस्थ कमी दर्जाचे वाटत असत तेव्हांच्या काळीं, एका सनातनी देशपांडे घराण्यांतल्या कॉलेज सोडून बाहेर पडलेल्या व पुन्हां गांधीजींच्या कार्यक्रमाचा फोलपणा लक्षांत येतांच कॉलेजमधील आपला नंतरचा शिक्षणक्रम कसाबसा पार पाडणाऱ्या तरुणाबरोबर विवाहवचनानें बद्ध होणारी कुमारी विमल कोल्हटकर, एम. ए. म्हणजे त्या वेळीं सर्वांना न उलगडणारें एक कोडें वाटत होती.

वैभवासाठीं त्यांचें मन आसुसलें नव्हतें. त्याला खऱ्या जिव्हाळ्याची गरज होती. त्या मला म्हणाल्या, "माझं बाबावर प्रेम जडलं तें तो एखाद्या श्रीमंत देशपांड्याचा मुलगा म्हणून नव्हे. तसं म्हटलं तर मला वैभवाची नव्हाळी नव्हती. I find in him the man I dreamt of. मला माझा पुरुषोत्तम सांपडला."

'बंधनाच्या पलीकडे' या कादंबरीमध्यें आत्मचरित्रपर प्रसंग नाहींत तरी पण पितापुत्रामधील घरगुती विचारसंघर्ष (thought process) त्या कादंबरींतून जागोजागी आढळून येतो.

'पी. वाय.' यांचें घरगुती लाडकें नांव मिनीबाबा आहे. लग्नानंतरहि विमलाताई त्यांना सुरुवातीला 'बाबा' या एकेरी नांवानेंच हांक मारायच्या! पण मग पुढें मात्र त्यांना बहुमानार्थी निनांवानें संबोधण्याचा अभ्यास करावा लागला.

मी त्यांना विचारलें, "लग्नानंतर तुम्हांला एका नव्या जगांत वसाहतीला गेल्यासारखं वाटलं असेल–चुकल्याचुकल्यागत वाटलं असेल!"

"तसं झालं खरं! लग्नानंतर एक टोंक सोडून मी दुसऱ्या टोंकाला गेल्यें!" एखादी चिमुरडी मुलगी आपण पाहिलेलें अद्भुत नवल दुसऱ्या शेजारच्या मुलाला सांगते त्यावेळीं तिच्या मुद्रेवर जे भाव दिसूं शकतील ते सगळे त्यांच्या चर्येवर दिसत होते. त्या पुढें सांगूं लागल्या, "मला काय अडचणी आल्या असतील

याची कल्पना करा तुम्ही; सगळं मला adjust करून घ्यावं लागलं पण तें केवळ सासरची मंडळी चांगली होती म्हणूनच होऊं शकलं !"

"पण तुम्हाला सार्वजनिक कामांत भाग घेण्यासंबंधी कांहीं अडचणी आल्या असतीलच ?" मी ऐकीव गप्पांचा आधार घेत म्हणालों.

"मुळीच नाहीं; उलट टिळक सप्ताहांत, सरकारी कॉलेजांत वगैरे माझी व्याख्यानें होत होतीं." त्या म्हणाल्या.

"आणि मला मात्र कोणी विचारत देखील नव्हतं !" बाबांनी मध्येच तोंड घातलें.

"आपल्या समाजाला किनई शिकलेल्या बायकांचा फाजील वडेजाव करण्याची संवयच लागलेली आहे बाबा !" मी त्यांची समजूत घातली.

आम्ही दोघे पुरुष एकमताचे झालों म्हणून विमलाताईंना वाईट वाटलें नाहीं. उलट त्या मोकळेपणानें हांसल्या. माझ्या या उक्तीनें तसें म्हटलें तर त्यांच्या बुद्धिमत्तेला उणेपणा आणण्याचा निर्हेतुक प्रयत्न घडला. पण त्यांना आपल्या बुद्धिमत्तेची योग्य जाणीव होती. मला माहित आहे कीं त्यांच्या त्या इंग्रजी वक्तृत्वाची तारीफ अनेकदां 'किंग एडवर्ड' कॉलेजचे प्रिन्सिपॉल मि. टास्ट्वीन यांनीं विद्यार्थ्यापुढें केलेली होती. आज देखील त्यांचें अस्खलित आणि जिव्हाळ्यानें ओथंबलेलें असें वक्तृत्व ज्यांनीं ज्यांनीं ऐकलें असेल ते त्याची प्रशंसा केल्याशिवाय राहणार नाहींत.

"तुमचं लग्नाआधींचं जीवित-ध्येय कोणतं होतं ?"

या माझ्या प्रश्नाला उत्तर देतांना त्या म्हणाल्या—

"तें कांहीं विचारूं नका. लग्नाआधीं अगदी तेव्हांचंच ठराविक ध्येय होतं ! एक आदर्श शिक्षणसंस्था चालवायची, स्त्रीशिक्षणाचा प्रसार करण्यासाठीं आजन्म अविवाहित रहायचं ! या विचारांचा पगडा माझ्या मनावर इतका बसला कीं आम्हां दोघांची मैत्री जुळल्यानंतर देखील जवळ जवळ अडीच वर्षांनंतर आम्हीं आमचा वाङ्निश्चय ठरविला.

"सप्टेंबर १९२३ !" बाबांनीं इतिहासाच्या एखाद्या हुशार विद्यार्थ्याच्या ऐटींत महिना आणि सन सांगून टाकले.

पतीच्या करतां आपलें विवाहपूर्व ध्येय सोडून त्याच्याच जीवनांत समरस

झालेल्या या विदुषीनें शिक्षणसंस्था काढून ती यशस्वी रीतीने चालविण्याचें आपलें स्वप्न खरें करून दाखविलें. माता झालेल्या विमलाताईंना बालकांच्या शिक्षणाचा प्रश्न जिव्हाळ्याचा वाटूं लागला. नागपूरला पी. वाय. रहायला आले तेव्हां विमलाताईंनीं स्वतःसाठीं कार्यक्षेत्र निवडलें. भगिनी समाज आणि महिला परिषद या स्त्रीवर्गाच्या उन्नतीसाठीं झटणाऱ्या संस्थांच्या प्रमुख कार्यकर्त्यांमध्यें त्यांची गणना होते; आणि भगिनी समाजाच्या इतर भगिनी रागावणार नसतील तर, मी हें हि पण म्हणून टाकतों कीं आज नागपुरांत महाराज बागेच्या मागें जी बालक मंदिराची १२–१५ हजाराची इमारत आहे तिला विमलाताईंचेच परिश्रम प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कारणीभूत झालेले आहेत. बालकांच्या मनोविकासाचें त्यांनी अध्ययन केलेलें आहे. त्यांनीं अनेकदां या विषयावर लेख लिहिण्याचेंहि ठरविलें.

"—पण वेळ मिळत नाहीं," ही त्यांची नित्याचीच सबब आहे. मी त्यांना म्हणालों, "तें कांहीं नाहीं विमलाताई, तुम्हीं आतां पुन्हा लिहायला लागलं पाहिजे !"

"तसं म्हटलं तर मी मुळींच सोडलं नाहीं हं !, मधून मधून मी कविता लिहिल्या आणि त्या मासिकांतून प्रसिद्धहि झालेल्या आहेत. त्यांचा एकत्र संग्रह करणार म्हणत्यें, पण तसंच मागं राहतं तें या ना त्या कारणामुळं! मागं 'फुलवात' निघाली तेव्हां ठरलं होतं पण त्यावेळीं राजकारणाच्या आणि इतर भानगडी लागल्या आमच्या पाठीमागें! शिवाय 'निर्माल्य माला' या नांवानं आम्हां दोघांच्या कवितांचा एकत्र संग्रह याच सुमारास निघाला. तसं म्हटलं तर 'ए. आर.' 'कुसुम' आणि बाबा यांच्या अगोदर मीच लिहायला सुरुवात केली नि आतां सगळ्यांत मीच मागासलें."

गेल्या बारा वर्षांत खुद्द बाबांनीं चार कादंबऱ्या लिहून प्रसिद्ध केल्या आणि त्यांची एक कादंबरी व एक लेखसंग्रह हा महिना अखेर बाहेर येईल. श्री. आ. रा. देशपांडे यांनीं देखील दोन काव्यग्रंथ प्रकाशित केले आहेत, आणि त्यांची पत्नी व विमलाताईंची जिवलग मैत्रीण कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या देखील दोन कलाकृती बाहेर पडल्या. विमलाताईंना मात्र त्यांचें वैषम्य वाटत नाहीं. त्या सांगूं लागल्या,

"आणि खरं सांगायचं म्हणजे बाबाच्या Expression पुढं मला माझं

expression फिक्कं वाटायला लागलं. त्यांच्या विचारप्रकटीकरणाच्या भव्यपणानं आम्हीं सारेच थक्क होऊन गेलों. त्यांची कादंबरी मी वाचली आणि लिहिणं जरा बाजूला सारलं. कारण He expresses better than I. हे जर साहित्यिक झाले नसते तर मात्र खात्रीनं मी लिहिलं असतं. आतां माझं नुसतं बोलणंच उरलं !"

बाबांना हा आरोप सहन झाला नाहीं. त्यांनीं आपल्या पत्नीचा निषेध करण्यासाठीं एक नवी सिगारेट पेटविली आणि ते कुरकुरत म्हणाले, "हा माझ्यावर आरोप आहे हं ! वाटल्यास 'हे रद्दी लिहितात म्हणून त्यांच्यापेक्षां चांगलं लिहून यांची बेअब्रू करण्याचं टाळतें' असं म्हण !"

"खोटं खोटं नाहीं सांगणार मी !"—विमलाताई म्हणाल्या.

"मग असं जर असेल तर मला लिहिणं तरी सोडलं पाहिजे किंवा तुझ्या आयुष्यांतून निघून तरी गेलं पाहिजे." बाबा जरा गंभीरपणानेंच उद्गारले.

"तुम्हांला असं वाटतं विमलाताई कीं बाबा तुमच्या जीवनामधून निघून जातील ?" मीं ओघानेंच विचारलें.

त्या क्षणभर गंभीर बनल्या. त्यांनीं आपलें शिवण थांबवलें !—त्यांच्या हृदयांत त्यावेळीं कोणत्या भावनावीचि उसळल्या असतील त्याची त्यांच्या पतीला तरी कल्पना असेल का ?

त्या संथपणानें उत्तर देत होत्या. त्यांच्या शब्दांतून विश्वास ओघळत होता, "मी या गोष्टीची कधीं कल्पनाहि केली नाहीं आणि कधीं पुढं करणारहि पण नाहीं. हे बोलताहेत म्हणून काय झालं ? शब्द हे बोलायला सोपे असतात.—"

"खोटं वाटतं तुला विमल ?—" बाबा फटकळपणानें बोलत होते; ते माझ्याकडे वळून म्हणाले, "खरं सागायचं म्हणजे We are in permanent dread of leaving each other for good !"

"तर तर !—अशी बरी मी जाऊं देईन !"—विमलाताई खंबीरपणें म्हणाल्या.

मला त्यांचा खंबीरपणा पटला. पतीच्या जीवनांत हरघडी समरस होणारी ही चार मुलांची माता आपल्या पतीला नीट कावूंत ठेवण्याइतकी खंबीर मनाची आणि प्रेमळ अन्तःकरणाची आहे हें त्यांचा परिचय असलेल्यांना चांगलेंच माहित

आहे; आणि शिवाय आपल्या पतीला असें कांहींतरी तऱ्हेवाईक बोलण्याची संवय आहे याची देखील त्यांना पूर्ण जाणीव आहे ! बाहेरच्याच दारांतून आंत फेकलेला दुपारचा टाइम्स बाबांनीं उचलला. आम्ही सर्वांनींच महत्त्वाच्या बातम्या वाचून काढल्या.

झोपलेला नचिकेत भुकेनें चिमटा काढला म्हणून खवळून उठला. त्याच्या-साठीं त्याच्या वहिणीनें—कलेनें त्याची दुधाची बाटली आणून दिली. दुधाचा फन्ना उडविलेला नचिकेत पायाचा आंगठा चोखण्याचा व्यायाम करूं लागला.

बाबांनीं त्याला दटावलें व उचलून जवळ घेतलें. आईबापांत मुलाच्या स्वरूपाची चर्चा सुरू झाली.

मी नचिकेतचे मोठे कान बघून म्हणालों, "बाबा, मोठे कान असणं हें हुशारीचं लक्षण असतं बरं !"

"मनुष्यानं आशावादी असायला कांहीं हरकत नाहीं !" त्यांनीं उत्तर दिलें.

मी दोघांनाही उद्देशून बोलूं लागलों,—"तुमच्यांत आणि बाबांत मतभेद झालेला मला तरी कधीं दिसून आला नाहीं. दोघांनीहि एकदमच समाजसत्ता-वादाचा स्वीकार केलांत ?"

मिरत कटाच्या खटल्याच्या निकालाच्या निषेधाची सभा अमरावतींत झाली तेव्हां या दोघांहि पतिपत्नींचीं भाषणें झालेलीं होतीं. पतीच्या भाषणांत भावनांचा प्रक्षोभ होता तर पत्नीच्या बोलण्यांत विचारांचा समतोलपणा होता. त्यावेळीं असाहि प्रवाद उठलेला होता कीं पत्नीचें कायद्याची कांटेकोर मर्यादा सांभाळणारें भाषण पतीच्या वर होणारा खटला टाळूं शकलें !

मग या पतिपत्नींत कधीं मतभेदाचे प्रसंग आलेच नसतील का ?

मी तसें विचारलें तेव्हां बाबा म्हणाले, "मतभेदाचे कितीतरी प्रसंग आले ! —कांहीं कांहीं वेळां तर शेंडी तुटो की पारंबी तुटो असे अटीतटीचे !"

"राजकीय बाबतींत ?" मी विचारलें; कारण अडीच तीन वर्षांपूर्वी मध्यप्रांताच्या राजकारणांत उठलेल्या वादळाच्या प्रसंगीं तर त्यांनीं आपल्या पतीचाच पक्ष उचलला होता. "नाहीं." विमलाबाई म्हणाल्या.

"मग साहित्यांत ?"—

"तें तर मी मघांच सांगितलं !"

सोडून दिला झालें मी त्या प्रश्नाचा नाद! बाबा कांहीं तरी सांगतील यांचीहि आशा धरतां येत नव्हती, कारण ते नचिकेतला ठेवून माडीवर निघून गेले होते.

"तुम्हाला बाबांची कोणती कलाकृति जास्त आवडते?" हा माझा प्रश्न ऐकून त्या क्षणभर स्तब्ध झाल्या, आणि मग सांगूं लागल्या—

"मला त्यांचीं सर्वच पुस्तकें आवडतात. तुलना करणं जरा कठीण आहे. पण माझ्या मुलांच्या प्रमाणंच मला त्यांचीं पुस्तकं आवडतात. या ना त्या दृष्टिकोनांतून प्रत्येक पुस्तक मला आवडतं. मुलांच्या बाबतींत नाहीं कां एखादं स्वरुपाकरतां आवडतं तर दुसरं त्याच्या दुबळेपणामुळंच जास्त चित्त वेधून घेतं!"

"त्यांचं वाङ्मय पुरोगामी आहे हें निर्विवाद, पण तें जरा प्रचारकी थाटाचं नाहीं का?" मी विचारलें.

"नाहीं. त्यांच्या कादंबऱ्या विचारप्रक्षोभक आहेत. पण त्या प्रचारकी मात्र मुळींच नाहींत. त्यांचीं भाषणें मात्र बरींचशीं प्रचारकी असतात हें मी कबूल करत्यें."

यावेळीं आम्हीं झोला, डिकन्स आणि टॉलस्टॉय यांच्या कादंबऱ्यांचीं उदाहरणें घेऊन पुरोगामी आणि प्रचारकी वाङ्मयाची चर्चा केली.

फडके यांच्या कादंबऱ्यांप्रमाणें पी. वाय. यांच्या कादंबऱ्या केवळ दोन घटका मनोरंजनच करीत नसून त्या वाचकांना विचारोन्मुख करतात, हें माझें मत त्यांना पटलें.

आपल्या गालांवरच्या खुंटाना रजा देऊन बाहेर जाण्याच्या पोषाखांत बाबा खालीं उतरले, मला म्हणाले, "काय संपलंच नाहीं अजून बोलणं?"

"थोडं उरलं आहे! आतां एक प्रश्न विचारला कीं खलास!" मी सांगितलें.

बाबांचें कुतूहल जागृत झालें. ते म्हणाले, "कोणता?"

"मी त्यांना एका वाक्यांत तुम्हाला sum up करायला सांगणार आहें!

बाबांनी नुकताच आलेला चित्रेचा अंक उचलला व कॉमरेड एलन रॉय यांची मुलाखत त्या अंकांत नव्हती तरी ती वाचण्याचें खट्याळ नाटक करीत म्हटलें, "He is too great to be summed up in one sentence."

बाबांच्या या खिजवण्याकडे मी लक्ष दिलें नाहीं पण विमलाताई जरा रोषाने म्हणाल्या, "तुम्हीं जा पाहूं!—मग मला काय सांगायचं तें मी सांगेन!"

"मला भितेस वरं! खरं म्हटलं तर मी गेल्यावर ही माझ्याबद्दल मोकळ्या मनानें सांगूं शकेल!"–बाबा गॅरेजकडे निघून गेले.

मोटार निघून गेल्याचा आवाज झाल्यावर विमलाताई म्हणाल्या, "तुम्हीं विचारलेल्या सगळ्या प्रश्नांचीं उत्तरें मी दिलीं; परंतु हें फारच कठीण आहे तेव्हां आपण सोडून देऊं या.

"मी स्वतः बुद्धिमान आहें. मला analytical faculty आहे. अपेक्षित सर्व कांहीं मला मिळालें आहे... अनूकूल संधि मिळाल्यामुळें मोठीं झालेलीं माणसें मी पाहिलेलीं आहेत. मी Subjectively सांगत नाहीं, Objectively सांगतें. Subjectively सर्वांनाच आपापलीं माणसें मोठीं वाटतात, पण यांच्या व्यक्तित्वांत मी माझें स्वतंत्र व्यक्तित्व विसरून गेलें आहें. माझा विलक्षण आग्रहीपणा पूर्णपणें निघून गेला. आतां मी माझें स्वत्व विसरून गेलें आहें."

विमलाताईंनी जणु आपला हृदयभार हलका केला आणि त्या सकाळपासून दुसऱ्या एका खोलींत एकट्याच असलेल्या आपल्या पाहुण्या मैत्रीणिकडे बोलायला निघून गेल्या. पण लागलीच एका क्षणांत परत येऊन म्हणाल्या, "असं पहा, हें शेवटचं आपलं बोलणं तुम्ही छापूं नका!"

मी तसें करण्याचें त्यांना वेलाशक आश्वासन देऊन टाकलें आणि तेव्हांच्या तेव्हांच मनांत असेंहि ठरवून टाकलें कीं तें आश्वासन पाळायचें म्हणून नाहीं.

७ जानेवारी १९४१

"तशी मीहि सोशा-लिस्ट मताची आहे. पण मला अहिंसा मान्य आहे आणि यांना अमान्य आहे. तरीपण त्याचं मला वाईट वाटत नाहीं. कारण हा ज्याच्या त्याच्या मताचा प्रश्न आहे. सार्वजनिक जीवनांत स्त्री ही पुरुषाची छायाच असली पाहिजे या मताची मीहि नाहीं अन् हेही नाहींत."



प्रभावतीदेवी आवेशानें म्हणाल्या. त्यांच्या डाव्या डोळ्यावर लोंबणारी केसांची बट त्यांनीं बाजूला सारली आणि त्यांनीं आपल्या पतीकडे पाहिलें.

जयप्रकाश नारायण यांनीं आपल्या पत्नींच्या म्हणण्याला दुजोरा दिला. ते म्हणाले, "ही गांधीजींची अनुयायी असल्याबद्दल मलाहि मुळींच वाईट वाटत नाहीं. जगांत मतभेदाला स्थान असलेंच पाहिजे; नाहीं तर आयुष्य कंटाळवाणें होईल."

आमची गाडी त्या वेळीं पुलावरून एका रुंद नदीचें पात्र ओलांडून जात असल्यामुळें जो आवाज झाला त्यामुळें त्यांनीं आपलें बोलणें मध्येंच थांबवलें.

प्रभावतीदेवी जयप्रकाश नारायण यांच्या बरोबर नागपूर मेलनें प्रवास करीत असतांना त्यांची मी मुलाखत घेत होतों. थंडीचा प्रतिकार करण्यासाठीं प्रभावती देवींनीं एक शाल आपल्याभोवतीं लपेटून घेतली होती.

गया काँग्रेसचे स्वागताध्यक्ष कैं. दे. भ. बाबू व्रजकिशोरप्रसाद यांची थोरली कन्या, डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या स्नुषेची थोरली बहीण, कै. कमलादेवी नेहरु यांची जिवलग मैत्रीण, आणि रामगड काँग्रेसची जी. ओ. सी. असलेली प्रभावतीदेवी ही जयप्रकाश यांची पत्नी असल्याचें मला माहित नव्हतें. तीन तासांपूर्वी सेवाग्रामला महात्मा गांधी यांच्या कुटीबाहेर मी प्रभावतीदेवी यांची वाट पहात उभा राहिलों होतों. सेवाग्रामच्या गोशाळेचे प्रमुख आणि माझे मित्र श्री. पारनेरकर हे एका पोरसवदा बाईला आपल्या सोबत घेऊन बाहेर आले आणि म्हणाले, "याच तुम्हाला हव्या असलेल्या प्रभावतीदेवी,–जयप्रकाशजींच्या पत्नी !"

आमचा औपचारिक परिचय करून पारनेरकर निघून गेले. पण मी मात्र मनांतल्या मनांत खजीलच झालों. कारण त्यांना मी अनेकदां महिलाश्रमांत पाहिलें होतें. त्यांची नम्रता आणि विनयशीलता सहज कोणालाहि कळून येते. देशविख्यात नेत्याची धर्मपत्नी असल्याचा अहंकार किंवा स्वतःच्या कर्तृत्वाचा तोरा यांचा लवलेशही त्यांच्या बोलण्याचालण्यांत मला तेव्हां आणि नंतर दिसून आला नाहीं.

माझा त्यांना भेटण्याचा उद्देश मी त्यांना समजावून सांगतांच त्या क्षणभर गोंधळल्या आणि हिंदींत म्हणाल्या: "खरं सांगायचं म्हणजे मला काय सांगावं हेंच समजणार नाहीं आणि शिवाय अर्धा एक तासानें आम्हीं उभयतां नागपूर मेलनें प्रवासाला निघणार आहोंत; तेव्हां त्याची आंवरासावर करायला नको का मला ? अन् अजून बापूंशीं बोलायचंहि पण आहे थोडं फार !"

मुलाखत्यानें ब्रह्मसमंधाची भूमिका पत्करावी असें मला वाटतें. सहजासहजीं आपलें झाड सोडून त्यानें जाऊं नये. थोडें फार झाड बोलतें करण्यांतच त्याचें कौशल्य असतें. मी त्यांना सुचविलें, "जर आपण तिसऱ्या वर्गानें प्रवास करीत असाल तर मग मीहि येईन कीं, त्यांत काय मोठंसं !"

त्यांनीं त्या गोष्टीला रुकार दिला आणि मी बरोबर मेलच्या वेळेवर स्टेशनवर हजर पण झालों. आगगाडींतल्या गर्दीनें मात्र माझी चांगलीच निराशा केली.

जयप्रकाश यांनीं सामानासह स्वतःला कसेंबसें एका डब्यांत कोंबून घेतलें, स्त्रियांच्या डब्यांत प्रभावतीदेवी यांनीं आश्रय घेतला. त्या मला म्हणाल्या, " आतां मात्र नाइलाज आहे हं माझा !"

मी जेव्हां दोन तीन स्टेशनांनंतर जयप्रकाश यांच्यासह त्यांना एका सोयीस्कर डब्यांत घेऊन जाण्यासाठीं गेलों तेव्हां त्या आश्चर्यानें म्हणाल्या, " अच्छा, आप आ गये."

मी सांपडेल त्या डब्यांत शिरून ओळखीच्या रेल्वे अधिकाऱ्याकडून दुसऱ्या स्टेशनवर एका लहानग्या डब्यांत जागा मिळवून घेतली आणि जयप्रकाश यांना त्या डब्यांत येण्याची विनंति केली.

प्रभावतीदेवी आणि जयप्रकाश यांनीं आपला प्रवासी संसार नीटनेटका मांडला. आगगाडींत एका बांकावर एकमेकांकडे बघत एकाच पात्रसमुच्चयांतून भोजन करणाऱ्या त्या पतिपत्नीकडे मी बराच वेळ कुतूहलानें बघत राहिलों.

धांवत्या आगगाडींत भोजनप्रसंगीं, नुकत्याच झालेल्या महात्मा गांधींच्या त्यांच्या भेटीची ते दोघेहि चर्चा करीत होते. जयप्रकाश हे संथपणानें बोलत होते तर त्यांच्या बोलण्याचा नुसता मनमोकळा चिवचिवाट होता. पण माझ्या प्रश्नांचीं उत्तरें देतांना मात्र त्या विचारपूर्वक एकेक शब्द तोंडावाटे काढत.

उदाहरणार्थ मी जेव्हां त्यांना विचारलें, " जयप्रकाश यांच्याबरोबर असे एकत्र जेवण्याचे प्रसंग आपल्याला अनेकवार येत असतील, नाहीं ?"

अगदीं साधा प्रश्न, पण त्यांनीं एकदम कांहीं त्याचें उत्तर दिलें नाहीं. त्यांनीं प्रथम आपल्या पतीकडे पाहिलें, मग उत्तर दिलें, तें अगदीं मोजक्या शब्दांतच !—" फारच थोडे येतात असले प्रसंग ! घरीं तर क्वचितच येतात."

" पण तुम्ही कधीं स्वतः यांना जवळ बसून जेवायला घालतां कीं नाहीं ? कारण प्रत्येक व्यक्तीच्या खाण्यापिण्याच्या वेगवेगळ्या आवडीनिवडी असतात !" मी विचारलें.

माझ्या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी त्या एकदां आपल्या पतीकडे बघून घेतात हें मला आतांपर्यंतच्या व पुढें झालेल्या संभाषणावरून दिसून आलें.

त्यांनीं जयप्रकाश यांच्याकडे पाहिलें, तेव्हां तेच हांसून म्हणाले, "त्याचं असं आहे कीं, मी आहें मांसाहारी आणि अहिंसा तर हिचा प्राण! घरगुती जेवणांत मात्र मला फारशा आवडी निवडी कांहींच नाहींत. मात्र येवढं खरं कीं हिच्या हातचं जेवण मोठं गोड लागतं. मला मांसाहाराची इच्छा झाली कीं मी बाहेर जेवतों."

"मग या बाबतींत तुमचे कधीं मतभेद झाले नाहींत?" मी विचारलें.

"जेवणांत कसले आले मतभेद?" जयप्रकाश यांनीं मलाच उलट प्रश्न केला.

"बरं तें असो, पण इतर बाबतींत तरी झाले असतीलच कीं नाहीं? कारण तुम्हीं सोशालिस्ट आणि या तर कट्टर गांधीवादी!"—मी तोच मुद्दा पुढें चालू केला.

आणि त्या वेळीं मात्र प्रभावतीदेवी यांनीं नित्याप्रमाणें पतीकडे न पाहतां माझ्याकडे पाहिलें आणि माझ्या प्रश्नाला उत्तर दिलें.

प्रभावतीदेवींनी सार्वजनिक जीवनामध्यें पत्नी ही पतीची छाया असलीच पाहिजे या रूढ विचाराच्या जणुं चिंधोट्याच केल्या आणि जयप्रकाशांनीं त्यांच्या आवेशाचें, दुजोरा देऊन कौतुक करीत त्या चिंधोट्या जणुं काय धांवत्या आगगाडी बाहेरील अंधारांत भिरकावून दिल्या.

प्रभावती देवींच्या विशाल डोळ्यांत त्या वेळीं अभिमानाचें पाणी झळकत होतें. त्यांच्या आंगावर एकहि दागिना नव्हता. नाहीं म्हणायला हातांत होत्या दोन दोन कांचेच्या बांगड्या आणि डाव्या कृश मनगटावर बांधलेलें एक सोन्याचें घड्याळ! त्यांच्या गौरवर्ण चेहऱ्याला शोभणारा असाच त्यांचा उंच भालप्रदेश असून दोन भिंवयांच्या मध्यें इवलासा कुंकुमतिलक त्याला शोभा आणत होता. माथ्यावरून सरणारा पदर मधून मधून त्या सावरीत होत्या.

मी जयप्रकाश यांनाच विचारलें, "यांच्या मदतीची अपेक्षा तुम्हीं स्वतःच्या राजकारणासाठीं करतां कीं नाहीं?"

"नाहीं. पण घरीं होणाऱ्या भभांच्या वेळीं हिची मला मदत होते आणि माझ्या पत्रव्यवहारांत देखील हिची मदत होतेच ना!" त्यांनीं मला सांगितलें: "अतिथीसत्काराचें सारें श्रेय त्यावेळीं हीच घेते."

मी प्रभावतीदेवींना विचारलें, 'मग तुम्ही आपलें स्वतःचें कोणतें राजकारण करतां?"

" कां बरं ?" त्यांनीं उत्तर दिलें, "बापूंचा विधायक कार्यक्रम करतें म्हटलं तर सारा जन्म देखील पुरायचा नाहीं. तूर्त बिहारमध्यें मी स्त्रियांमध्यें राष्ट्रीय जागृति करण्याचें काम करीत आहें.

" तुम्हाला माहित नाहीं, आमच्या बिहार प्रांतांतील स्त्रिया अत्यंत मागासलेल्या अवस्थेंत आहेत. पडद्याची घातुक चाल अजूनहि तेथें जिवंत आहे. ज्या वेळीं रामगड कॉंग्रेसची जी. ओ. सी. म्हणून माझी निवड करण्यांत आली तेव्हां माझा खेडूत स्त्रियांशीं जिव्हाळ्याचा संबंध आला. खेड्यांतील स्त्रिया मोठ्या उत्साहानें स्वयंसेविका म्हणून पुढें आल्या. प्रेमाबेन आणि इंदुमती गुणाजी यांनीं त्यांना शिक्षण दिलें. धीट बनवलें. त्यांचा हा उत्साह पाहून माझ्या मनांत विचार आला; आतां कॉंग्रेस संपल्यानंतर या स्त्रिया आपापल्या गांवीं जातील, वैयक्तिक संसारांत रममाण होतील. यांच्या अंतःकरणांत जागृत झालेली देश-प्रीतीची ज्योत विझून जाईल. ती सतत जागृत ठेवण्यासाठीं आपण कांहीं तरी केलें पाहिजे असा विचार माझ्या मनांत आला."

आणि त्यांनीं काय केलें, आहे कां माहित ? पाटण्यालाच प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ डॉ. ग्यानचंद हे तेथील सरकारी कॉलेजमध्यें प्राध्यापक आहेत. त्यांचा विवाह अनसूयाबाई बागळे नांवाच्या एका महाराष्ट्रीय बाईबरोबर झालेला आहे. त्यांच्या मदतीनें त्यांनीं स्त्रियांच्या जागृतीचें कार्य सुरू केलें आहे. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें सुचरिता कृपलानी यांच्या नेतृत्वाखालीं स्त्रियांमध्यें जागृती निर्माण करण्यासाठीं प्रांतोप्रांतीं कमिट्या स्थापन केल्या आहेत. बिहार प्रांत कॉंग्रेस स्त्रीविभागाचें नेतृत्व आणि संचालन प्रभावतीदेवी करीत असतात.

अनसूयाबाई बागळे यांच्या सहकार्यानें प्रभावतीदेवी यांनीं पाटणा, गया, हजारीबाग, भागलपूर, कुमला इत्यादि प्रमुख शहरीं कांतण्याचे वर्ग सुरू करण्यांत स्वतःच्या राजकीय आदर्शांना अनुसरून कार्याचा ओनामा घातला. कांतण्याच्या निमित्तानें स्त्रियांना एकत्र जमवून त्यांना गांधीजींची विचारसरणी समजावून सांगण्याचा त्यांचा उपक्रम प्रचाराचें तंत्र म्हणून चांगला असला तरी खेड्यांतून त्यांना अजून शिरकाव करून घेतां आला नाहीं याची त्यांना जाणीव आहे.

मी विचारलें " खेड्यांतील स्त्रिया जागृत होऊं शकतील कां ?"

" होतील तर—पण अजून कार्यकर्त्या स्त्रिया बहुसंख्येनें निर्माण झाल्या

पाहिजेत. आमच्या समोर कार्यांचे डोंगर आहेत पण आम्हीं जेमतेम सुरुवात केली हेंहि तितकेंच खरें !" त्या स्वतःचें समाधान करीत म्हणाल्या.

"या तुमच्या कार्यांत तुम्हांला सुशिक्षित स्त्रियांची मदत नाहीं कां होत ?" मी विचारलें.

"मी आतांच सांगितलं होतं कीं पाटण्याला अनसूयाबेन वागळे व्याख्यानें वगैरे देण्यास मदत करतात म्हणून ! तसंच ज्या कॉलेजमधल्या मुली कॉंग्रेसच्या वेळीं स्वयंसेविका बनलेल्या होत्या त्यांनींहि मदत करण्याचें आश्वासन दिलेलें आहे. त्यांची कॉलेजें आतां परीक्षा संपल्यावर बंद होतील तेव्हां त्या करतीलच आम्हांला मदत !

"कुलीन आणि थोर घराण्यांतल्या महिला कीं ज्यांनीं रस्त्यांतून पायीं चालत जाणें म्हणजेच सारा घराण्याचा लौकिक धुळीस मिळणें, अशी वेडी समजूत जेथें अजून नांदत आहे त्या घरंदाज महिला आतां माझ्याबरोबर खादी विकायला चालत येतात. हें काय थोडें झालें ?"

त्यांचें म्हणणें कांहीं चुकीचें म्हणतां येणार नाहीं. बिहार हा प्रांत बंगाल किंवा संयुक्त प्रांत यांच्या मानानें अजूनहि फारच मागासलेल्या अवस्थेंत आहे. पण त्याच प्रांतांत मागें जेव्हां किसानांनीं स्वामी सहजानंद व राहूल सांकृत्यायन यांच्या नेतृत्वाखालीं आपल्या जमिनीच्या हक्काचा जो लढा लढविला त्यांत खेडुत स्त्रियांनीं आपल्या पुरुषांच्या बरोबरीनें भाग घेतलेला होता.

"ही प्रेरणा त्या खेडूत स्त्रियांना कोणी दिली ?" मी प्रश्न विचारला; पण प्रभावतीदेवी या प्रश्नाचें उत्तर देऊं शकल्या नाहींत. त्यांनीं जयप्रकाशांच्याकडे गोंधळलेला दृष्टिक्षेप टाकला. जयप्रकाश हांसून म्हणाले, "हा प्रश्न तिच्या दृष्टिकोणाच्या बाहेरचा आहे."

त्या वेळीं किसानांच्या स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून जो तीव्रतर स्वरूपाचा प्रतिकार करीत होत्या त्याचें कारण तो त्यांच्या जीवन-मरणाचा प्रश्न होता. जमीन ही शेतकऱ्यांच्या जीवनांतली मूलभूत आवश्यकता आहे तीच हिरावल्या जाण्याचा प्रश्न असल्यामुळें किसान स्त्रिया आपोआपच जागृत झाल्या.

चरख्याचा संदेश स्त्रियांना सांगून जागृति करण्याचा कॉंग्रेसचा मार्ग इतका परिणामकारक नसून प्रत्यक्ष प्रसंग आला तर चरख्याचा संदेश न ऐकलेल्या

महिला देखील जीवन–मरणाच्या प्रश्नासंबंधी रण माजवूं शकतील आणि अन्यायाचा प्रतिकार करण्यांत अग्रेसर होतील असें बिहारच्या किसान स्त्रियांनीं आपल्या शौर्यानें तेव्हां सिद्ध केलें होतें.

" आपल्याला देशभक्तीची प्रेरणा जयप्रकाश यांच्यामुळेंच मिळाली ना ?" मी त्यांना विचारलें.

प्रभावतीदेवी किंचित् हांसून म्हणाल्या, "मुळींच नाहीं. माझे वडील हेच स्वतः उत्तम कार्यकर्ते होते. चंपारण्यांतील लढ्याच्या वेळीं त्यांनीं बापूजींना चांगलीच मदत केली. त्यांच्यामुळें मला कांहीं तरी देशासाठीं करावें अशी इच्छा होऊं लागली."

देशभक्तीचें बाळकडू मिळालेल्या या महिलेचा विवाह वयाच्या १५ व्या वर्षी १७ वर्षांच्या जयप्रकाश बरोबर झाला. यांचें शिक्षण कोणत्याहि शाळेंत झालेलें नसलें तरी त्यांना मातृभाषेइतकीच उत्तम गुजराथी भाषा बोलतां येते, मराठी त्यांना समजतें पण बोलतां येत नाहीं. इंग्रजीचा त्यांना थोडाफार सहवास आहे. त्या सांगूं लागल्या,—

" देशभक्तीचें बाळकडू मिळालें असलें तरी जेव्हां हे सात वर्षांसाठीं परदेशांत निघून गेले तेव्हां मी साबरमती आश्रमांत जाऊन बापूजींच्या सान्निध्यांत राहिलें, तेथेंच गुजराती शिकलें. त्यांच्या विचारसरणीनें माझा प्रत्येक देहकण भारून गेलेला आहे. बापूजींसारखा शिक्षक मिळवायला भाग्य पाहिजे."

" म्हणजे एकंदरीनें प्रथम पिता, नंतर बापूजी आणि नंतर पति अशी गुरुत्रयी तुम्हांला मिळाली तर ?" असें मी विचारलें, तेव्हां त्यांनीं नुसता मानेनेंच होकार दिला.

" आपल्या पतींच्या राजकारणांतली कोणती घटना आपल्याला जास्त आवडली ?" मी विचारलें.

" मला तशी कांहीं सरस नीरस निवड करतां यायची नाहीं. कारण ते आज जसे आहेत तसे जर नसते तरच मला वाईट वाटलें असतें." त्यांनीं उत्तर दिलें.

हें कांहीं माझ्या प्रश्नाचें उत्तर नव्हतें. पत्नीचें उत्तर ऐकून जयप्रकाश देखील हांसूं लागले. ते म्हणाले, " तुम्ही पुन्हां मतभेदाचा प्रश्न जरा आडवळणानेंच टाकला."

ते त्यांना 'प्रभा' या लाडक्या नांवाने हांक मारतात.

"प्रभा, सांगून टाक ना एकदां कीं तुझ्या माझ्यांत मतभेद होतात म्हणून!" आणि पुढें आपण सांगायला सुरवात केली.

"आमच्या जीवनांत वैयक्तिक मतभेदांना आम्हीं फारसें महत्व देत नाहीं. ही दररोज प्रार्थना करते आणि मी हंसतों. ही दररोज दोनदां गीता पाठ करते आणि मी हिच्या अंधश्रद्धेला हंसतों. गीतेसारखं पुस्तक आयुष्यांत एकदां वाचलें बस्स झालें. जगांत कितीतरी विचारप्रवर्तक ग्रंथ आहेत. पण एकेकाची आवड असते. हिला दुध हवें तर मी चहा घेतों. आहाराबद्दल सांगितलंच मी! एक-मेकांच्या आवडी निवडीबद्दल आम्हीं वादविवाद घालीत नाहीं. त्यामुळें आमच्यांत कधीं रुसव्या फुगव्याचे फारसे प्रसंगच येत नाहींत."

'रुसव्या फुगव्याशिवाय वैवाहिक जीवनांत गोडी येऊं शकते का?' असा प्रश्न विचारण्याचें मी ठरविलें. इतक्यांत आमची गाडी एका स्टेशनवर थांबली. बाहेर कडाक्याची थंडी पडलेली होती. आम्हीं चहा घेण्यासाटीं बाहेर आलों आणि जेव्हां परत डब्यांत शिरलों तेव्हां जरा लवंडलेल्या प्रभावती-देवी पुन्हां उठून बसल्या.

जयप्रकाश म्हणाले, "सोती रहो प्रभा!" पण त्या निजून राह्यला तयार नव्हत्या. पण जरा संथ शब्दांतच ( आणि एखाद्या लहान मुलावर नाहीं का रागवत तशा स्वरांत ) त्यांनीं त्यांना आंग टाकायला भाग पाडलें. खिडकी-जवळ उशी नीट ठेवून दिली. त्यांच्या आंगावर शाल पांघरून दिली, व मला म्हणाले, "आप चलने दिजीये!"

त्यांच्या वैवाहिक जीवनांतला हा सहजपणा कधींकधीं त्यांच्यांत रुसव्या फुगव्याचे गोड प्रसंग निर्माण करीत असेलहि. तुरुंगामधून नुकतेच सुटून आले हे—तुरुंगवासामुळें यांच्यांत विरहाचे प्रसंग निर्माण झाले होते! त्यावेळीं यांना काय वाटलें असेल?

"जयप्रकाश यांना यावेळीं तुरुंगांत कष्ट झाले हें वाचून तुम्हांला वाईट वाटलं असेल?" मी विचारलें.

"नाहीं." त्यांनी पडल्यापडल्याच उत्तर दिलें.

"तर मग काय वाटलं?" मी विचारलें. त्या उठून बसल्या आणि

म्हणाल्या "असं पहा, काय वाटलं हें सांगतां येत नाहीं पण त्याबद्दल विशेष दुःख मात्र झालं नाहीं. लढाऊ राजकारणांत भाग घेणाऱ्यांच्या वांट्याला असले तुरुंगवासाचे प्रसंग येणारच ! मला माहित होतं कीं असं हें चालणारच ! त्याचं वाईट वाटून घेण्यांत तरी काय अर्थ आहे ?"

"मग तुम्ही तुरुंगांत एकमेकांच्या भेटीला जात होतां कीं नाहीं ?" मी विचारलें.

"होय तर !" जयप्रकाशनींच उत्तर दिलें.

"नाहीं हो ! हे एक दोनदांच मला भेटायला आले आणि मी मात्र पुष्कळ वेळां त्यांच्या भेटीला गेलें होतें."

लागलीच त्या पतीपत्नींत जुन्या आठवणींची चर्चा सुरू झाली. कोण केव्हां तुरुंगांत भेटायला आलें यासंबंधीं एकमेकांची माहिती खोडून टाकण्यांत येऊं लागली.

शेवटीं जयप्रकाश म्हणाले, "खरं आहे हिचं म्हणणं ! मी हिला तुरुंगांत एखाद्याच वेळीं भेटलों असेन. १९३० मध्यें मला तुरुंगवास घडलां तेव्हां ही अलाहाबादला देवी कमला नेहरू यांच्याबरोबर कार्य करीत होती; तेव्हां ही आली माझ्या भेटीला. पुढें तुरुंगातून माझी सुटका झाली आणि तिकडे माझी आई वारली, त्यामुळें हिला आपलं काम सोडून यावं लागलं. परंतु १९३२ मध्यें मात्र हिला दोन वर्षांची शिक्षा झाली. त्यावेळीं मी एकदां हिला भेटलों. कारण माझ्या वासावर नेहमीं गुप्त पोलीस असत. त्यामुळें लवकरच मी अलाहाबादेवरून नाहींसा झालों. मुंबईला आलों. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचा जनरल सेक्रेटरी या नात्यानें चळवळीचीं सूत्रें गुप्तपणें हालविण्याचें महत्वाचें कार्य मी करीत होतों. मग कशी हिची भेट घेणार ?"

प्रभावतीदेवींनीं स्मित करून आपल्या गळ्याभोवतीं शाल घट्ट लपेटून घेतली व म्हटलें, "बरं पण, मी तर आल्यें ना ?"

"कबूल !" जयप्रकाश म्हणाले, "लवकरच मी मद्रासला पकडला गेलों व मुंबईला शिक्षा होऊन मला नाशिकच्या तुरुंगांत आणून ठेवलें."

"तेथें माझी सुटका होतांच मी येऊन यांची भेट घेतली. आतांच्या तुरुंगवासाच्यावेळीं मीं यांच्या भेटीला दोनतीनदां गेल्यें. पण नंतर गुप्त पोलिस

आमच्या भेटीच्या वेळीं हजर राहूं लागल्यामुळें आम्हीं भेटी घेण्याचें नाकारलें." प्रभावतीदेवी म्हणाल्या.

"तुम्हां दोघांच्या आयुष्यांतले सुखाचे किंवा दुःखाचे अत्युत्कट क्षण आपण मला सांगूं शकाल का?" असें मी त्यांना विचारलें. तेव्हां प्रभावतीदेवी म्हणाल्या, "तसं कांहीं सांगतां येणार नाहीं. तरी पण हे जेव्हां अमेरिकेहून सात वर्षांनंतर परत आले तेव्हां मात्र मला अतिशय आनंद झालेला होता. तसंच १९३० मध्ये हे तुरुंगांतून सुटून आल्यानंतर जेव्हां माझ्या सासूबाई वारल्या तेव्हां मला अतिशय दुःख झालें होतें."

सबंध संभाषणांत प्रभावतीदेवी जयप्रकाश यांना सर्वनामानेंच संबोधन करीत होत्या. त्यांना सुरुवातीलाच मी विचारलें होतें, "जयप्रकाश यांचं एखादं लाडकं नांव आहे का?"

तेव्हां त्या म्हणाल्या, "नाहीं."

"मग त्यांना कोणत्या नांवानें आपण हांक मारतां?"

त्या लाजल्या आणि म्हणाल्या, "त्याच!"

माझे आतां जवळ जवळ सर्वच प्रश्न संपलेले होते आणि शिवाय मला जयप्रकाश यांची एका महत्वाच्या व्यक्तीसंबंधीं मुलाखत घ्यायची होती.

मी प्रभावतीदेवींना विचारलें, "असं पहा कीं आज तुम्हा पतीपत्नींत मतभेद मुळींच नाहींत. पण समजा उद्यां कांहीं असेंच विघटित घडून आलें आणि तुमच्यापुढे प्रश्न येऊन पडला कीं पतीसाठीं गांधीजींचा त्याग करावा कीं गांधीजींसाठीं पतीचा त्याग करावा, तर आपण काय कराल?"

प्रभावती देवींनी या प्रश्नाची अपेक्षा केली नव्हती. त्या कांहींही उत्तर न देतां स्वस्थपणें बसून राहिल्या.

मी पुन्हां त्यांना हाच प्रश्न पण जरा निराळ्या शब्दांत समजाऊन सांगितला. जयप्रकाश यांना देखील या प्रश्नाचें उत्तर ऐकण्याची उत्सुकता दिसली. त्यांनीं पत्नीकडे स्मितपूर्वक एक दृष्टिक्षेप टाकला.

त्या विचारपूर्वक म्हणाल्या—"मला असं वाटतं कीं हा प्रश्न तुम्हीं विचारला नसता तर बरं झालं असतं. पण पुन्हां पुन्हां तुम्हीं आमच्यांत मतभेद झाले तर काय होईल या गोष्टीवर जोर देत आहांत, तर मग सांगून टाकतें मी आणि होतें

एकदांची मोकळी !

"माझ्या आणि माझ्या पतीच्या मतांत आणि दृष्टीकोनांत फरक खासच आहे. मला चरखा धर्म वाटतो, हे सूत देखील कांतत नाहींत. परंतु मी जरी बापूंची अनुयायी असलें तरी खास त्यांचाच असा आदेश आहे कीं आपल्या पतीला अनुसरून त्यांची आज्ञा पाळून कर. त्यांच्या इच्छांच्या विरुद्ध वागूं नकोस."

"पण तसं करण्यांत जर तुमच्या आवडत्या तत्त्वांना बाध येत असेल तर?" मीं विचारलें.

"पण मी तिच्या तत्त्वांच्या आड कशाला येऊं? मी मघाच नाहीं का सांगितलं कीं आम्ही परस्परांच्या मतस्वातंत्र्यावर घाला आणीत नाहीं म्हणून?" जयप्रकाश म्हणाले.

"तें खरं, पण समजा, तुमच्या जागीं एखादा दुराग्रही पुरुष असता तर?" मी म्हणालों.

"तर मी त्या पतीचा खुशाल त्याग केला असता." प्रभादेवी आवेशानें म्हणाल्या. जयप्रकाश मोठ्यानें हांसले. पण प्रभावतीदेवी गंभीरपणें त्यांच्याकडे बघत होत्या.

"जयप्रकाश हे स्वतंत्र हिंदुस्थानचे अध्यक्ष झालेले तुम्हांला आवडतील कीं राष्ट्रासाठीं बलिदान झालेले आवडतील?" या माझ्या प्रश्नाला उत्तर देतांना त्या म्हणाल्या,

"मला त्यांच्या मानप्रतिष्ठेपेक्षां त्यांचें बलिदानच अधिक पसंत आहे."

"नशीब माझं !" जयप्रकाश गंमतीनें म्हणाले.

"आपण जयप्रकाश यांचें वर्णन एका वाक्यांत सांगूं शकाल?"

त्या म्हणाल्या—"मैं उन के संबंध मे कुछ कह नही सकती !"

भुसावळच्या स्टेशनावर निद्रामग्न झालेल्या आपल्या पत्नीला जयप्रकाशांनी हांक मारली, "प्रभा, उठ !"

तेव्हां कुठें मला आणखी एक प्रश्न सुचला. "या सुखी दांपत्याला आपल्या संसारांत एखादें बालक असावें असें वाटत नसेल का?"

पण धाडधाड करीत नागपूर मेल मुंबईकडे गेली व मुंबईकडून कलकत्ता

मेल आली. जयप्रकाश आणि प्रभावती यांचं लक्ष आतां स्वतःसाठीं सोयीच्या जागा मिळवण्याकडे लागलेलें होतें. तिकडे प्रवाशांची धांदल आणि सामानांची आदळ आपट चाललेली होती व इकडे माझ्या मनांत येत होतं—
" पतीच्या बलिदानाला सज्ज झालेल्या या बाणेदार तरुणीला अपत्यसुखाची इच्छा नसेल कां ? कारागृहाबाहेर नुकत्याच पडलेल्या या धाडसी तरुणाला अपत्याचे मृदु पाशबंध हवेसे वाटत नसतील कां ? "

पण मला उघडपणे तो प्रश्न विचारायला सवडच मिळाली नाहीं. त्या दांपत्याला घेऊन गाडी हळूं हळूं दृष्टिआड झाली, काळोखांत गडप झाली, . आणि माझ्या मनातली ती जिज्ञासा— ?

मनाच्या प्रयोगशाळेत कधीं कधीं अनेक असंबद्धता निर्माण होत असतात, असें जें म्हटलेलें आहे तें कांहीं खोटें नाहीं.

३१ डिसेंबर १९४०

मराठी ग्रंथ संग्रहालय
नों. क्र. 90८८०३

* * *

स्त्री ही पतीची शक्ति असते. तुम्हीं उदासीन राहून आपल्या पतीची शक्ति कुंठित ठेवणार कीं त्याच्या कार्याशी सहानुभूति ठेवून त्याचा उत्साह द्विगुणित करणार ?—मधून मधून आपला वियोग व्हायचाच. कारण इतर सामान्य गृहस्थाप्रमाणें आपल्या कुटुंबामधल्या माणसांचें सुख साधणें हाच जीवनाचा मुख्य उद्देश मला करतां येत नाहीं. मी चांगलीं वस्त्रें नेसेन, सुग्रास मिष्टान्न खाईन, हंसेन, नाचेन, खेळेन, मौजा मारीन जेवढा म्हणून सुखोपभोग घेतां येईल, तेवढा घेईन हाच विचार माणसांच्या डोक्यांत नेहमीं घोळत रहावा काय ? अशा मनाच्या अवस्थेला उन्नति म्हणत नाहीं. आजकाल आपल्या देशांतल्या मुलींच्या जीवनाला हेंच अव्यवस्थित व निंद्य स्वरूप प्राप्त झालेलें आहे. तुम्हीं हें सगळें सोडून द्या."—पांदेचरीच्या आश्रमांत बसून सध्या अध्यात्माचीं गूढें उकलीत बसण्याचा चाळा करणारे महर्षि अरविंद घोष यांनीं चाळीस वर्षांपूर्वीं आपल्या पत्नीस पाठवलेलें हें पत्र आहे.

त्या वेळीं तरुण अरविंद आपल्या राष्ट्राच्या कल्याणासाठीं आत्मसमर्पण करायला उत्सुक झालेले होते. वैभव आणि अधिकार यांचीं मखमाली पादत्राणें घालून आपला पति भाग्यदेवतेच्या दर्शनाला निघालेला आहे, अशा गोड स्वप्नांत त्याची पत्नी लयलीन झालेली होती. श्रीमंत घराण्यांतल्या मुलीला आपलें लग्न एखाद्या श्रीमंत सुशिक्षीत आणि अधिकारसंपन्न तरुणाबरोबर झाल्यावर जेवढे उंच मनोरे मनांत रचतां येतील तेवढे तिनें रचलेले होते. बाणेदार पतीनें खास त्याच्यासाठीं निर्माण करण्यांत आलेला सुखाचा राजमार्ग सोडून दिला, पायातलीं मखमाली पादत्राणें काढून फेंकून दिलीं आणि त्याला पसंत पडली त्या नव्या वाटेनें तो अनवाणी चालूं लागला. पत्नी चकित झाली, तिला हें सारें नवीन होतें. तिनें पतीला याबद्दल कोणत्या शब्दांत विचारलें हें कांहीं प्रसिद्ध नाहीं. परंतु बाबू अरविंद घोष यांनीं आपल्या पत्नीला उद्देशून लिहिलेलीं तीनही पत्रें अत्यंत हृदयस्पर्शी आहेत. हीं पत्रें लिहिल्यानंतर लवकरच घरसंसाराची हौस असलेल्या त्या अभागिनीचा अंत झाला.

आज अरविंद घोषांची सहचारिणी जिवंत असती तर? तिचा जीवनौघ खात्रीनें बदलला असता. स्वतःशीं खूप झगडून तिनें अरविंदांचा मार्ग पत्करला असता, यांत संशय नाहीं. पतीच्या पावलांवर पाऊल टाकण्यांत हिंदी स्त्रिया धन्यता मानतात. पतीच्या इभ्रतीसाठीं त्या आपले प्राण देखील पणास लावतील. पतीच्या जीवनकार्यांत त्या आपुलकीनें भाग घेतील. सामान्य सुखलोलुप स्त्री देखील केवळ आपल्या पतीसाठीं वाटेल तें अग्निदिव्य करायला तयार व्हावी, असाच आपल्या समाजांतील स्त्रियांचा मनोधर्म आहे. केवळ पतीसाठीं म्हणून सार्वजनिक कार्यांची धुरा आपल्या खांद्यावर घेणाऱ्या स्त्रिया हिंदुस्थानांत किती तरी सांपडतील.

कस्तुरबा गांधी, आनंदीबाई कर्वे, स्वरूपराणी नेहरू, कमलादेवी नेहरू, उषाबाई डांगे, इंदिराबाई रुईकर, वासंतीदेवी दास, वगैरे आपल्या पतींच्या पावलावर पाऊल टाकून केवळ त्यांच्याच प्रेमासाठीं स्वतःच्या आयुष्याला एक नवीन वळण लावून घ्यायला तयार झाल्या. समजा या स्त्रियांचे विवाह योगायोगानें इतर "ठिकाणीं" झाले असते तर?

मला अशीं कांही उदाहरणें माहीत आहेत, कीं केवळ आपल्या पतीसाठीं अगदीं सामान्य परिस्थितींतल्या स्त्रियादेखील स्वतःच्या जीवनाला नवी कलाटणी द्यायला तयार होतात. कै. लक्ष्मीबाई टिळक या कांहीं स्वयंप्रेरणेनें ख्रिस्ती झाल्या नसत्या. सौ. उषाबाई डांगे कांहीं स्वयंप्रेरणेनें कम्युनिस्ट झालेल्या नाहींत. सौ. इंदिबाई रुईकर यांना गिरणीं कामगारांच्या चळवळींत भाग घेण्याची कांहीं स्वयंप्रेरणा झालेली नव्हती. फार काय पण सौ. लीलावती मुनशी यांच्यासारखी स्वयंतंत्र साहित्यिक स्त्री देखील राजकारणाची भातुकली करतांना आपल्या पतीच्या नेत्रवीक्षणावरच अवलंबून असते. वयाचीं चाळीस वर्षे गोषांत घालव-लेलीं एका खेड्यातल्या संपन्न देशमुख घराण्यांत नांदणारी सौ. लक्ष्मीबाई देशमुख माझ्या डोळ्यासमोर उभी आहे. पतीनें तुरुंगवास पत्करतांच गोषा झुगारून त्याचें कार्य जितकें करतां येणें शक्य आहे आहे तितकें करून शेवटीं साठीच्या घरांत गेल्यावर एकदांच नव्हे तर दोनदां तुरुंगाची आपत्ति स्वतःवर ओढवून घेणारी म्हातारी आज देखील हिमतीनें बाणेदार आयुष्य जगत आहे. जानकीदेवी बजाज,

लक्ष्मीबाई देशमुख, दमयंती धर्माधिकारी यांना पतीच्या जीवनकार्यात समरस होण्यासाठीं मनाशीं किती तरी झगडावें लागलें असेल ?

इंग्रजी आमदानीतल्या अगदीं पहिल्या पिढीतली कै. डॉ. सौ. आनंदीबाई जोशी ही केवळ पतीच्या प्रेरणेनेंच अमेरिकेला जाऊं शकली. १९३० मध्यें मुंबईचें आझाद मैदान राष्ट्रीय निशाणाच्या संरक्षणासाठीं गाजवणारी बाणेदार बालिका कृष्णा सरदेसाई आज कुठें आहे ? चिमुकल्या संसाराच्या घरकुलांत स्वतःच्या कौटुंबिक जीवनांत रममाण झालेल्या त्या जीवाचें आज कुणाला स्मरण तरी आहे कां ?

पतीच्या प्रभावी व्यक्तित्वांत विलीन होणें हीच आपल्या आयुष्याची इति कर्तव्यता असें हिंदी स्त्रिया मानीत असतात, तरी पण आजच्या पिढीत थोडा फार बदल होत आहे. सौ. विमलाबाई देशपांडे किंवा सौ. प्रभावती देवी यांच्यासारख्या बाणेदार स्त्रियांची स्वतःचें वेगळें व्यक्तित्व कायम राखण्यासाठीं चाललेली झुंज पाहण्यासारखी असते.

इतिहासांत समर विन्मुख पतीला वाग्ताडन करणाऱ्या स्त्रियांची उदाहरणें किती पण सांपडतात, रणांगणावर गेलेल्या पतीच्या मागें जोहार करणाऱ्यांचीं लक्ष नामें घेतां येतील. आजच्या काळीं पतीच्या बरोबरीनें विशाल संसाराची जबाबदारी पत्करणाऱ्या स्त्रियांना तसलाच जोहार करावा लागतो. पतीसाठीं थाटलेल्या घर संसाराची आणि उभयतांच्या मुलाबाळांची जबाबदारी सांभाळणाऱ्या स्त्रीचें जीवन आजच्या आर्थिक विषमतेच्या काळीं अधिकच त्यागी ठरतें. पतीच्या गळ्यांत फुलांच्या माळा पडतात, त्याच्या नांवाचा जयजयकार होतो आणि त्याची पत्नी ?—लोकमान्य टिळक किंवा बॅ. विनायकराव सावरकर यांच्या सहधर्मिणींनीं सहन केलेले मनस्ताप आणि आपत्तीचे प्रसंग किती जणींनीं सहन केलेले असतील ? अशा तऱ्हेच्या आपत्तीपुढें नतमस्तक न होतां जीवनाशी झुंज घेणाऱ्या स्त्रियांनींच राष्ट्राचें भवितव्य उज्वल केलेलें आहे. आतां उठलेल्या पक्षभेदाच्या वावटळी पुढें दखलपावर या स्त्रियांच्या विशाल संसाराचे आदर्श आम्हीं उद्याच्या संसारकरणी पुढें ठेवूं आणि त्यांना स्वतःचे जीवन विशाल करायला सांगू.

१० सप्तेंबर, १९६३

प्रा. गिरिजाशंकर त्रिपाठी

दा. क्र. ......

REFBK-0006484

वकीलांची पुस्तकें —

अश्रुफुलें
नव्या ज्योती
जळती घरें
जन्माचे सोबती
विशाल संसार
समर प्रसंग
धूमकेतू
अहिंसादर्शन
व्होलगा ते गंगा
श्रावणांतील खेडें
भिंमीची सवत

"**जळतीं घरें**"——दारूबंदीवर लिहिलेल्या पांच एकांकिका——बारा आणे.

"...श्री. व्यं. शं. वकील यांनी लिहिलेल्या या पांच छोट्या नाटिका दारूबंदी कार्याच्या प्रचारार्थ लिहिल्या असल्या तरी प्रचारकी नाटकांत आढळणारा रुक्षपणा किंवा व्याख्यानबाजी त्यांत नाहीं. दलितवर्गाच्या घरोघर दिसणारीं दृश्यें त्यांत अत्यंत सहृदयतेने पण रेखीवपणें चितारलीं आहेत. रंगभूमीवर या नाटिका अर्ध्या तासांत होऊं शकतात. स्थानिक लोकांकडून खेडोपाडीं, मुलामुलींच्या शाळांतून व फिरत्या नाटकसंघामार्फत गांवोगांव या नाटिकांचे प्रयोग केले गेले तर दारूबंदी प्रचारा बरोबर लोक नाट्याची चळवळ प्रसृत केल्याचेंहि श्रेय लाभेल. लोकनाट्य म्हणून येणाऱ्या नव्या नाट्यप्रकाराचा एक आदर्श म्हणून श्री. वकीलांच्या नाटिकांचा उल्लेख करण्यास हरकत नाहीं."

"**जन्माचे सोबती**"———स्वतंत्र कौटुंबिक नाटक———दीड रुपया.

"संवाद लिहिण्यांत वकीलांची अभिजात कुशलता सहज दृष्टीस पडते. त्यांचे संवाद साधे–घरगुती म्हटलें तरी चालेल–सुटसुटीत व कांहीकांही ठिकाणीं अत्यंत मर्मभेदी असे झाले आहेत. ......संवाद हाच या नाटकाचा गाभा; आणि तो गाभा इतक्या हळुवार हातांनी वकिलांनी रचला आहे कीं त्यांतील प्रत्येक भागांत त्यांचे जिवंत विचार ओतले गेले आहेत याची खात्री पटते.

प्रीतीच्या फुलाला बहर आला आणि तें सुकलें कीं निर्माल्यवत होतें. परंतु त्या फुलाचे निर्माल्य होण्यापूर्वी त्यांतून दुसऱ्या अत्यंत गोड व नाजूक अशा भावना निर्माण होतात. नवीन फुलपांखराच्या प्रेमाच्या जाळ्यांत सांपडून या भावनांचा चोळामोळा करायचा का? हा प्रश्न नाटककारानं या नाटकांत विचारला आणि त्याचं यथार्थ उत्तरही त्यानं दिलं आहे."

**प्रदीप प्रकाशन : :** वासुदेव विष्णु भट
भीमरावबाडी ठाकुरद्वार—मुंबई, २